CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## राष्ट्रीय महामार्गांवर एकसमान टोल राहणार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

**नवी दिल्ली, ३ फेब्रुवारी**

राष्ट्रीय महामार्गांवरील प्रवाशांना दिलासा देण्यासाठी रस्ते वाहतूक मंत्रालय एकसमान टोल धोरणावर काम करीत आहे. भारतातील महामार्ग पायाभूत सुविधा अमेरिकेच्या बरोबरीची असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी वृत्तसंस्थेला सांगितले.

अधिक टोल आकारणी आणि खराब रस्त्यांबद्दलच्या तक्रारींमुळे प्रवाशांमध्ये वाढता असंतोष यासंबंधी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय सोशल मीडियावरील प्रवाशांच्या तक्रारी अतिशय गांभीर्याने घेत आहे आणि संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करत आहे, असे गडकरी म्हणाले.



सध्या, राष्ट्रीय महामार्गांवर एकूण वाहतुकीपैकी खाजगी गाड्या सुमारे ६० टक्के आहेत, तर टोल महसूल वसुलीत या वाहनांचा वाटा केवळ २०-२६ टक्के आहे. २०२३-२४ मध्ये भारतातील एकूण टोल वसुली ६४,८०९.८६ कोटी रुपयांवर पोहोचली, जी मागील वर्षाच्या तुलनेत ३५ टक्क्यांनी वाढली आहे. २०१९-२० मध्ये २७,५०३ कोटी रुपये कर संकलन झाले.

चालू आर्थिक वर्षात २०२०-२१ मध्ये महामार्ग मंत्रालय दररोज ३७ किमी महामार्ग बांधकामाचा मागील विक्रम मागे टाकेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत सुमारे ७,००० किलोमीटर महामार्ग बांधण्यात आले आहेत. भारतमाला परियोजनेची जागा घेण्यासाठी नवीन योजना नसल्यामुळे, महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देण्याची गती बरीच मंदावली आहे.

पूर्वी मंत्रालयाला भारतमाला परियोजनेअंतर्गत ३,००० कोटी रुपयांपर्यंतच्या महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देण्याचा अधिकार होता; परंतु आता मंत्रालय कोणत्याही नवीन प्रकल्पाला मंजुरी देऊ शकत नाही, असे मत गडकरी यांनी मांडले. आता आपल्याला १,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कोणत्याही प्रकल्पासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी घ्यावी लागेल. आम्ही ५०-६० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे पाठवले आहेत. मंजुरी मिळाल्यानंतर या प्रकल्पांवर काम सुरू होईल, असे गडकरी यांनी सांगितले.

*(वृत्तसंस्था)*

## प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकूल कामांना गती द्या : मुख्यमंत्री

### ग्रामीण आवासच्या १६.८१ लाख घरकुलांना मंजुरी

**मुंबई, ३ फेब्रुवारी**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.



मुख्यमंत्र्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचा निर्देश दिला. यात आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन फडणवीस म्हणाले की, भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची बाब आहे. मात्र, उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमीन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समन्वयाने मार्ग काढावे. जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी जलजीवन मिशन योजनेतील कामे गतीने, कालमर्यादेत व गुणवत्ता पूर्ण करावी. या योजनांचे सोलरायजेशन झाल्यास वीजेबरोबरच वीज बिलात बचत होईल, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## ६ वाजेनंतर झालेल्या मतदानाचे व्हिडिओ द्या

### हायकोर्टाची निवडणूक आयोगाला नोटीस; २ आठवड्यात उत्तर देण्याचे आदेश

**मुंबई, दि.३ फेब्रुवारी,**

विधानसभा निवडणुकीत सायंकाळी ६ वाजेनंतर झालेल्या मतदानाच्या संदर्भात दाखल केलेल्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र निवडणूक अधिकारी आणि निवडणूक आयोगाला नोटीस दिली. सायंकाळी ६ वाजेनंतर झालेल्या मतदानाचे व्हिडिओ देण्याचे आदेश या नोटीसमध्ये दिले आहे. तसेच या नोटीसीला २ आठवड्यात उत्तर द्यावे, असेही मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या नोटीसीत म्हटले आहे.

मतदानाच्या दिवशी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर संध्याकाळी सहा वाजल्यानंतर ७६ लाख मतदान झाल्याचे दिसत आहे. जर एवढे मतदान झाले असेल तर संध्याकाळनंतर प्रत्येक बुथवर किती मतदारांना टोकन वाटले याची आकडेवारी आणि व्हिडीओ क्लीप द्या, अशी मागणी




प्रकाश आंबेडकर यांच्यासह विरोधी पक्षाने केली आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आज सुनावणी झाली. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्याला नोटीस बजावण्यात आली.

मतदानाच्या दिवशी सायंकाळी ६ वाजेनंतर झालेले जे मतदान आहे, त्यासंदर्भात असणारा जो स्लीपचा रेकॉर्ड आहे, तो रेकॉर्ड आमच्याकडे नाही, असे उत्तर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातून मिळाले होते. त्यामुळे आता कोर्टाने त्यांच्याकडे ती माहिती उपलब्ध आहे की नाही याबाबत विचारणा केली आहे. निवडणूक आयोगाकडे ती माहिती नसेल, तर ६ वाजेनंतर झालेले मतदान झाले की नाही झाले, हा मुद्दा आहे. ६ वाजेनंतरच्या मतदानाची आकडेवारी आहे, ते मतदान झालेलेच नाही, असे आम्ही कोर्टात सांगितले, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. निवडणूक आयोग निवडणुका पारदर्शीकपणे पार पाडल्याचा दावा करत असेल, तर तोच त्यांनी कोर्टासमोर करावा आणि त्यांच्याकडे किती स्लीप्स वाटल्या आणि किती वाटल्या नाहीत त्याची माहिती कोर्टासमोर द्यावी, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले. निवडणुकीचा निकाल जाहीर करताना पोल वोट्स आणि काउंटर वोट्स यांची जुळवणी झाली पाहिजे. यांची जुळवणी झाली नसेल, तर मग रिटर्निंग ऑफिसरने तो सगळा दस्तऐवज निवडणूक आयोगाकडे पाठवला पाहिजे. त्यानंतर निवडणूक आयोग जे सांगेल, त्यानुसार तो निकाल दिला पाहिजे, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

## सोलापूर बाजार समिती निवडणूक मतदारयादी संदर्भातील सुनावणी गेली पुढे!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील उच्च न्यायालयात होणारी सुनावणी पुढे गेली आहे. मंगळवार (दि.३) फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालयाच्या विषय पाटलावर सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीच्या मतदार यादीचा विषयच आला नसल्याने सदरची सुनावणी पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीची अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. मात्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. ज्या टप्प्यात सोलापूर




कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. त्याच टप्प्यातून निवडणुकीची पुढील प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. (दि.३१) डिसेंबर २०२४ ही स्थगितीची अंतिम तारीख होती. त्यानंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू होईल असा अंदाज वर्तवण्यात येत होता. मात्र नवीन मतदार यादीचा विषय समोर आल्याने पुन्हा एकदा बाजार समितीच्या निवडणुकीला स्थगिती देण्यात आली.

सहा महिन्यांच्या कालावधीनंतरची प्रारूप मतदार यादी मतदानासाठी ग्राह्य धरता येत नाही. असा नियम असल्याने नव्याने प्रारूप मतदार यादी तयार करण्यासंदर्भात पणन संचालकांनी आदेश दिल्यानंतर सदरची निवडणूक स्थगित करण्यात आली होती. त्यावर उच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. परंतु उच्च न्यायालयाच्या विषय पटलावर सोलापूर बाजार समितीचा विषय येण्याअगोदरच न्यायालयाचे कामकाज संपुष्टात आल्याने, सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील सुनावणी होऊ शकली नाही.

### पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता

उच्च न्यायालयातील विविध विषय पटलावर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा विषय येण्याअगोदरच कोर्टाचे कामकाज संपुष्टात आले. त्यामुळे यावर सुनावणी होऊ शकली नाही. दर शुक्रवारी उच्च न्यायालयाच्या विषय पटलावर घेण्यात येणाऱ्या विषयांच्या नोंदी मागवल्या जातात. त्या अनुषंगाने येणाऱ्या शुक्रवारी या संदर्भातील नोंदी घेण्यात येऊन त्यानंतर सुनावणी घेण्यात येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील सुनावणी आठवड्यासाठी पुढे गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## महसूल अधिकाऱ्यांची क्षेत्रीय भेटीत हयगय नको

### शिस्तभंगाची कारवाई होणार; मंत्री बावनकुळे स्वतः आढावा घेणार

**मुंबई, ३ फेब्रुवारी**

राज्यातील महसूल यंत्रणा लोकाभिमुख करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट परिपत्रक जारी करून जिल्हाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी दोनवेळा आपल्या क्षेत्रात दौरा करून आपल्या विभागातील शासकीय ध्येयधोरणे व योजना जनतेपर्यंत पोहोचतात की नाही, याचा वस्तुनिष्ठ अहवाल द्यावा, असे म्हटले आहे. या कामात कोणी कुचराई केल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.



बावनकुळे यांनी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांना परिपत्रकाबद्दलची संपूर्ण माहिती दिली. जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात मुख्यमंत्र्यांच्या या संदर्भातील निर्देशांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. गावपातळीवर कर्मचारी व अधिकारी कामकाज करत आहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी आकस्मिक भेट तंत्राचा वापर करून यंत्रणा सतर्क करावी. या भेटी देताना ई-ऑफिस प्रणाली, सेवाहक्क कायदा पोर्टल, आपले सरकार पोर्टल, पीजी पोर्टल, इम्युटेशन, ई-पीकपाणी तसेच, सेतू कार्यालयासह महसूल विभागातील सर्व ऑनलाईन सेवांचा वापर कटाक्षाने केला जातो की नाही, याचा आढावा घ्यावा, अशा सूचनाही या १३ कलमांमध्ये आहेत




72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

अटी व शर्ती लागू. *एका विशिष्ट पल्सर मॉडेलची प्रारंभिक किमत आहे. बजाज ऑटोला कोणत्याही ऑफर व किमती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय मागे घेण्याचा/बदलण्याचा अधिकार आहे, ज्या मॉडेल व राज्यांमध्येच बदलू शकतात. AMC निवडक मॉडेल्स व विशिष्ट राज्यांमध्येच उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी, कृपया आपल्या जवळच्या बजाज डीलरशी संपर्क साधा. रोडसाइड सहाय्य थर्ड पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर्स द्वारे दिले जाते व त्यांच्या अटी व शर्ती लागू होतात. इ-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील ऑफर्स त्यांच्या स्वतःच्या अटी व शर्तींवर आधारित असतात.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.
**Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Sangola** 8888109109, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Temburni** 9552679777, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### रासेयो शिबिरांतर्गत रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्यावतीने मौजे रानमसले (ता. उत्तर सोलापूर) येथे रक्तदान शिबीर व रक्तक्षय तपासणी चाचणी आयोजित करण्यात आली होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील, प्राचार्य सागर महाजन, दयानंद कुंभार, प्रा.वर्षा माने-देशमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष सरकाळे, संकेत आवारे, राजेंद्र गरड, विवेक सुतार उपस्थित होते. रक्तक्षय तपासणी शिबीरात रासेयो स्वयंसेवकांसोबतच सावित्री कन्या प्रशाला व ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालयातील १०५ किशोरवयीन मुलींची रक्तक्षय तपासणी करण्यात आली. यासाठी प्राथमिक डॉ. जयवंत गुंड व प्रयोगशाळा तज्ञ संकेत आवारे यांचे सहकार्य लाभले.



### गॅलेक्सी स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

बाणेगांव येथील गॅलेक्सी पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सिने व नाट्य अभिनेते अमीर तडवळकर तर अध्यक्षस्थानी मयुरेश्वर फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा गॅलक्सी पब्लिक स्कूलचे प्रोजेक्ट डायरेक्टर स्वप्निल राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नटराज व सरस्वती यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. डायरेक्टर स्वप्नील राऊत यांनी प्रास्ताविक केले.



### नेताजी शाळेत हळदी-कुंकू कार्यक्रम

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळेत हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माता-पालक संघाचे सदस्य कल्पना झिपटे, भाग्यश्री बंदलगी उपस्थित होते. प्रथम क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेकडून प्रमुख अतिथींना व उपस्थित १७५ माता-पालकांना वाण देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सहशिक्षिका कल्पना आकळवाडी यांनी स्टार्टअप डे विषयी मार्गदर्शन केले.

### सांगली अर्बन बँकेच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**सांगली, दि. ३ फेब्रुवारी-**

सांगली अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेस रथसप्तमी ४ फेब्रुवारी रोजी ९० वर्षे पूर्ण होत आहेत. बँकेच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बँकेच्या सर्व शाखांमध्ये रक्तदान शिबीर आणि महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आले आहेत. तसेच शुक्रवारी ७ फेब्रुवारी रोजी बँकेचे सभासद, खातेदार यांचेसाठी सूर मराठी मातीचा या मराठी संमिश्र गीतांचा कार्यक्रम भावे नाट्यमंदिर येथे सायं ७ वाजता होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन बँकेचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यानी केले आहे.

# मूकबधिर विद्यार्थ्यांचे 'बोलके' शिवतांडव नृत्य

## मराठी विश्व संमेलनात ममता मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांनी केले सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**




पुणे येथील झालेल्या पहिल्या मराठी विश्व संमेलनात सोलापूर येथील ममता मूकबधिर विद्यालयाच्या शिवतांडव या नृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले.

यावेळी मराठी सिने सृष्टीतील दिग्गज कलाकार हजेरी होती.महेश मांजरेकर, नागराज मंजुळे, प्रवीण तरडे, मंत्री दीपक केसरकर, सरकारी वकील उज्वल निकम, उद्योग मंत्री उदय सामंत, अखिल भारतीय बाल रंगभूमी परिषद अध्यक्ष नीलम शिर्के यांच्यासह सिनेसृष्टीतील कलाकार, साहित्यिक उपस्थित होते. सर्वांनी सोलापूर जिल्ह्यातील कर्णबधिर मुलांचे कौतुक केले. आणि पुढील कारकिर्दीला शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रम अखिल भारतीय बाल नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम करण्यात आला. यासाठी मम ता मूकबधीर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता गायकवाड, मेधा जोशी, उज्वला पराळे, तेजश्री श्रीरेखम, नरेंद्र वाघमारे, रघुनाथ फुगे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संस्थेचे अध्यक्ष, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, संस्थेचे सचिव शशिभूषण यलगुलवार यांनी विद्यार्थी कलाकारांचे अभिनंदन केले.

> दुबई येथे होणाऱ्या विश्व बाल साहित्य संमेलनासाठी निवड दुबई येथे होणाऱ्या विश्व बाल साहित्य संमेलनासाठी एन.ए.बी. संचलित ममता मुकबधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड झाली. हा संस्थेचा बहुमान आहे.
>
> **-प्रकाश यलगुलवार,**
> अध्यक्ष, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, शाखा, सोलापूर

### सेवासदन प्रशालेत बालिका संवाद कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो सोलापूर यांच्या वतीने सु.रा.मुलींची प्रशाला, सेवासदन येथे बालिका संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले, सहाय्यक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, बाल सरंक्षण अधिकारी रेश्मा गायकवाड, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे आणि माजी अधिकारी सतीश घोडके, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, विस्तार अधिकारी ऋषिकेश जाधव आदी उपस्थित होते. अंबादास यादव यांनी प्रास्तविक केले. सूत्रसंचालन आणि आभार दिपाली बोरसे यांनी केले.




बालिका दिनानिमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आले होते. स्पर्धेचे परीक्षण लक्ष्मी विश्वेश्वर कमळे, दिपाली संजय बोरसे, मीरा राहुल राक आणि स्वप्ना पुष्कराज केळकर यांनी केले. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे- प्रथम स्नेहा नलावडे, द्वितीय धनश्री साळुंखे, तृतीय विजयालक्ष्मी झांबरे, उत्तेजनार्थ पायल जगताप आणि कांचन पाटील आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे मिस्बाह अब्दुल मुजावर, भाग्यलक्ष्मी दोडमनी, प्रज्ञा विशाल कांबळे, तनुजा पवार, विजयालक्ष्मी झांबरे यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बेटी बचाओ बेटी पढाओची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमासाठी कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, सूरज जाधव, शशीकांत यादव, रोहित यादव, शिपाई स्वाती माने आदींनी परिश्रम घेतले.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात महात्मा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका विभागीय कार्यालय क्रमांक एकचे सहाय्यक अभियंता प्रकाश सावंत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक रजनी राऊळ, मनपा विभागीय कार्यालय क्रमांक एकचे कनिष्ठ अभियंता दिपाली चव्हाण, कनिष्ठ अभियंता अजिंक्य साळुंखे, राजू गायकवाड, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, अमोल गायकवाड, आषिकेश लोखंडे, रतन साळवे, प्रशांत साठे, भालचंद्र साखरे, नईम मुचाले, शुभम गायकवाड, शाबुद्दीन रचभरे उपस्थित होते.

# पाकणी येथील जागेच्या बदल्यात वनविभागास आंधळगावची जागा देणार

**मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्यावर घेणार निर्णय : आशीर्वाद**

**आ. कोठे यांनी डीपीसीत मांडला होता मुद्दा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेच्या दुहेरी पाईपलाईनचे काम युध्दपातळीवर सुरु असून, हे काम अंतीम टप्प्यात आहे, पाकणी येथील वनविभागाच्या जागेत महापालिकेकडून जलशुध्दीकरण केंद्र करण्यात येणार आहे. त्यामुळे वन विभागाला येथील जागेच्या बदल्यात आंधळगाव येथील शासकीय जमिन देण्यात येणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंतीम निर्णय घेतील, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली. दरम्यान, याबाबत जिल्हा नियोजन समितीच्या सभेत पाकणी येथील जलशुध्दीकरणाचा विषय आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी पाकणी येथील वन विभागाची जागा महापालिकेस देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

वनविभागाच्या धोरणानुसार शासकीय योजनाकरीता वनविभागाची जागा संपादत करण्यात आली तर वनविभागास पर्यायी ठिकाणी जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यानुसार आंधळगाव येथील सुमारे साडेतीन हेक्टर शासकीय जागा महापालिकेस देण्यात येणार आहे. त्यानंतर महापालिकेकडून ही जागा वनविभागास देण्यात येईल. म ात्र आधळगाव येधील जागेचे मूल्यांकन ५० लाखांपेक्षा जास्त असल्याने याबाबत हस्तांतरणाचे अधिकार राज्य शासनाकडे आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून निर्णय घेण्यात येत आहे.

आंधळगाव येथील शासकीय जागा महापालिकेस देण्यासंदर्भात पाठविलेल्या प्रस्तावावर काही दिवसांपूर्वीच अवर सचिव कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठविण्यात आले आहे. यात वनविभागाकडून भूसंपादनाची रक्कम मिळणार का? अशी त्रुटी काढण्यात आली आहे. मात्र ही तांत्रिक किरकोळ चुक असल्याने राज्य शासनाकडून याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

# डीपीसीमध्ये पालकमंत्र्यांनी आदेशित केलेल्या 'त्या' ६ विभागप्रमुखांना काढल्या नोटिसा

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद**

**काहींची विभागीय चौकशी लागण्याचीही शक्यता?**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

गुरूवार, दि. ३१ जानेवारी रोजी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत स्थानिक नेत्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्यावर टक्केवारीचा तर जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्यावर निष्क्रियतेचा आरोप केल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कारभाराचे पोस्टमार्टेम करून त्यांना कडक शब्दात सुनावले. दुसरीकडे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होत एसटी महामंडळाच्या कारभारावर बोट दाखविले असता एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक बैठकीत अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्याचे आदेश पालकमंत्री



गोरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. दरम्यान, पालकमंत्री गोरे यांनी आदेशित केलेल्या तब्बल ६ अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कारणे दाखवा नोटिसा तयार केल्या असून, एक-दोन दिवसात त्या त्यांना देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान, यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय स्तराकडे प्रस्ताव पाठविला तर यातील काही जण विभागीय स्तरावरील चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता आहे.

पालकमंत्री गोरे यांनी पहिल्याच नियोजन समितीच्या बैठकीत आपल्या कामाची कार्यशैली व आक्रमकता दाखवून दिली. आरोग्य विभागात टक्केवारी दिल्याशिवाय कामेच होत नसल्याची तक्रार आमदार आवताडे यांनी केली. शिवाय डॉक्टरांच्या भरतीत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी एक एक लाख रुपये घेतल्याचा आरोपही आवताडे यांनी केला. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना प्रश्नांची सरबत्ती करीत पालकमंत्री गोरे यांनी त्यांच्या कारभाराचे वाभाडेच काढले. आरोग्य विभागाबाबत आमदार व खासदारांकडून आलेल्या तक्रारीनंतर जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांवर पालकमंत्र्यांनी कारवाई प्रस्तावित केली होती. याचबरोबर जिल्हा क्रीडा अधिकारी पवार यांच्या कारभारावरही तक्रारी आल्या. क्रीडाधिकारी दाद देत नाहीत, त्यांना कडक शब्दात सूचना देण्याची मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार समाधान अवताडे यांनी केली. पालकमंत्री गोरे यांनी चौकशी केली असता परस्पर निधी खर्च केल्याचे क्रीडाधिकारी पवार यांनी बैठकीतच कबूल केले. त्यावेळी सभागृह आश्चर्यचकीत झाले. यावेळी पालकमंत्र्यांनी क्रीडाधिकाऱ्यांची तर चक्क लाज काढली होती. एकंदरीत, हा सर्व प्रकार गंभीर असल्याने पालकमंत्र्यांनी या संबंधित सर्व ६ विभागप्रमुखांना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी आशीर्वाद कोणालाही पाठीशी न घातला प्रत्येकाला नोटिस देण्यासाठी तयार केली असून, एक दोन दिवसात या विभाग प्रमुखाला ही नोटीस बजावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> **मुख्यमंत्र्यांच्या बैठकीलाही डॉ. नवलेंची दांडी**
>
> दरम्यान, आयुष्मान भारत या योजनेचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉर रूम तयार केली असून, आज सोमवार, दि. ०३ रोजी सकाळी १० वाजता त्यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांची आणि जिल्हा आरोग्याधिकाऱ्यांची बैठक लावली होती. दरम्यान, यासाठी जि. प. सीईओ कुलदीप जंगम यांनीही या महत्वाच्या बैठकीला डॉ. नवले यांना वेळेत उपस्थित राहण्याच्या सुचना केल्या होत्या; तरीही डॉ. नवले हे बैठकीला आले नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांनीही पत्रकारांशी बोलताना संताप व्यक्त केला. दरम्यान, आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम डॉ. नवले त्यांच्यावर काय कारवाई करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची शतक महोत्सवाकडे वाटचाल

१९३५ च्या काळात कै. महादेवराव तथा अण्णा गोडबोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एकत्र येऊन अवघ्या अकराशे रुपयांच्या भाग भांडवलावर आणि फक्त २०० रुपयांच्या ठेवीच्या रकमेवर आजची सांगली अर्बन को-ऑप.बँक सुरु केली आणि आज तिचा वटवृक्ष झाला. आजमितीला या बँकेचे भांडवल ३८ कोटी ४४ लाख आहे. हा भांडवलरुपी वृक्ष वाढण्यासाठी अनेकांनी बँक स्थापनेपासून प्रयत्न केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने बँकेचे संस्थापक कै. म. ह. गोडबोले, कै. ग. को. गोडबोले, कै. स. ग. फडके, कै. वा. वि. वाटवे, कै. ग. का. दांडेकर, कै. वि. ह. माईणकर, कै. मा. न. कार्ले कर, कै. सु. शां. शहा, कै. जो. गो. पाटील, कै. अ. वि. देशपांडे, कै. गुं. शां. कांते, श्री. बा. भा. पुजारी या ज्येष्ठ माजी कार्याध्यक्षांचा व त्या त्या वर्षामध्ये कार्यरत असलेल्या संचालक मंडळाचा सहभाग आहे. सध्या ही अध्यक्षपदाची धुरा गणेशराव गाडगीळ सम र्थपणे सांभाळत आहेत. बँकेचे पहिले व्यवस्थापक कै. वा. म. लागू, कै. आ. बा. पाटणकर, कै. पं. भा. टाकवेकर, कै. श्री. अ. बेडेकर, श्री. ना. रा. बोर्गीकर, श्री. सु. न. कुलकर्णी व श्री. श. वि. बोर्गीकर यांचा व त्यांच्याबरोबर कार्य केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा मोठा सहभाग आहे. या सर्वांच्या प्रयत्नांमुळे या वटवृक्षाची एवढी वाढ झालेली आहे. याची आणखी वाढ होणेसाठी विद्यमान अध्यक्ष गणेशराव गाडगीळ व संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी वृंद या सर्वांनी कष्ट घेतलेले आहेत व घेत आहेत.



मराठवाड्यासारख्या भागातही बँकेने आपला लक्षणीय शाखा विस्तार करुन तिथल्या विकास कार्यात आपली मोलाची भूमिका पार पाडलेली आहे. बँकेच्या सर्व शाखा संगणकीकृत आहेत. बँकेने ८ एटीएममार्फत सेवा देत आहे. तसेच QR Code सेवाही चालू केली आहे. कर्ज वाढण्याच्या दृष्टीकोनातून कर्जवाढीसाठी निरनिराळ्या क्षेत्रात कर्जाचे वाटप होईल, असेही बँक व्यवस्थापनाने पाहिलेले आहे. यामुळे बँकेच्या व्यवसायाम ध्ये वाढ होत आहे. बँकेने चॅट बॉट (CHT- BOT) संकल्पना चालू केली आहे. याचा ग्राहकांना खूपच फायदा होत आहे व ग्राहकांना खात्याबद्दल त्यांच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे त्वरित माहिती मिळत आहे. ग्राहकांना घरबसल्या त्यांच्या खात्यावरील बॅलन्स, मिनी स्टेटमेंट,चेक बुक मागणी या सेवा उपलब्ध झाल्या आहेत. गृहकर्ज, कमर्शिअल




रिअल इस्टेट, MSME उद्योग, शैक्षणिक, वैद्यकीय, व्यवसाय, घरगुती सोलर कर्ज, कृषी व कृषीपूरक कर्ज, जिनिंग व्यवसाय, साखर उद्योग, सोलर फार्मिंग ,व्यापारी व औद्योगिक व्यवसायासाठी मालतारण कर्ज इत्यादी क्षेत्रात कर्ज वाटप केलेले आहे. तसेच नवनवीन योजना आणून यावरील व्याजदरही राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. गृहकर्ज, वाहन कर्ज, व्यापारी कर्ज, यांचा समावेश आहे.

बँकेकडे केंद्र व राज्य शासनाच्या विविध सबसिडी अंतर्गत कर्जपुरवठा केला आहे. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना(शहरी २.०), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री किसान उर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान, प्रधानमंत्री सुर्यघर योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, क्रेडीट लिंक्ड कॅपिटल सबिसिडी योजना, राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा सुविधा (नाबार्ड), राष्ट्रीय पशुधन अभियान यांचा समावेश आहे. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे बँकेने गेली ३ वर्षे व्यवस्थापन मंडळाची (बोर्ड ऑफ मॅनेजमेंट) ची संकल्पना यशस्वीपणे राबविली आहे. यामध्ये त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंचा त्यांच्या क्षेत्रातील अनुभवामुळे बँकेला कामकाजात व्यावसायिकता आणण्यासाठी उपयोग झाला आहे व होत आहे. बँकेचा सेवक हा प्रशिक्षीत पाहिजे यासाठी बँकेने अद्ययावत प्रशिक्षण केंद्र सुरु केले असून, विविध विषयांवर व तंत्रज्ञानावर आधारित असे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना दिले जाते. निवडणूकीपूर्वी दिलेली बहुतेक सर्व आश्वासने संचालक मंडळाने पूर्ण केलेली आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये बँकेस २४ कोटी २४ लाख इतका ढोबळ नफा झाला. मार्च २०२५ अखेर बँकेच्या नफ्यामध्ये निश्चितपणे आणखी वाढ होईल असा विश्वास सन्मा. अध्यक्षांनी व्यक्त केला आहे. तसेच सभासदांना डिव्हीडंड देणे यासाठी बँक प्रयत्नशील आहे व हे आर्थिक वर्ष पूर्ण झालेनंतर दिलेले आश्वासनही पूर्ण केले जाईल, असे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांची सूचित केले आहे. मागील वर्षी झालेल्या रक्तदान शिबिरांमध्ये एकूण ५५५ बाटल्या रक्तदान झाले. बँकेचे संस्थापक कै. म. ह. तथा अण्णा गोडबोले यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्याने, जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या महिलांचे सत्कार केलेले आहेत. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार चार जीवन विमा कंपन्या व तीन जनरल विमा कंपन्या व दोन आरोग्य विमा कंपनी यांच्याशी करार केला आहे. यामार्फत सभासद, कर्जदार, ग्राहकांचा विमा घेऊन त्यांच्या कुटुंबाला विमा संरक्षित करण्यात येत आहे.

**-प्रकाश बिरजे,** माजी संचालक,
सांगली अर्बन बँक

# कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंती विशेष

सोलापूर तरुण भारत
मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५

## शिक्षणतज्ज्ञ कर्मवीर मामासाहेब जगदाळे

कर्मवीर डॉक्टर मामासाहेब यांनी १९३४ साली सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहोचावी, चारित्र्यसंपन्न पिढी घडावी हाच उद्देश मामांचा होता.

मामा स्वतः शेतकरी होते. ते आजन्म वारकरी होते. पण टाळ मृदंगाच्या तालावर पंढरची वारी करण्यापेक्षा संत तुकारामांनी सांगितलेप्रमाणे- 'आम्ही घरी धन शब्दांचीच शस्त्रे यत्ने करु.' या विचारांचे मामांनी पालन केले. लहान असताना ते आळंदीला गेले. विठ्ठल चरणी आयुष्य समर्पित करावे हा त्यांचा विचार होता. परंतु त्यांच्या बहिणीने त्यांना या विचारापासून दूर केले.



मामा लहानपणापासूनच जिद्दी होते. खेडेगावातील मुलांना शिक्षणासाठी शहरात जावे लागते तेथे त्यांच्या राहण्याची सोय होत नाही. गोरगरीब मुलांसाठी त्यांनी एक-दोन विद्यार्थ्यांना सोबत घेवून एका बोर्डिंगपासून आपल्या शिक्षण सेवेचे काम सुरु केले. त्यातून पुढे 'श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी' ही महाराष्ट्रात नावाजलेली शिक्षण संस्था उभी केली.

मामांनी गावोगावी फिरुन धान्य गोळा करुन धान्य गोळा करुन लोकांच्या सहभागातून शाळा, महाविद्यालये व वसतीगृहे उभारली. एक चरित्रकार मामांविषयी लिहितात, 'मुलांनी पोतं घेऊन दारोदारी जावं व शेतकऱ्यांच्या बायकांनी सूप भरुन, टोपली भरुन धान्य पोत्यात टाकावं असं घडू लागलं. काही ठिशकाणी धान्यांने भरलेली पोतीच उचलून घेऊन जा म्हणणारे शेतकरी भेटले. स्वतःच्या बैलगाड्या जुंपून लोक धान्य बार्शीला आणून पोचवायची मदत करु लागले.' घेणारे हात निर्मळ असली की देणारे लाखो हात पुढे येतात हे कर्मवीर मामांनी महाराष्ट्राला दाखवून दिले.

कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी प्रथम शिवाजी वसतीगृहाची स्थापना केली. तीच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या नावाने संस्था रजिस्टर झाली. या सस्थेमार्फत प्राथमिक शाळा, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व विविध ठिकाणची वसतीगृहे स्थापन झाली.

शैक्षणिक कार्याबरोबरच कर्मवीर मामांनी अंधश्रद्धा निर्मूलन व जातीभेदाच्या उच्चाटनासाठी सुद्धा काम केले. त्याविषयी यशवंत इर्लेकर लिहितात, 'देवावर अंधश्रद्धा ठेवून दगडाच्या देवावर दह्या दुधाचा अभिषेक करणाऱ्या भाविकांवर त्यांचा राग होता. लहान मुलांना दूध, दही द्या. त्यांना शिक्षण देवून सुशिक्षित बनवा. देवळांना देणग्या देण्याऐवजी शिक्षण संस्थांना द्या, असा मामांचा आग्रह होता.'

संत सावता माळी यांनी जपलेली 'श्रमप्रतिष्ठा' मामांनी आपल्या वसतीगृहातील मुलांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांकडून श्रमदान करुन घेतले जाई. विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिक्षका ही योजनाही सुरु केली.

हर्बर्ट स्पेन्सर आपल्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात सांगतात- 'मनुष्य जितके कष्ट करील, तितकीच त्याची सहन शकती वाढील व त्या प्रमाणात तो सुदृढ व समर्थ होईल. भोजनात पौष्टिक, पाचक परंतु संतुलित आहारावर त्याने भर दिला आहे.' मामासाहेबांनी याही पुढे जावून आपल्या वसतीगृहात तर आहार, व्यायाम व श्रम यांची योग्य सांगड घातली होती. 'श्रमाशिवाय जेवण नाही' असे म्हणण्यास ही मामासाहेब कचरत नसत.

शिवाजी महाराज हे मामासाहेबांचे दैवत. संस्थेच्या आवारात भव्य असा पुतळा असावा अशी मामांची इच्छा होती. सर्वांनी सहकार्य करुन संस्थेच्या प्रांगणात भव्य असा अश्वारुढ शिव पुतळा उभा केला. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी बार्शीकरांना अश्वारुढ शिव पुतळ्याच्या रुपाने एक स्फूर्तीचा झरा आणि रयत राज्याचा चिरकाल टिकणारा दीपस्तंभ बहाल केला.

गरिबांसाठी अत्याधुनिक हॉस्पिटल असावे ही मामांची इच्छा होती. ते स्वप्न त्यांनी अविरत कष्टाने पूर्ण केले. बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांना श्रमदानातून इमारत उभी केली. बार्शीत अत्याधुनिक व स्वस्त असे 'कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे हॉस्पिटल' उभा आहे. हे हॉस्पिटल गोरगरिबांची खरीखुरी सावली बनले आहे.

मामांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कृषी, वैद्यकीय क्षेत्रातल्या योगदानाची दखल त्यावेळी दोन विद्यापीठांनी घेतली. त्यांच्या कामाचा गौरव केला. मराठवाडा विद्यापीठ औरंगाणाद या विद्यापीठाने मामांना 'डी. लीट' ही पदवी देण्याचे जाहीर केले. त्यावेळी मामासाहेब अर्धांगवायूच्या आजाराने ग्रस्त होते. हे पदवीदान समारंभ हजर राहू शकत नव्हते. त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. बी.आर. भोसले, विद्यापीठाच्या विधी विभागाचे डीन सुखदेव शेळके, विद्यापीठ कार्यकारिणीचे मान्यवर सदस्यांनी बार्शीला येवून ही पदवी २४ फेब्रुवारी १९८० रोजी सन्मानपूर्वक मामांना प्रदान केली. त्यानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठाने ही मामांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली.

सन १९९० मध्येच संस्थेचे संस्थापक कै. कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे यांचा ४ फेब्रुवारी हा जयंती दिवस 'समाजदिन' म्हणून भव्य स्वरुपात साजरा करण्याचे संस्थेने ठरवले व त्या वर्षीपासून या दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. त्यानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात.

समाजदिनानिमित्त ४ फेब्रुवारी रोजी भव्य मिरवणूक बार्शी शहरातून काढली जाते. पूज्य मामांच्या पुतळ्याला अभिवादन करुन मिळवणुकीस प्रारंभ होतो. मिरवणुकीत समाज प्रबोधनाच्या विषयास अनुरुप चित्ररथ, कलापथक, कसरती, लेझीम पथक, झांज पथक, टिपरी पथक इत्यादी नाविन्यपूर्व पथके असतात. ही मिरवणूक पाहण्यासाठी लोकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळातो. असे हे डॉक्टर कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे शिक्षणतज्ज्ञ अणि समाज सुधारक म्हणून असलेले विलक्षण व्यक्तीमत्त्व. ते बहुजन समाजाचे चालते बोलते लोकविद्यापीठ होते. ४ फेब्रुवारी रोजी मामांची जयंती आहे. जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**प्रा. सौ. प्रेरणा स्व. पाटील**
महाराष्ट्र माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, बार्शी

---

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ॥

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**

यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा व विनम्र अभिवादन!



✻ अभिवादक ✻

**प्राचार्य डॉ. दीपक गुंड व सर्व स्टाफ**
(शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी, जि. सोलापूर)

---

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ॥



**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी.**



✻ निमंत्रण पत्रिका ✻



**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**

१२२ वी जयंती सोहळा

उजळावा आलो वाटा । खरा खोटा निवाडा ॥

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे 'समाजदिन'**

मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ वाजता

**बार्शी शहरातून जनजागरण भव्य मिरवणूक**

**मुख्य कार्यक्रम**

मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ दुपारी ४ वाजता

✻ प्रमुख पाहुणे ✻
मा. डॉ. अशोक चौसाळकर
विचारवंत, राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

✻ अध्यक्ष ✻
मा. श्री. बाबा भांड
सुप्रसिध्द साहित्यिक, प्रकाशक (छत्रपती नगर)

✻ सन्माननीय उपस्थिती ✻
मा. श्री. दिलीप सोपल — आमदार, बार्शी
मा. श्री. ओम राजेनिंबाळकर — खासदार, धाराशिव
मा. श्री. राजेंद्र राऊत — माजीआमदार बार्शी

या कार्यक्रमात वीरमाता, वीरपत्नी यांचा सत्कार करण्यात येईल. कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

स्थळ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**
**समाज परिवर्तन गौरव पुरस्कार प्रदान सोहळा**

बुधवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ सकाळी १० वाजता

✻ शुभहस्ते तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
मा. श्री. हरिभाऊ बागडे (मा. राज्यपाल, राजस्थान)

✻ पुरस्कारार्थी ✻
पद्मविभूषण मा. प्रो. रघुनाथ माशेलकर (माजी महासंचालक, विज्ञान आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली)
पद्मविभूषण मा. प्रो. अनिल काकोडकर (संचालक, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान परिषद, मुंबई)

✻ सन्माननीय उपस्थिती ✻
मा. श्री. दिलीप सोपल — आमदार, बार्शी
मा. श्री. ओम राजेनिंबाळकर — खासदार, धाराशिव
मा. श्री. राजेंद्र राऊत — माजी आमदार बार्शी

✻ आपले विनित ✻
श्री. प्रकाश पाटील — जनरल सेक्रेटरी
श्री. नंदकुमार जगदाळे — उपाध्यक्ष
डॉ. बी. वाय. यादव — अध्यक्ष
श्री. अरुण देबडवार — जॉईंट सेक्रेटरी
श्री. जयकुमार शितोळे — (खजिनदार व चेअरमन, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग)

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी**

स्थळ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

---

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ॥

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**

यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



✻ अभिवादक ✻

श्री. डी. एम. मोहिते (चेअरमन, शालेय समिती)
श्री. प्रफुल्ल ओमन (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती)
श्री. सागर गरड (उपाध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती)

सर्व सदस्य, (शा. व्य. व शा. स.) शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी

**लोकसेवा माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, आगळगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर**

---

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ॥



**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**

यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन!



✻ अभिवादक ✻

**श्री. दयानंद श्रीरंग रेवडकर**
मुख्याध्यापक
वखारिया विद्यालय, उपळे दुमाला, ता. बार्शी, जि. सोलापूर

---

### डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्याबद्दल माहिती

- कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हे समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांचा जन्म ४ फेब्रुवारी, १९०३ रोजी झाला होता. ते श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक होते.
- ते बहुजनांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करत होते.
- त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून प्रेरणा घेतली.
- सोलापूर येथील राज्य विद्यापीठाला कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ग्रंथालय असे नाव आहे.
- त्यांचे नाव बहुजनांच्या शिक्षणाचे कैवारी म्हणून घेतले जाते.
- त्यांनी केवळ चारित्र्य आणि लोकांचा विश्वास या बळावर महत्त्वाचे काम केले.
- गरीब व होतकरू मुलांना मोफत शिक्षण दिले पाहिजे, पैशावाचून बहुजनांच्या मुलांचे शिक्षण थांबले नाही पाहिजे यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. त्यामागे उदात्त ध्येयवाद, त्याग व सेवा तसेच कामाची तळमळ व निष्ठा या गोष्टी होत्या. काम करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक रोजगार देत जेणेकरून त्या विद्यार्थ्याला आणि संस्थेला मदत होईल. बहुजनांच्या शिक्षणाचे कैवारी म्हणून केला जातो.

---

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरु सुपंथ ॥



**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे**

यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन!

✻ अभिवादक ✻



प्रा. डॉ. राहुल भगवान पालके
सहा. प्राध्यापक, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

---

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळेंच्या जयंतनिमित्त हार्दिक शुभेच्छा

**न्यू त्रिमूर्ती फर्निचर्स & इलेक्ट्रॉनिक्स**





प्रोप्रा. बप्पा जगदाळे
मो.- ९८२२५२६५७२
७५०७६४३४३५

सर्व प्रकारचे रेडिमेड फर्निचर्स व
इलेक्ट्रीकल्स, टी.व्ही., फ्रीज, एलईडी, कुलर इ.
७८४/२, तानाजी चौक, बार्शी- ४१३४११, जि. सोलापूर.

## अग्रलेख...

# व्यापारयुद्धाचे रणशिंग?

पाच वर्षांपूर्वी, २०१९ मध्ये अमेरिकेच्या 'नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च' या संस्थेने 'अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि व्यापारयुद्ध' नावाचा एक अहवाल प्रसृत केला आणि संपूर्ण जगात या अहवालाची चर्चा सुरू झाली. अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापारयुद्ध पेटले तर ते अमेरिकेच्या हिताचे ठरणार नाही, असे मत अमेरिकेतील काही आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनी तयार केलेल्या या अहवालात नमूद केले. कारण २०१८ मधील व्यापारयुद्धामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेस जवळपास ५४ हजार कोटी रुपयांचा फटका बसला होता. साहजिकच या अहवालामुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्धास विराम मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आणि मंदीच्या भीतीने धास्तावलेल्या जगाने काहीसा सुटकेचा सुस्कारा सोडला. एकीकडे चीनसोबतच्या व्यापारयुद्धाची चिन्हे मावळत असतानाच, भारतासोबतच्या व्यापार धोरणात अमेरिकेकडून काही बदल घडविले जाण्याची चर्चाही सुरू झाली होती. विकसनशील देशाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावण्यासाठी त्या देशांकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर कर न लावण्याच्या अमेरिकेच्या तेव्हाच्या धोरणातून अमेरिकेने भारतास वगळल्याने भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर मिळणारी जवळपास ४० हजार कोटी रुपयांची सवलत यामुळे बंद झाली, पण चीनसोबतच्या व्यापारयुद्धाचा परिणाम म्हणून भारताची अमेरिकेतील निर्यात वाढल्याने भारताचा फायदाच झाला, असेही स्पष्ट झाले. त्या अगोदरच्या वर्षात भारताकडून चीन व अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीमध्ये मोठी वाढ झाली होती. भारतातून चीनमध्ये होणाऱ्या निर्यातीत सुमारे ३२ टक्के तर अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीत सुमारे १२ टक्के वाढ झाल्याची नोंद युनायटेड कॉन्फरन्स ऑन ट्रेड अॅण्ड डेव्हलपमेंट (यूएनसीटीएडी) ने त्यावर्षी प्रसिद्ध केलेल्या 'द ट्रेड वॉर : पेन अॅण्ड गेन' नावाच्या अहवालात करण्यात आली होती. आपल्या राष्ट्राच्या अर्थनीतीस बाधा येईल असे कोणतेही व्यापारी हितसंबंध सातत्याने जपत अन्य देशांसोबतची मैत्री कायम राखण्याची अमेरिकेची नीती कधीच नव्हती. साहजिकच अमेरिकेच्या अध्यक्षपदाची नव्याने सूत्रे स्वीकारताना डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या 'राष्ट्र प्रथम' या घोषणेनुसार अमेरिकेची नवी अर्थनीती स्पष्ट होऊ लागली असून, ट्रम्प यांनी शनिवारी समाजमाध्यमांवरून केलेल्या घोषणेत या नीतीचेच प्रतिबिंब उमटले आहे.

चीन, मेक्सिको आणि कॅनडा या देशांतून होणाऱ्या आयातीवर भरमसाट आयात कर लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केल्यावर पाच वर्षांपूर्वीच्या अमेरिका-चीन यांच्यातील व्यापारयुद्धाच्या सावटामुळे जगावर दाटलेले मंदीच्या भीतीचे सावट आता पुन्हा एकदा गडद होऊ पाहात आहे. देशांतर्गत वस्तूंच्या बाजारपेठांना आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण झाल्यास या वस्तू अशा स्पर्धेत टिकाव धरू शकत नाहीत, त्यामुळे आयातीद्वारे देशात येणाऱ्या वस्तूंवर आयात कर वाढविल्यास त्यांच्या किमती वाढून देशी उत्पादने त्यांच्याशी किमतींची स्पर्धा करू शकतील व त्यांची मागणी वाढून देशांतर्गत उत्पादनांना व बाजारपेठेस चालना मिळेल, हा आयात कर वाढविण्याच्या धोरणाचा स्पष्ट अर्थ असतो. ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे होती घेतली, त्याच्या आधीपासूनच त्यांच्या या नीतीची चाहूल जागतिक अर्थविश्वाला लागलेली होती. त्यामुळे आता त्यांनी उचललेले हे पाऊल जागतिक अर्थव्यवस्थेवर कोणता परिणाम घडवू शकते, याचे वेगवेगळे आडाखे सुरू झाले आहेत. ट्रम्प यांच्या निर्णयास आव्हान देण्यासाठी मेक्सिको आणि कॅनडानेही अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवरील आयात कर वाढविण्याचा निर्णय घेऊन व्यापारयुद्धात अमेरिकेसमोर उभे राहण्याची तयारी सुरू केली आहे. असेच पाऊल चीनने उचलले तर हे व्यापारयुद्ध जागतिक पातळीवर भडकेल आणि जगातील या दोन बलाढ्य अर्थव्यवस्थांमधील संघर्षातून जागतिक अर्थव्यवस्था डळमळीत होईल, अशी भीती वर्तविली जात आहे. जेव्हा एखादा देश आपल्या देशातील उत्पादनांच्या बाजारपेठेस संरक्षण देण्याच्या हेतूने अन्य देशांकडून होणाऱ्या आयातीवरील शुल्क वाढवितो, तेव्हा ते देशदेखील आयात शुल्क वाढवितात. अशा प्रकारे व्यापारयुद्धे भडकतात आणि महागाई वाढून त्याच्या झळा जागतिक पातळीवर पोहोचतात. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळातही 'अमेरिका फर्स्ट' हेच धोरण अवलंबिले होते. नव्या सत्ताकाळातही त्यांचे हेच धोरण राहील हे त्यांच्या सत्ताग्रहणाआधीच जगाला माहीत झाले होते. भारतासोबतचे त्यांचे याबाबतचे धोरण अजून पुरेसे स्पष्ट झालेले नसले, तरी हर्ले डेव्हिडसन वादात त्यांची भूमिका उघड झालेली असल्याने ट्रम्प यांनी नव्या कार्यकाळात कॅनडा, चीनप्रमाणे भारताबाबतही असेच आयात धोरण स्वीकारले तर भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नावर त्याचा परिणाम होऊ शकतो. कारण अशा धोरणामुळे भारतात आयात होणाऱ्या वस्तूंच्या किमती भरमसाट वाढतील व त्याचा ग्राहक असलेल्या सामान्य नागरिकांच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका सोसावा लागेल.

अमेरिकेच्या नव्या व्हिसा धोरणामुळे जगातील अनेक देशांत अगोदरच चलबिचल सुरू झालेली आहे. अनधिकृतपणे देशात वास्तव्य करणाऱ्यांना अमेरिकेबाहेर पडावे लागेल हे स्पष्ट होऊ लागल्यामुळे तेथील अनेक अनधिकृत रहिवाशांनी परतीच्या वाटा शोधण्यास सुरुवातही केली आहे. देशातील सर्व संधी स्थानिक नागरिकांस मिळाव्यात व त्यातून स्थानिक जनतेच्या जीवनमानाचा आलेख अधिक उंचावावा या धोरणात गैर काहीच नाही. अवैधपणे वास्तव्य करणारे परदेशी नागरिक स्थानिक नागरिकांच्या रोजगारांच्या संधींवर डल्ला मारत असल्याने बेरोजगारीसारख्या समस्यांची तीव्रता वाढते. त्यामुळे ट्रम्प यांच्या या धोरणास अमेरिकेतून व्यापक पाठिंबा मिळेल व त्याचा राजकीय फायदा मिळून त्यांची लोकप्रियता आणखी वाढेल, हे या धोरणामागचे गणित आहे. अर्थात्, अमेरिकेतील आयात वस्तूंवर कर वाढविल्यामुळे तेथेही या वस्तू महाग होऊन सामान्यांच्या खिशाला त्याचा भार सोसावा लागणार आहे. अमेरिकेतील महागाई वाढण्याची शक्यता असून, महागाईवर नियंत्रण आणण्याच्या ट्रम्प यांच्या आश्वासनास या धोरणामुळे आव्हान मिळेल, अशीही शक्यता आहे. या धोरणाचे जागतिक परिणाम अमेरिकेतही पाहावयास मिळणार आहेत. मेक्सिको आणि कॅनडामधून अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची निर्यात होत असते. गेल्या वर्षी अमेरिकेने सुमारे ८६ अब्ज डॉलरचा कृषिमाल आयात केला होता. नव्या धोरणानंतर या आयातीकरिता अमेरिकेस अधिक पैसा मोजावा लागेल व त्याचा भार सामान्य ग्राहकांवरच पडणार असल्याने महागाईचे दुष्टचक्र जनतेवरच कोसळेल. कारण यातून कुटुंबांचा अर्थसंकल्प कोलमडणार आहे. केवळ शेतीमालच नव्हे, अमेरिकेच्या यांत्रिक वाहने आणि ऊर्जा क्षेत्रावरही या धोरणाचा परिणाम संभवतो. अमेरिकेचा वाहन उद्योग प्रामुख्याने कॅनडामधून होणाऱ्या आयातीवरच अवलंबून असून तेथून होणारी आयात महागल्यास वाहने महागतील व अमेरिकेतील बड्या वाहन उद्योगांना त्यांची झळ सोसावी लागेल. हाच फटका ऊर्जा क्षेत्रालाही सोसावा लागणार आहे. ऊर्जा निर्मिती क्षेत्रात आवश्यक असलेल्या कच्च्या तेलासाठी अमेरिका प्रामुख्याने कॅनडावरच अवलंबून आहे. आयात शुल्क महागल्यास कच्चे तेल महागेल आणि अमेरिकेची ऊर्जा सुरक्षा संकटात सापडेल, अशी भीती तेथील या क्षेत्रातील जाणकार आता व्यक्त करू लागले आहेत. त्यामुळे 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचा भाग म्हणून ट्रम्प यांनी उचललेल्या या पावलांमुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल अडखळू शकते. व्यापारयुद्धाच्या या संघर्षात अमेरिकेसमोर उभे राहण्याची तयारी चीन, कॅनडाकडून सुरू आहे. चीनने तर ट्रम्प यांच्या या बेधडक नीतीला जागतिक व्यापार संघटनेत आव्हान देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत, तर कॅनडा, मेक्सिकोने अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवरील कर वाढविला आहे. या युद्धात आता ट्रम्प यांनी रणशिंग तर फुंकले आहे, पण त्याच्या झळा सोसाव्या लागतील तेव्हा माघारीचे मार्गदेखील आधीच आखून ठेवावे लागतात. धोरणे मवाळ करण्याची नीती अवलंबून पुन्हा एकदा नवा मोठेपणा पदरात घेण्याचा ट्रम्प यांचा इरादा असू शकतो. व्यापारयुद्धाच्या झळा तीव्र होऊ लागल्या की तसेही काही घडण्याची शक्यता राखून ठेवलेली असेलच!

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# वाखान कॉरिडोर : एक संवेदनशील बफर पट्टी

गेल्या काही दशकांत भारताशी सतत युद्ध करून हरणारा पाकिस्तान एका नव्या युद्धाला सामोरे जाण्याची तयारी करतो आहे, असे वृत्त आहे. पाकिस्तान आजवर भारताच्या विरोधात दहशतवादी उभे करीत आला आहे. हे करीत असताना तो कंगाल झाला, पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही. हे दहशतवादी आता त्याच्यावरच उलटले आहेत. अमेरिकेलाही यांना आवरणे शक्य झाले नाही. त्यांना म्हणजे अफगाणी पख्तूनांना संपविण्यासाठी पाकिस्तान युद्ध पुकारण्याचा विचार करतो आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवर सातत्याने अफगाणिस्तानचे दहशतवादी हल्ले करीत आहेत. जे पाकिस्तानने भारतासोबत केले तेच आता त्यांच्यासोबत होऊ लागले आहे. अफगाणिस्तानचे दहशतवादी एका मागोमाग एक हल्ले करून पाकिस्तानला बेजार करीत आहेत. अफगाणी (पख्तून) घुसखोर पाकिस्तानमधील पख्तूनबहुल भागात घुसखोरीही करतात, असा पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर आरोप आहे. यामुळे पाकिस्तानला आता या तालिबानी दहशतवाद्यांशी युद्ध करावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच पाकिस्तानने अमेरिका-अफगाणिस्तान सोडून जात असताना याच तालिबान्यांना आश्रय दिला होता, त्यांना प्रशिक्षण दिले होते, त्यांना पुन्हा अफगाणिस्तानमध्ये पाठविले होते. अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यानंतर आता हेच दहशतवादी पुन्हा पाकिस्तान सीमेवर आले आहेत. त्यांचा पाकिस्तानवर आरोप आहे की, काही अफगाण प्रदेश पाकिस्तानने बळकावला आहे, तो परत मिळावा म्हणून तालिबान्यांची धडपड चालू आहे.

निर्मितीपासूनच पाकिस्तान भारताबरोबर कुरापती काढत आला आहे. भारताविरोधात दहशतवादाला पोसण्यातच पाकच्या कूटनीतिज्ञांचा वेळ खर्च होत आला आहे. पण हे तालिबानी दहशतवादी आता खुद्द पाकिस्तानलाच बेजार करू लागल्यामुळे त्यांना संपविण्यासाठीच युद्ध पुकारण्याची वेळ पाकिस्तानवर आली आहे. यामुळे पाकिस्तानला आता या तालिबानशीच दोन हात करावे लागणार, अशी स्थिती निर्माण होते आहे. तालिबानी दहशतवाद्यांविरोधी करावयाच्या कारवाईची सुरुवात म्हणून पाकिस्तानने वाखान कॉरिडोर ही चिंचोळी पट्टी ताब्यात घेण्याच्या विचारात आहे. कॉरिडोर ही पट्टी ब्रिटिश मुत्सद्दी ड्युरॅण्ड यांनी रशियन वर्चस्वाखालील प्रदेश आणि ब्रिटिश साम्राज्यातील प्रदेश यांच्या सीमा एकमेकींना स्पर्श करू नयेत, म्हणून निर्माण केलेली कृत्रिम चिंचोळी बफर पट्टी आहे. दोन महासत्तांमध्ये असा चिंचोळा भाग असल्यास त्या दोन महासत्तांत संघर्षाचे प्रसंग आणि मुद्दे निर्माण होत नाहीत. आज हा भूभाग अफगाणिस्तानचा हिस्सा आहे. तो आज ताजिकिस्तान आणि पाकिस्तान यांना वेगळा करतो आहे. बफर स्टेटमध्ये दोन्ही महासत्तांच्या सेना असत नाहीत. त्यामुळे दोन महाशक्तींचा परस्पर संपर्कच होत नाही. काही वादाचे मुद्दे निर्माण झाले तर चर्चा करून त्यांचा निपटारा करणे शक्य होते आणि बहुधा त्या दोन देशांत युद्धासारखी परिस्थिती निर्माण होत नाही.

वाखान कॉरिडोर ही जमिनीची चिंचोळी पट्टी मानव निर्मित आहे. हा चिंचोळा भूभाग अफगाणिस्तानच्या बादखशान प्रांताचा हिस्सा आहे. हिच्या एका बाजूला आज जो ताजिकिस्तान देश आहे, तो भूभाग एकेकाळी सोव्हिएत रशियाचा भाग होता. पट्टीच्या दुसऱ्या बाजूला आज पाकिस्तानचा खैबर पख्तूनख्वा आणि गिलगिट-बाल्टिस्तान प्रांत आहे. हा संपूर्ण भाग आज जरी व्याप्त असला, तरी एकेकाळी हा भूभाग ब्रिटिशांच्या होता. यातील गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश काश्मीरचा भाग असून आज तो व्याप्त काश्मीरमध्ये येतो. ही पट्टी समुद्रसपाटीपासून ४९२३ मीटर उंच आहे.

क्षाखान हा भूभाग आज पाकिस्तानमध्ये अचानक चर्चेत आला आहे. हा चिंचोळा भूभाग अफगाणिस्तानच्या नकाशात शेपटीसारखा उठून दिसतो. ती ३५० किलोमीटर लांब आणि ३४ किलोमीटर रुंद आहे. आजची भूराजकीय स्थिती सांगायची तर या पट्टीच्या उत्तरेला ताजिकिस्तान, दक्षिणेला पाकिस्तान (ज्यात व्याप्त काश्मीर आहे) आणि दूर पूर्वेला चीन आहे. हे सर्व भौगोलिक विशेष असलेली ही पट्टी आज जगातला एक संघर्ष बिंदू म्हणून पुढे येते आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यातील तणावयुक्त भूभाग म्हणून वाखान पट्टीकडे भारत पाहू शकत नाही. कारण पट्टी व्याप्त काश्मीरला लागून आहे. त्यामुळे हा मुद्दा भारतासाठीही महत्त्वाचा ठरतो. आज भारताचे ताजिकिस्तानशी सामरिक, सामंजस्याचे आणि घनिष्ठ संबंध आहेत. १९९५ ते २०१६ या काळात ताजिकिस्तानचे अध्यक्ष एमोमाली यांनी सहा वेळा भारताला भेट दिली आहे. अफगाणिस्तानमध्ये सत्ताबदल झाल्यानंतर तालिबानी राजवटीशीही भारताचे स्नेहाचे संबंध निर्माण होत आहेत. याबाबत पुढाकार तालिबानी राजवटीने घेतला आहे, हे विशेष.

ब्रिटिश मुत्सद्दी ड्युरॅण्ड यांच्या प्रयत्नातून आखल्या गेलेल्या ड्युरॅण्ड रेषेला अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधली सीमा म्हणून ओळखले जाते. ही २,६४० किलोमीटर (१,६४० मैल) लांब आहे. हिचे पश्चिम टोक इराणच्या सीमेपर्यंत आणि पूर्वेकडील टोक चीनच्या सीमेपर्यंत जाते. आज निर्माण झालेली समस्या अफगाणिस्तानच्या ईशान्य आणि दक्षिणेकडील प्रांतांमधून खैबर पख्तूनख्वा, बलुचिस्तान आणि उत्तर आणि पश्चिम पाकिस्तानच्या गिलगिट-बाल्टिस्तानच्या (व्याप्त काश्मीर) प्रदेशाचे सीमांकन न होणे यामुळे आहे. ड्युरॅण्ड लाईनशी ही समस्या संबंधित नाही. वाखान कॉरिडोर हा त्या प्रदेशातील संभाव्य संघर्ष बिंदू म्हणून समोर येतो आहे. मुख्य म्हणजे ही भारताची चिंता वाढविणारी बाब ठरते आहे. अफगाणिस्तानमधील तालिबानी राजवट भारताशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यास उत्सुक आहे. भारत आणि चीन यांच्यातील आजचे संबंध पाहता वाखान पट्टी आहे तशीच राहणे महत्त्वाचे आहे. पाकिस्तानने तिरिमिरीत येऊन ही पट्टी नष्ट केली तर नव्याने सीमांकन होईल. महासत्तांच्या सीमा नव्याने एकमेकींना भिडतील. पाकिस्तान मध्य आशियाशी जोडले गेले तर ते पाकिस्तानला हवे आहे, पण ही बाब भारतासाठी सोयीची नाही. त्यामुळे या क्षेत्रात संघर्ष उभा झाला तर भारत बघ्याची भूमिका घेऊ शकणार नाही.

पाकिस्तानच्या वृत्तसृष्टीत सध्या हा विषय चविष्टपणे हाताळला जातो आहे. ताजिकिस्तान आणि पाकिस्तानमध्ये आडवी असलेली अफगाणिस्तानची ही शेपटीसदृश पट्टी नष्ट करावी आणि तिचे रूपांतर एका नवीन व्यापारी मार्गात करावे, असा विषय आग्रहाने पुढे आणला जातो आहे. असे झाल्यास अफगाणिस्तानचा चीनशी आज असलेला संबंधच संपेल. अशाप्रकारे मध्य आशियाला जोडणारा नवीन व्यापारी मार्ग तयार झाला तर पाकिस्तानची आर्थिक दुरवस्था दूर होईल, असा विश्वास पाक वृत्तसृष्टीत व्यक्त केला जातो आहे. भारताने ताजिकिस्तानमध्ये बऱ्यापैकी गुंतवणूक केली आहे. या दोन देशांत उभयपक्षी उपयोगी पडावेत असे सामरिक हितसंबंधही निर्माण झाले आहेत. पाकिस्तानने वाखान कॉरिडोर नष्ट करण्याचे दु:साहस केले तर भारत बघ्याची भूमिका घेऊ शकणार नाही.

९४२२८०४४३०

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# घटनेचा आत्मा समान नागरी कायदा

भारत हा जगामधील एक उदार आणि धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. देशामध्ये जर खरी धर्मनिरपेक्षता टिकवून एकतेच्या दिशेने वाटचाल करायची असेल तर त्यासाठी देशात समान नागरी कायदा अमलात आणण्याची नितांत आवश्यकता असल्याचे अनेकांचे मत आहे. विविधतेने नटलेल्या या देशामध्ये सर्वांसाठी कायद्याचे एक समान सूत्र असावे हा मूळ उद्देशच समान नागरी कायद्यामध्ये समाविष्ट आहे. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये ही बाब स्पष्टपणे नमूद असतानाही देशावर सर्वाधिक राज्य करणाऱ्या काँग्रेसला हा कायदा करण्याची सुबुद्धी सुचली नाही, हे देशाचे दुर्दैव. सत्तेसाठी विशिष्ट समाजाचे लांगूलचालन अन् हिंदूंचा विखारी द्वेष करणे यातच काँग्रेस पक्षाने आपले उभे आयुष्य खर्ची घातले. अजूनही तीच री ओढण्यात काँग्रेस पक्ष धन्यता मानत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस म्हणजेच संपूर्ण देश अन् देश म्हणजेच काँग्रेस हे समीकरण पक्के ठरले होते. त्यामध्ये सामान्य जनतेच्या मताला काडीचीही किंमत नव्हती. त्यामुळे या देशाच्या वाट्याला जो भोग आला; तो भोग देशाने म्हणजेच पर्यायाने जनतेने भोगला. काँग्रेसचा स्वार्थीपणा आणि दुटप्पी धोरणामुळे या देशाचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले. काँग्रेसचा हा ढोंगीपणा ओळखण्यात जनतेलाही सहा दशके लागली. राष्ट्र म्हणजे निव्वळ जमिनीचा एक तुकडा मानणाऱ्या काँग्रेसच्या काळामध्ये भोगवादही चरमसीमेवर पोहोचला होता. या देशावर राज्य करण्याची फक्त आमचीच लायकी या अहंपणाने काँग्रेस पक्ष पछाडल्याने त्या पक्षाची गतही भरकटलेल्या जहाजासारखी झाली आहे. परंतु, सन २०१४ पासून बदललेल्या



राजकीय परिस्थितीमुळे देशामध्ये समान नागरी कायदा लागू होण्याची शक्यता बळावली आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने १९८५, १९९५ आणि २००३ मध्ये वेगवेगळ्या प्रकरणांमधील निवाड्यामध्ये देशामध्ये समान नागरी कायदा अमलात आणावा, असा निर्देश भारत सरकारला दिला आहे. भारतीय राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक अभिसरणासाठी अशा कायद्याची नितांत गरज असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त सर्व निवाड्यांमधून स्पष्ट होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक सुधारणा व समानतेची चळवळ सुरू होती. भारतीय राज्य घटनेमध्ये धर्म, जात, पंथ, भाषा व लिंग या सर्वांना छेद देऊन समान नागरिकत्व सर्वांना बहाल केले आहे. कायद्याचे राज्य हे भारतीय लोकशाहीचे अधिष्ठान आहे. देशामधील सर्व नागरिक धर्म किंवा रूढी-परंपरेने नव्हे, तर समान कायद्याने बांधलेले आहेत. त्यामुळे सर्वांना एकच कायदा ही संकल्पना आणि याच संकल्पनेतून समान नागरी कायद्याची संकल्पना उदयास येते. भारतीय घटनेतील कलम १४ प्रमाणे सर्व नागरिक कायद्यासमोर समान आहेत. तसेच घटनेमधील कलम १५ नुसार शासनाद्वारे कोणत्याही नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात व लिंग याद्वारे भेद करता येणार नाही. घटनेमधील कलम २५ द्वारे प्रत्येकास जरी धर्मस्वातंत्र्य असले, तरी या धर्मस्वातंत्र्याच्या आधारे काही भूमिका घटनेमधील कलम १४ व १५ मधील तरतुदी कलम २५ मधील तरतुदींना छेद देऊ शकतात. त्यावेळी कलम १४ आणि १५ प्रभावी ठरतील, असे सर्वोच्च न्यायालयाचा निकाल सांगतो. त्यामुळे समान नागरी कायद्याला धर्माच्या व धार्मिक रूढीच्या आधारे विरोध करता येऊ शकत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समान नागरी कायद्याच्या गरजेवर भर दिल्यानंतर अनेक राज्यांनी विशेषतः भाजपाशासित राज्यांनी समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीने समित्या स्थापन करणे, मसुदे तयार करणे व जनतेकडून सूचना मागविणे अशा विविध प्रक्रिया सुरू केल्या आहेत. या प्रयत्नामध्ये उत्तराखंड हे राज्य खऱ्या अर्थाने समान नागरी कायदा लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे. उत्तराखंड सरकारने या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशीनुसार हा कायदा लागू केला आहे. या नव्या समान नागरी कायद्यामुळे राज्यातील सर्व नागरिकांची विवाह नोंदणी, घटस्फोट, वारसा हक्क, लिव्ह इन रिलेशनशिप यासारख्या नोंदणीविषयक बाबीमध्ये अनेक बदल केले जाणार आहेत. आपल्या सवयीप्रमाणे काँग्रेसने तेथेही या कायद्यास असंवैधानिक म्हणत सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयानेच या आधी अनेक वेळा समान नागरी कायदा लागू करण्यावर भर दिला असल्यामुळे काँग्रेसच्या या सर्व प्रयत्नावर पाणी फेरले गेले.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# कृत्रिम बुद्धिमत्ता : उपयोग आणि आवश्यकता

गेल्या वर्षाअखेर म्हणजेच २ ते ४ डिसेंबर २०२४ दरम्यान बेलग्रेड येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आयोजित करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा वैचारिक परिषदेचे आयोजन केल्याने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : उपयोग आणि त्याची व्यावसायिक आवश्यकता' या विषयावर व्यापक चर्चा झाली. याचाच पाठपुरावा म्हणून केंद्र सरकारच्या तंत्रज्ञान व उच्च-शिक्षण विभागातर्फे २०२५ वर्ष हे 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' म्हणून पाळण्याचा व त्यानिमित्ताने विविध कार्यक्रम-उपक्रमांचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण व धोरणात्मक निर्णय घेतल्याने या विषयाचे महत्त्व नव्या संदर्भात अधोरेखित झाले आहे.

याचाच एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून केंद्र सरकारच्या वाणिज्य उद्योग व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे 'कृत्रिम बुद्धिमत्ता-सर्वांसाठी' नावाचे अभिनव अभियान हाती घेण्यात आले आहे. यामध्ये केवळ उद्योग-व्यापार व व्यवसाय यांच्याशीच नव्हे, तर समाजातील सर्व क्षेत्रांना समाविष्ट करून घेतले जाणार आहे हे विशेष. यामध्ये मेट्रो-महानगरांपासून शहर-गाव व ग्रामीण क्षेत्राचा अंतर्भाव केला जाणार आहे. त्यामुळेच भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता प्रसार-प्रचार व उपयोग करताना आरोग्य व वैद्यक सेवा, कृषी व संबंधित क्षेत्र, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने विशेषतः ग्रामीण क्षेत्रात प्रभावी संवाद-संपर्क निर्माण करणे व वैद्यकीय सेवांसह विविध साधनांना बळकटी देणे इ. शक्य होणार आहे.

यासंदर्भात कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडित व नुकताच साध्य झालेला उपक्रम म्हणून 'किसान-ई-मित्र' याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. यामध्ये विविध भौगोलिक क्षेत्रातील व विविध प्रकारे आणि विविध प्रकारची शेती व फलोत्पादन, भाजीपाला लागवड विविध प्रकारचे वातावरण, शेतजमीन व पर्जन्यमानासह करणाऱ्या शेतकऱ्यांना थेट व संवादासह सल्ला-मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे हे विशेष. मुख्य म्हणजे असा थेट सल्ला मिळण्यासाठी पुरेसे ठरणार असल्याने त्याच्या वापरामध्ये संबंधित शेतकऱ्याला सुलभता लाभणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे इच्छित व अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे जी विशेष उपाययोजना केली आहे त्यामधील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे-

**कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी क्षमता विकास** : उपाययोजना : कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक स्वरूपात वापर करण्यासाठी आवश्यक ते मूलभूत सुविधा तंत्रज्ञान व कौशल्य उपलब्ध करून त्याद्वारा क्षमता विकास साधणे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेला कल्पकतेची जोड** : कृत्रिम बुद्धिमत्तेला भारतीय व देशी शिक्षण-संशोधनाची जोड देण्यासाठी कल्पकतापूर्ण विकास केंद्रांची स्थापना करणे.

**माहिती संचय संग्रहाचा प्रगत वापर** : संगणकीय पद्धती व माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे प्रगत कार्यपद्धतीचा विकास व वापर करणे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेची विकासाशी सांगड घालणे** : भारताची सध्याची विकसनशील स्थिती व नजीकच्या काळातील विकासाचा वेग याचा अद्ययावत ताळमेळ घालणे.

**कौशल्य विकासात वाढ साधणे** : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने त्या नव्या व प्रगतिशील कौशल्य विकासाला गतिमान करणे.

**नवागतांना वित्तीय साहाय्य** : कृत्रिम बुद्धिमत्ता हे मुळातच नवे क्षेत्र असल्याने त्यामध्ये नव्याने प्रवेश करून काम करणाऱ्यांना 'स्टार्ट अप'च्या स्तरावर वित्तीय साहाय्य उपलब्ध करून देणे.

**सुरक्षित व विश्वासार्ह बनविणे** : प्रगत माहिती तंत्रज्ञान व संगणकीय पद्धती यांना संशोधनाची जोड देऊन कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला भारतात सुरक्षित व सर्वांसाठी विश्वासार्ह असे साधन बनविणे.

केंद्र सरकारच्या वरील प्रकारच्या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयांचे परिणाम योजनाकारांच्या मते पुढीलप्रमाणे अपेक्षित आहेत.**आर्थिक क्षेत्रातील लवचीक स्वायत्तता** : कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा व्यापार-व्यवसाय पद्धती अधिक गतिमान होऊन त्याचा परिणाम उद्योग-व्यवसायाच्या आर्थिक प्रगतीच्या संदर्भात अधिक सकारात्मक व पूरक स्वरूपात होऊ शकतो. .

**कौशल्य विकासातून कर्मचारी व कामाचा विकास** : नव्याने विकसित होणारे क्षेत्र म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी निगडित क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासाला मोठा वाव राहणार आहे. सध्या उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक आकडेवारीनुसार सुमारे ३.३ लाख जणांना या क्षेत्राशी निगडित कौशल्य विकासाचा लाभ झाला आहे.

सरकारचे धोरणात्मक निर्णय व त्याला उद्योग-व्यवसायांची सकारात्मक साथ यामुळे भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी निगडित क्षेत्रात आघाडी घेतली आहे. याचा पण आर्थिक व व्यावसायिक लाभ भारत आणि भारतीयांना होणार आहे. ग्रॅनफोर्डच्या २०२४ च्या अहवालात तर भारताला कृत्रिम बुद्धिमत्तेचे मुख्य केंद्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**आरोग्य सेवेमध्ये विशेष सुधारणा** : कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा भारतातील वैद्यक क्षेत्र व रुग्णसेवा क्षेत्रात लक्षणीय सुधारणा घडवून आणल्या जात आहेत. कोरोना काळाच्या पृष्ठभूमीवर आरोग्य सेवा क्षेत्रात घडून येणारे हे परिवर्तन मोठ्या अर्थाने लक्षणीय व परिणामकारक ठरणार आहे. देशांतर्गत आरोग्य क्षेत्रात प्रगत स्वरूपात व परिणामकारक बदल करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य संस्था व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा विशेष प्रकल्प आणि प्रयत्न साकारला जात आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण क्षेत्र** : सरकारचे नवे शैक्षणिक धोरण व त्याच्या अंमलबजावणीला कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगाची परिणामकारक साथ मिळाली आहे. याचे दृश्य व सर्वांत प्रमुख उदाहरण म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीद्वारा सोपा व दृक्-श्राव्य स्वरूपातील कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक विशेष अभ्यासक्रमांचा उल्लेख करावा लागेल. यातूनच कर्नाटकमध्ये 'शिक्षा-पायलट' या अभिनव योजनेची सुरुवात होणे याचे श्रेय कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी संबंधित प्रयत्नांना जाते.

**कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कृषी व ग्रामीण विकास** : भारत आणि भारताच्या आर्थिक-सामाजिक संदर्भात महत्त्वाच्या अशा कृषी व ग्राम विकास क्षेत्राला आता पूर्वापार प्रयत्नांच्या जोडीलाच कृत्रिम बुद्धिमत्तेची आता व परिणामकारक साथ लाभली.

**कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा परिणामकारक प्रशासन** : बदलता काळ, बदलत्या अपेक्षा व जनमानस यांचा योग्य ताळमेळ साधून परिणामकारक प्रशासन व्यवस्था साकारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर परिणामकारक ठरला आहे. यामुळे शासन-प्रशासन व्यवस्था अधिकाधिक परिणामकारक होत आहे हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. थोडक्यात कृत्रिम बुद्धिमत्ता हे नवे क्षेत्र विकसित व अधिकाधिक प्रचलित-प्रचारित होत असल्याने त्याचे दृश्य व फायदेशीर परिणाम आता निश्चितपणे दिसू लागले आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## कश्मीर तो होगा पर पाकिस्तान नहीं होगा...

प्रखर देशभक्त विद्यार्थी संघटना अभाविपने नुकतीच श्रीनगरच्या लाल चौकात भव्य तिरंगा रॅली काढली आणि पुन्हा एकदा संपूर्ण जगास संदेश दिला की, काश्मीर हा अखंड भारताचा अविभाज्य भाग आहे. याच लाल चौकात काही वर्षांपूर्वी तिरंगा फडकवणे शक्य नव्हते. प्रखर राष्ट्रभक्त असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कलम ३७० निष्प्रभ केले आणि परिवर्तनाची सुरुवात झाली. भयमुक्त काश्मिरात भारताचा तिरंगा डौलाने फडकू लागला. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत आत्मविश्वासाने सांगितले की, व्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच आज तो दिवस दूर नाही ज्या दिवशी व्याप्त काश्मीरही भारताच्या ताब्यात असेल. अभाविपच्या या तिरंगा रॅलीने महाविद्यालयीन जीवनातील त्या आठवणी पुन्हा एकदा जाग्या झाल्या. विद्यार्थिवर्गात राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतवणाऱ्या त्या ओळी आजही आठवतात..

धारा हर मोड बदलकर लाहोर से गुजरेगी गंगा
इस्लामाबाद की छाती पर लहरेगा भारत का झंडा
पिंडी और कराची तक सबकुछ गारद हो जाएगा
सिंधु नदी के आरपार पूरा भारत हो जाएगा
सदियों सदियों तक फिर जिन्ना जैसा शैतान नहीं होगा
कश्मीर तो होगा पर पाकिस्तान नहीं होगा...

**अखिल देशपांडे**/अकोला

## वाचक पत्रे

## रस्ते, पदपथाला पार्किंगचा विळखा

संपूर्ण नागपुरातच वाहतुकीची समस्या निर्माण झालेली आहे. नागपुरातील लोकप्रतिनिधी, व्यापारी व मनपाचे अधिकारी यांच्यात याबाबतीत अनेकदा चर्चा झाली. मात्र मार्ग निघालेला नाही. परदेशात पार्किंग समस्येवर विविध पर्याय आहेत. नेदरलॅण्ड्स अॅमस्टरडॅम येथील शाळेत व कॉलेजमध्ये जाणारी मुले सायकलने जाणे-येणे करतात. अमेरिकेत लोकसंख्येच्या मानाने जमिनीचे क्षेत्रफळ जास्त असल्यामुळे तेथे पार्किंगची फारशी समस्या येत नाही. १ ते २ किलोमीटर अंतरावरील ठिकाणी शक्यतो पायी चालत जावे. एकाच



ठिकाणी कार्यक्रमाला जायचे असल्यास प्रत्येकाने आपले चारचाकी वाहन न घेता, एका चारचाकीत किमान ५ व्यक्तींनी जावे. शक्य असल्यास शहरात शहरात बस, आटोरिक्षा, ई रिक्षा, ओला, उबर इत्यादी पर्यायांचा विचार करण्यात यावा. ज्या ठिकाणी गर्दी होणार आहे अशा ठिकाणी, चारचाकी वाहन न घेता दुचाकीचा वापर करण्यात यावा. स्टेटस म्हणून स्वयंचलित वाहनाचा उपयोग करू नये. वाहन पार्किंग करताना नियम व शिस्तीचे पालन करण्यात यावे. दुसऱ्याला त्याचे वाहन बाहेर काढण्यात अडचण जाऊ नये, याची काळजी घेण्यात यावी. वरील उपायांची अंमलबजावणी करणे कठीण आहे हे मान्य. तथापि, पार्किंगच्या सद्य:स्थितीत समस्या लक्षात घेता हे उपाय करणे आवश्यक आहे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## केंद्र सरकारचा प्रशंसनीय अर्थसंकल्प

जगाच्या इतिहासात असा एकही दिवस आला होता का, जेव्हा संसदेत केवळ पंधरा सेकंदांच्या घोषणेने एका देशाचे एक कोटी लोक तात्काळ करपात्र श्रेणीतून शून्य-कर श्रेणीत गेले? नाही.

हां तसा लक्ष्मी योजनेबद्दल बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओझरता इशारा फक्त दिला होता. अमेरिकेमध्ये, तुम्ही अविवाहित असाल आणि १२,९५० डॉलर्सपेक्षा कमी कमावल्यास, तुम्ही शून्य आयकर भरता! भारतात, आतापासून, १४,८२६ डॉलर्स शून्य कर असेल!!! अमेरिकेचे दरडोई उत्पन्न ७०,५३९ डॉलर्स आहे तर भारताचे केवळ २,१३९ डॉलर्स! म्हणजे चक्क ३३ पटींनी गरीब असूनही भारतामध्ये अमेरिकेसारख्या (फक्त ३३ कोटी लोकसंख्या, साधनानी संपन्न व जगात बलाढ्य) देशाच्या तुलनेत शून्य टॅक्स ब्रॅकेट जास्त आहे!! हे खरोखर अविश्वसनीय आहे. लेकिन 'मोदी है तो मुमकिन है' हेच खरे.

वीस वर्षांपूर्वी, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारचा संपूर्ण अर्थसंकल्प फक्त ५,१४,००० कोटी होता! आज, नरेंद्र मोदी सरकारचे संरक्षण बजेटच ६,८१,००० कोटी रुपये आहे!!! भारताने खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि आपल्या सीमेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी व जनतेसाठी ही आनंदाची बातमी आहे! मध्यमवर्गच नाही तर, शेतकरी, युवक, उद्योजक देशाचा सर्वांगीण विकास या सगळ्या बाबी हा अर्थसंकल्प विचारात घेत आहे. माझ्या मते हा नक्कीच प्रशंसनीय व कौतुकास पात्र अर्थसंकल्प आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर



## बँको ब्ल्यू रिबन पुरस्काराने शरद नागरी सहकारी बँक सन्मानित

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

सोलापूर येथील शरद नागरी सहकारी बँकेला बँको ब्ल्यू रिबन ॲवॉर्ड २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ॲविज पब्लिकेशन ही संस्था देशभरातील को-ऑपरेटिव्ह बँकांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन अवलोकन करुन ज्या बँकेची उत्तम आर्थिक परिस्थिती आहे अशा बँकांना बँको ब्ल्यू रिबन पुरस्काराने ही संस्था सन्मान करत असते. त्याप्रमाणे शरद नागरी सहकारी बँक लि. सोलापूर बँकेस लोणावळा येथील ॲम्बी व्हॅली येथे झालेल्या पुरस्कार समारंभात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी मुख्य महाव्यवस्थापक भार्गेश्वर बॅनर्जी यांच्या हस्ते बँको ब्ल्यू रिबन ॲवॉर्ड २०२४ या घुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र श्रीपती आवताडे यांनी हा पुरस्कार स्विकारला. बँकेस रुपये ७० ते ८० कोटीच्या ठेवी या श्रेणीतून हा मानाचा पुरस्कार मिळाला. या प्रसंगी व्यासपीठावर ॲविज पब्लिकेशन, कोल्हापूरचे श्री. अविनाश शिंत्रे आणि श्री. अशोक नाईक हे उपस्थित होते. सदरची बँक ही माजी महापौर श्री. मनोहरपंत सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २६ वर्षापासून उत्तमरित्या कार्यरत असून त्यांनी बँकेचे चेअरमन प्रा. श्री. महेश माने, संचालक मंडळ व सर्व सेवक वर्गाचे कौतुक केले.

# न्यू अंबिका, पिंजरा, कालिका कलाकेंद्र प्रथम

### अकलूज येथील राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ फेब्रुवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत न्यू अंबिका कला केंद्र यवत, पिंजरा कला केंद्र वेल्हे आणि कालिका कला केंद्र धाराशिव या तीन पार्ट्यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. त्यांना प्रत्येकी तीन लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे बक्षीस वितरण आ. दिलीप सोपल यांच्या हस्ते झाले. यावेळी जयंती समारंभ समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, आ. माधवराव जवळगावकर, परीक्षक माजी कुलगुरू मधुकरराव गायकवाड, समीक्षक लेखक डॉ. शशिकांत चौधरी, कवी चित्रपट लेखक डॉ. चंद्रकांत जोशी, सहकार महर्षी पुरस्कार विजेत्या वैशाली जाधव,रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर उपस्थित होते. लावणी स्पर्धेतील द्वितीय क्रमांक: शीतल पूजा बुमकर जय अंबिका कला केंद्र, सणसवाडी आणि अनिता परभणीकर, नटरंग सांस्कृतिक कला केंद्र मोडनिंब यांना विभागून देण्यात आला. त्यांना प्रत्येकी दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह देण्यात आले. तृतीय क्रमांक : प्रीती परळीकर, न्यू अंबिका लोकनाट्य कला यवत, चौफुला यांना रुपये एक लाख व सन्मान चिन्ह देण्यात आले. चतुर्थ क्रमांक: सुनीता, शामल, स्नेहा लखनगावकर नटरंग कला केंद्र, मोडनिंब यांना रुपये ७५ हजार व सन्मान चिन्ह देण्यात आले. उत्कृष्ट अदा वैयक्तिक रोख ५ हजार व चषक आणि उत्कृष्ट मुजरा रु ३ हजार हि दोन्ही बक्षिसे प्रीती परळीकर, न्यू अंबिका यवत चौफुला यांनी मिळविली. उत्कृष्ट गायिका- कल्याणी गायकवाड, पिंजरा कला केंद्र, वेल्हे सातारा, उत्कृष्ट ढोलकी वादक अर्जुन शिंदे, नटरंग कला केंद्र, मोडनिंब, उत्कृष्ट हार्मोनियम वादक- विकी जावळे, नटरंग कला केंद्र, मोडनिंब, उत्कृष्ट तबला वादक - निलेश डावाले, नटरंग कला केंद्र, मोडनिंब यांचाही सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरव आला.



### विद्यार्थ्यांच्या लावणीला ८६ हजारांचे बक्षिस

महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांगा मी कशी दिसते या नऊवारी साडीतील लावणीला उपस्थित रसिक प्रेक्षकांनी ८६ हजार ६५० रुपयांचे रोख बक्षीस दिले. कलाकारासह मुख्याध्यापक संजय गळीतकर, मार्गदर्शक शिक्षक बाळासाहेब झांबरे, किरण सूर्यवंशी नाझिया मुल्ला, नृत्य दिग्दर्शक उमेश शिंदे यांचा सन्मान करण्यात आला तर पालकांनीही यासाठी सहकार्य केले.


मनोरमा परिवार अंतर्गत

## श्री सदाशिव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर

कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

### ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

**श्री. पुरुषोत्तम अनंत साखरे** चेअरमन (मो. ९१७५३६३९४५)
**श्रीमती अनिता सुरेशराव जगताप** व्यवस्थापिका (मो. ८७८८३७४४३६)


## निधन वृत्त...

### इंदुबाई आगवणे



**अकलूज, दि. ३ फेब्रुवारी-**

वेळापूर येथील रहिवासी इंदुबाई रंगनाथ आगवणे (वय ८७) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. विशाल आगवणे, उमेश आगवणे, गणेश आगवणे, महेश आगवणे यांच्या आजी होत.

### नजीर बक्षी



**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

डीआरएम कार्यालयातील निवृत्त कार्यालयीन अधीक्षक नजीर अहमद बक्षी (रा. हाजीमाही चौक) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. मृत्यू समयी ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. बडी कब्रस्तान येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## यात्रा काळात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर :** माघ शुध्द एकादशी ८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. २ ते १२ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दि.७ ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत. माघी यात्रेनिमित्त पंढरपूर शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांकडून नामदेव पायरी व मंदीर परिसरात नारळ फोडण्याने नारळाचे पाणी रस्त्यावर येवून चिखल व घसरंती होण्याची शक्यता आहे. तसेच विक्रेते नारळाची साल काढून मंदिर व मंदिर परिसराच्या बाजूस टाकल्याने केसरास आग लागण्याची शक्यता असल्याने. श्री विठ्ठल -रुक्मिणी मंदिर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेनुसार नारळ फोडण्यास व विक्री करण्यास मनाई करण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.


## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ०९/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख ०४/०३/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात (मे. एच.यु.यु. पाटील सो. कोर्ट)**

१) **श्रीमती ज्योती भुजंग ढावारे,** वय ४३ वर्षे, धंदा- मजुरी, रा. मु.पो. मांडेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **विश्वजीत भुजंग ढावारे,** वय २४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. सदर
३) **सोनाली भुजंग ढावारे-** लग्नानंतरचे नांव **सौ. सोनाली शाम कसबे,** वय ३० वर्षे, धंदा- घरकाम, रा. भूम, ता. भूम, जि. धाराशिव — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा. वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २,३ यांची आई असून अर्जदार नं. २,३ हे सख्खे भाऊ बहीण आहेत. अर्जदार नं. १ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २,३ यांचे वडील भुजंग शंकर ढावारे हे होते. ते दि. २९/०८/२०२४ रोजी मांडेगांव, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत भुजंग शंकर ढावारे यांनी त्यांचे हयातीत प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना नगनगनगननग नॅशनल इन्शुरन्स कंपनीमध्ये विमा काढलेला होता. त्याची रक्कम येणे आहे. सदरील रक्कम अर्जदारांना मिळणेचा अधिकार आहे. अर्जदार हेच मयत भुजंग शंकर ढावारे यांचे कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नाहीत असे कथन करुन अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधिताने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख ०४/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकतील तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ०१/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ०८/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख ०६/०३/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात**

१) **कुमारी किर्ती उर्फ भाग्यश्री भागवत जाधव,** वय १७ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. बामन गल्ली, आगळगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर अज्ञान अ.पा.क. जन्मदाती आई **श्रीमती देवशाला भागवत जाधव**
२) **कुमारी तृप्ती भागवत जाधव,** वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर
३) **कुमारी भक्ती भागवत जाधव,** वय ११ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर
४) **श्रीमती देवशाला भागवत जाधव,** वय ४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

१) **महाराष्ट्र शासन** (याचे समन्स मा. जिल्हाधिकारी साहेब, सोलापूर यांचेवर बजावणेत यावे)
२) **महादेव रावसाहेब जाधव,** वय ५६ वर्षे, धंदा- शेती, रा. बामन गल्ली, आगळगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **सा. वाला**

ज्याअर्थी, १अ) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे आगळगांव हद्दीतील शेतजमिनीचा तपशील- ४७९ पैकी दक्षिण बाजूचे क्षेत्र ०० हे २६ आकार ०० रु. ७० पैसे यासी चतुःसिमा- पूर्वेस- ओढा, दक्षिणेस- गट नं. ४१४, पश्चिमेस- फॉरेस्टची जमीन व उत्तरेस- सदर गटापैकी तुम्ही लिहून घेणार महादेव रावसाहेब जाधव यांचे क्षेत्र.

१ब) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे आगळगांव हद्दीतील शेतजमिनीचा तपशील- ४१४ पैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र ०० हे. ०८ आर, आकार ०० रु. ०७ पैसे यासी चतुःसिमा- पूर्वेस- सदर गटापैकी तुम्ही लिहून घेणार महादेव रावसाहेब जाधव यांचे क्षेत्र, दक्षिणेस- गट नं. ४१३, पश्चिमेस- फॉरेस्टची जमीन व उत्तरेस- गट नं. ४७९.

१क) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे आगळगांव हद्दीतील शेतजमिनीचा तपशील- ४१५ पैकी पश्चिम- दक्षिण बाजूचे क्षेत्र ०१-१४.५० आर आकार ०१ रु. २५ पैसे यासी चतुःसिमा- पूर्वेस- सदर गटापैकी नागरगोजे यांची जमीन, दक्षिणेस- रस्ता व सदर गटापैकी संतोष रामहरी जाधव, पश्चिमेस- नदी व उत्तरेस- सदर गटापैकी तुम्ही लिहून घेणार महादेव रावसाहेब जाधव यांचे क्षेत्र.

यास गट नं. ४७२ मधील समाईक विहिरीतून पाणी घेणेचा १/१६ वा हिस्सा जमिनीमधील झाड-झुडूप, दगड- पाषाण वगैरे तदंगभूत वस्तुसुद्धा. येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती आतील सर्व तदंगभूत वस्तुहक्कासह. या मिळकती अज्ञान अर्जदार नं. १ ते ३ यांचे हिस्याची मालकी वहिवाटीची असून त्यांचेतर्फे त्यांची अ.पा.क. आई देवशाला भागवत जाधव हिने सदर मिळकत महादेव रावसाहेब जाधव यांना विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणेसाठी सरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वरील मिळकतीचे अर्जदाराचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत, अडथळा असलल्यास त्यांनी सदर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा पुढील नेमली तारीख ०६/०३/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचेतर्फे वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत, अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिद्धीकरण दिले. तारीख : ०१/०२/२०२५

सही/- **लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहाय्यक अधीक्षक** मा. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

रजि. ऑफिस माळीनगर, जि. सोलापूर

**गळीत हंगाम बंदची नोटीस**

आपले कारखान्याचा सन २०२४-२५ चा गळीत हंगाम फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्या दरम्यान अगर त्यासुमारास संपणार आहे. कंपनीचे भागधारक, करारदार ऊस उत्पादक यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सिझन २०२४-२५ चे हंगामासाठी ज्या शेतकऱ्यांनी आमच्या कंपनीशी ऊस पुरविण्याचा करार करून दिला आहे, त्याचप्रमाणे सरकारच्या आदेशाप्रमाणे ज्यांचा ऊस कंपनीस देण्याचे आदेश आहेत. असे शेतकरी व ज्यांनी अद्याप ऊस गळीतास पाठविला नाही, त्यांनी त्वरीत कपनीच्या शेती विभागाशी संपर्क साधून आपल्या ऊसाची आपण स्वतः तोड करून वाहतुकीची व्यवस्था करून आपला ऊस फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात किंवा त्यापूर्वी कंपनीकडे (कारखान्याकडे) गळीतास आणून पोहोच करावा.

वरील सर्व ऊस उत्पादकांचा सन २०२४-२५ या गळीत हंगामातील गळीताचा ऊस त्यांचे शेतात गळीत न होता राहिल्यास होणाऱ्या नुकसानीस कंपनी (कारखाना) जबाबदार राहणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी व त्यांना नुकसान मागण्याचा हक्क राहणार नाही. सबब ज्यांचा ऊस गळीतास गेला नाही त्यांनी सदर ऊस पुरवावा व होणारे नुकसान टाळावे ही विनंती. याची नोंद घ्यावी.

**स्थळ : माळीनगर**
**तारीख : ०३/०२/२०२५**

**सही /-**
**परेश दिगंबर राऊत**
**होलटाईम डायरेक्टर**
**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., करीता**



## जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव

पोस्ट बॉक्स नं.32, शिवाजी नगर रोड, जळगांव -425001.
फोन नं. 0257-2226645-48; फॅक्स नं. 0257-2225611

**टेंडर नोटीस**

**जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र | तपशील | अ. क्र | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | लस्सी कप खरेदी | 5 | स्क्रॅप बटर कारटन विक्रीचा वार्षीक करार |
| 2 | लायनर खरेदी | | |
| 3 | पेपर रोल खरेदी | 6 | साखर खरेदी |
| 4 | मल्टीपर्पज खोवा मशीन खरेदी | 7 | रबर मॅट खरेदीचा वार्षीक करार |

सदर निविदेतील मालाचा तपशील, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर पाहावयास मिळतील. अ.क्रं. 01 ते 07 च्या निविदा दि. 07/02/2025रोजी संध्या 5.00 वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे. सदरच्या जाहिराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल.

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार संघाने राखुन ठेवलेला आहे.

**कार्यकारी संचालक**



## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर, ता. मोहोळ लोकांस आमचे अशिल फरजाना शहेशाह शेख, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचेतर्फे श्री. एन.एन. काझी, ॲडव्होकेट, सिव्हील कोर्ट, बार्शी यांचेकडून कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. मोहोळ येथील श्री. नौशाद कासीम शेख यांचे नावे गट नं. ९८५/१ क्षेत्र हे. ०२-६६ आर आकार रु. ०२-३५ पैसे, ही शेतजमिनी असून, नौशाद कासीम शेख यांची बुद्धी भ्रष्ट झालेली आहे. त्यांना त्यांचे हित अहित कळत नाहीत, याचा गैरफायदा घेवून नौशाद शेख यांची मुले शहेशाह, आलीम, कलीम, वाजीद नौशाद शेख हे संगनमताने सदर जमिनीपैकी हे ०२-०० जमिनीची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत व त्याने सदर जमिनीचा सौदा करुन, रक्कम रुपये ४० लाख घेतल्याचे आमचे अशिलास खात्रीशीर समजलेले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त नौशाद कासीम शेख यांचे नावे असलेली जमिनीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी, विक्री, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, कर्ज बोजे इत्यादी मालकी हक्कबदलीचे व्यवहार करुन नयेत. आमचे अशिल फर्जना शहेशाह शेख ही शहेशाह कासीम शेख यांची पत्नी असून, त्यास अजान वय १० वर्षे व अलिना वय ०८ वर्षे अपत्ये आहेत व त्यांचा सदर उपरोक्त वडिलोपार्जित मिळकतीत हिस्सा आहे, याची नोंद घ्यावी. याउपर कोणी कसल्याही, कोणत्याही प्रकारचे व्यवहार केल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत.

ही जाहीर सावधानतेची नोटीस दिली असे. दिनांक ०३/०२/२०२५

सही/- अशिल **फर्जाना शहेशाह शेख**
सही/- अशिलातर्फे ॲड. **ॲड. श्री. एन.एन. काझी,** जिल्हा व अति. सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## करमाळा नगरपरिषद, करमाळा

जा.क्र.मिळकत/साशा/१३४/२०२५ दि. ०३/०२/२०२५

**जाहीर फेर लिलाव प्रसिध्दीकरण**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर फेर लिलाव वार मंगळवार, दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच्या मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. १०/०२/२०२५ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प. ने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | शॉपिंग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉ. कॉम्प्लेक्स बी.-२बी | ४४ | २,००,०००/- | ५,०००/- |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८ | ३५,०००/- | ५,०००/- |
| ३ | न.प. दवाखाना शॉपिंग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २,०००/- |
| ४ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉपिंग सेंटर | ४४ | १,२१,०००/- | ५,०००/- |
| ५ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉपिंग सेंटर | १६ | ९२,०००/- | ५,०००/- |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**



CITATION O.S. NO. 232/2023

## IN THE COURT OF THE IV ADDL. SENIOR CIVIL JUDGE AT KALABURAGI

**Jyoti D/o Guranna Jewargi,**
(W/o Basavaraj Masali),
Aged about: 46 years, Occ: Household,
R/o G-32, R.G. Mallu Enclave Industrial Estate,
MSK Mill Road, Kalaburagi — Plaintiff

V/S..

1. **Udaykumar S/o Guranna Jewargi**
   Aged about 56 Years, occ: Business
   R/o H. No. 1-73/4, Behind Hotel Pariwar,
   Aiwan-E-Shahi Road, Station Road, Kalaburagi.
2. **Sanjaykumar S/o Guranna Jewargi**
   Aged about 54 Years, occ: Business
   R/o H. No. 39/1, Basaveshwar Bilaya,
   Tinalu Vidyaranpura, Bangalore 560097
3. **Rajkumar S/o Guranna Jewargi**
   Aged about 48 Years, occ: Business
   R/o Jewargi Werehouse, Opp: N.P. School,
   Four mill, Shahabad Road, Kalaburagi.
4. **Sow Sandhya W/o Sanjay Chavan**
   Aged about 48 Years, occ: Household
   R/o 56, Chandlaxmi Nagar,
   Shelgi, Solapur, Maharashtra.
5. **Sanjay S/oLaxmansa Chavan**
   Aged about 52 Years, occ: Business
   R/o 56, Chandlaxmi Nagar,
   Shelgi, Solapur, Maharashtra.
6. **Saw. Prabhavati Chidanand Solase**
   Aged about 37 Years, occ: Household
   R/e 86/A/1, Bhavani Peth, Solapur Maharashtra
7. **Saw Jyoti Basappa Karanje**
   Aged about 26 Years, occ: Household
   R/o 175/7, Ganesh Nagar, Bhavani Peth,
   Solapur, Maharashtra.
8. **Abhishek Siddeshwar Bhute**
   Aged about: 24 Years, occ: Pvt. Work
   R/o 175, Bhavani Peth, Solapur, Maharashtra
9. **Ramakrishan Shivayogi Devangaon**
   Aged about 34 Years, occ: Business
   R/o Maddi Vasti, Bhavani Peth, Solapur, Maharashtra
10. **Saw Nagamma Shivayogi Devangaoon**
   Aged about 49 Years, occ: Household
   R/o Maddi vasti, Bhavani Peth, Solapur, Maharashtra.

**- Defendants**

To,
Defendants No. 4 to 10

1. **Sow Sandhya W/o Sanjay Chavan**
   Aged about: 48 Years, occ: Household
   R/o 56, Chandlaxmi Nagar, Shelgi, Solapur, Maharashtra.
2. **Sanjay S/oLaxmansa Chavan**
   Aged about 52 Years, occ: Business
   R/o 56, Chandlaxmi Nagar, Shelgi, Solapur, Maharashtra.
3. **Saw. Prabhavati Chidanand Solase**
   Aged about 37 Years, occ: Household
   R/o 86/A/1, Bhavani Peth, Solapur Maharashtra
4. **Saw Jyoti Basappa Karanje**
   Aged about 26 Years, occ: Household
   R/o 175/7, Ganesh Nagar, Bhavani Peth,
   Solapur, Maharashtra.
5. **Abhishek Siddeshwar Bhute**
   Aged about 24 Years, occ: Pvt. Work
   R/o 175, Bhavani Peth, Solapur, Maharashtra
6. **Ramakrishan Shivayogi Devangaon**
   Aged about: 34 Years, occ: Business
   R/o Maddi Vasti, Bhavani Peth, Solapur, Maharashtra
7. **Saw Nagamma Shivayogi Devangaoon**
   Aged about 49 Years, occ: Household
   R/o Maddi vasti, Bhavani Peth, Solapur, Maharashtra.

Whereas, plaintiff Jyoti had filed a in O.S. No. 232/2023 On the file of IV Addl. Senior Civil Judge at Kalaburagi.

You are hereby summoned to appear in this court in person or a duly instructed pleader to answer all material questions on 04/03/2025 take notice that in default of your aappearance the day mentioned the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the court on this 1st day of February 2025.

**sd/- Advocate for plaintiff P.V. Deshpande** (Court stamp) **sd/- Chief Ministrial Officer IV Addl. Senior Civil Judge at Kalaburatgi.**


### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात राजे उमाजी नाईक यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये राजे उमाजी नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक म हेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, निलोफर सय्यद, सारंग अंजीखाने, महेश वालावलकर, रियाज आतार, हर्षद चिंचनसुरे, अमोल गायकवाड, आषिकेश लोखंडे, रतन साळवे, हिरा गोरे, भालचंद्र साखरे, सायली ढोले, आरव गायकवाड, नईम मुचाले, शुभम गायकवाड आदी उपस्थित होते.


## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आझादी का अमृत महोत्सव

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 12/11/2024 रोजी डिमांड नोटिस जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की, खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे. 03/02/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - वळसंग** A/c. 60442715883 **कर्जदार:- श्री गोविंद मल्लिकार्जुन वंगारी** पत्ता :- हनुमान मंदिरजवळ, 29, कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, जि. सोलापूर- 413005 | **श्री गोविंद मल्लिकार्जुन वंगारी यांच्या नावावर मालमत्ता गहाण** फ्लॅट क्रमांक 6 येथे असलेल्या घराच्या मालमत्तेचे साधे गहाण, तळमजला, राघवेंद्र महामहिम, सिटी सर्व्हे क्र. 10387/33/1/ सी/2 फ्लॅट क्र.6, मार्केट यार्ड येथील टीपी क्र.1 सोलापूर, ६६.६४ चौरस मीटर, नवीन पाच्छा पेठ, तालुका उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. **खालीलप्रमाणे सीमा: -** पूर्व:- खुली जागा, पश्चिम :- खुली जागा, दक्षिण:- फ्लॅट क्र. 5, उत्तर:- फ्लॅट क्रमांक 7 | **मागणी सूचना:** दि. 12/11/2024 रु. 36,70,075.00/- (छत्तीस लाख सत्तर हजार पंचाहत्तर रुपये फक्त) तसेच लागू न केलेले व्याज 12/11/2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा तारीख : 03/02/2025** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०३/०२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :-डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सव्हे नं. १८७/१ अ यांसी नविन सर्व्हे नं. १७८/१ अ यापैकी कलावती नगर भाग २ मधील प्लॉट नं.५१९ याचे एकुण क्षेत्र ६०० चौ. फुट अथवा ५५.७६ चौ. मीटर इतके असून यात हॉल, किचन, बेडरुम, व संडास बाथरुम असे १ बीएचके आर सी सी बांधकाम आहे, यातील नळ व लाईट कनेक्शनसह.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- प्लॉट नं. ५१८, दक्षिणेस :- प्लॉट नं. ५१६, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ५२० येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट घरजागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह.

ही प्लॉट घरजागा श्री. गोपी जगन्नाथ भंडारी, रा.घर नं. १७८, गांधी नगर नं. ७, अक्कलकोट रोड, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास नोटरी कब्जेपावतीन खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी यावरील पिरामल फायनान्स, सोलापूर चा कर्जबोजा वगळता ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट घरजागेचे संदर्भात इतर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०३/०१/२०२५

**सही/-**
**अशिल : मधुकर राजय्या नामनी**
**मो.नं. ८८०६३१०९५७ यांचे तर्फे**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

सोलापूर शहराच्या प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात सूचना, हरकती, तक्रारी आणि आरोपावरून सध्या शहरात वातावरण चांगलेच तापले आहे. प्रचंड विरोध असल्याचे दिसून येते. यंदाच्या प्रारूप विकास आराखड्यात एकूण ९२१ आरक्षणे प्रस्तावित केले आहेत. तर मागील जुन्या आराखड्याची अंमलबजावणी पाहिली असता २० वर्षात एकूण ८२९ पैकी १२१ आरक्षणे विकसित करण्यात आली आहेत. हे प्रमाण १५ टक्के आहे. मागील वीस वर्षातील विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचे प्रमाण पाहता अत्यल्प आहे. विकसित करण्यासाठी निधीची कमतरता असते. यामुळे हा विकास आराखडा अंमलबजावणीबाबत स्वप्नरंजन ठरत असल्याचे चित्र आहे. त्यासाठी शासन आणि महापालिकेच्या समन्वयातून विकास आराखड्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तरच हा आराखडा वास्तवात उतरणार आहे अन्यथा एक मृगजळच राहणार आहे.

# शहर विकास आराखडा एक स्वप्नरंजन!

## निधीअभावी अंमलबजावणीचे तगडे आव्हान!











सोलापूर महापालिकेच्या प्रशासनाने सोलापूर शहराचा प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक बैठका घेऊन हा प्रारूप आराखडा तयार करण्यात आला. प्रारूप विकास आराखड्याचे गॅझेट प्रसिद्धीनंतर तीस दिवसात नागरिकांनी त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या.सोलापूर शहराच्या पुढील २० वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप शहर विकास आराखड्यावर सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी मोठा विरोध दर्शविला आहे. यातूनच या प्रारूप आराखड्यावर ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतीअखेर तब्बल २ हजार ४७९ तक्रारी आणि हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत. अनेकांनी चुकीचा व मनमानी पद्धतीने तयार केलेला हा प्रारूप आराखडाच रद्द करून नव्याने शहर विकासाच्या दृष्टीने सर्व समावेशक आराखडा तयार करावा, अशी मागणी वजा हरकत दाखल केली आहेत. दरम्यान, या प्राप्त हरकतींवर आता या हरकतींवर सुनावणी घेण्यात येईल. अंतिम मंजुरीसाठी हा आराखडा शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

सोलापूर शहराच्या २३.२३ चौ.कि.मी. क्षेत्रासाठीचा पहिला विकास आराखडा बॉम्बे टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९५४ नुसार दि.१३ ऑगस्ट १९५८ रोजी मंजुर करण्यात आला होता. त्याप्रमाणे २३.२३ चौ.कि. क्षेत्राची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार दि.१६ जानेवारी १९७८ रोजी मंजुर करण्यात आला होता. दि.१ जुलै १९७९ रोजी हद्दवाढ झालेल्या २.३० चौ.कि.मी. क्षेत्राची पहिली विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार दि.१० जून १९८५ रोजी मंजुर करण्यात आला होता. दि.१ एप्रिल १९८९ रोजी हद्दीवाढीत समाविष्ठ झालेल्या (सलगरवाडी क्षेत्र ७.५० हेक्टर) व दि.५ मे १९९२ रोजी हद्दवाढ झालेल्या (नेहरु नगर, मजरेवाडी यासह १३ गावांचे क्षेत्र १४५.५४ चौ.कि.मी.) क्षेत्रासह महानगरपालिकेच्या संपूर्ण १७८.५७ चौ.मी. क्षेत्राची (म्हाडाच्या नियोजना प्राधिकरणाखली असलेले जुळे सोलापूर भाग १ व २ क्षेत्र वगळून) विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार दि.२८ ऑक्टोबर २००४ रोजी मंजुर करण्यात आली. जुळे सोलापूर भाग १ व २ चे क्षेत्र म्हाडा कडून महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या दोन्ही क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार दि.३ डिसेंबर २०१६ रोजी मंजुर करण्यात आली.

आता सुधारीत करण्यात येत असलेला विकास आराखडा ही महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्राचा असून त्यामध्ये आत्तापर्यंतच्या सर्व हद्दवाढीचे क्षेत्र व म्हाडा कडील क्षेत्र यांच्यासह आहे.

प्रक्षेपित लोकसंख्येची प्रक्षेत्र निहाय अंदाजित परिगणना सन. २०११ च्या जनगणना प्रभाग निहाय काम पूर्ण केले आहे. त्या आधारे सन २०११ चे तुलनेत सन. २०३८ व २०४८ ची वाढ विचारात घेऊन सेक्टर निहाय सन.२०३८ व २०४८ ची लोकसंख्या परिगणित केली आहे. त्या आधारे आवश्यक सोयी सुविधा परिगणना केली आहे. (१९७९ च्या झश्ररपपळपस डींरपवरीवी नुसार संख्या परिगणीतीचे काम चालू आहे.) मुळ विकास योजेनेमधील १६ प्रक्षेत्र कायम ठेवण्यात आली आहेत. परंतू प्रक्षेत्र १३ चे क्षेत्र व त्यामधील प्रक्षेपित लोकसंख्या जास्त असल्याने त्याची विभागणी केली आहे. त्यानुसार एकुण प्रक्षेत्रांची संख्या १७ झाली आहे. महापालिकेचा यापूर्वी दि. १५ डिसेंबर २००४ रोजी शहराचा विकास आराखडा अंमलात आला. आता यामध्ये सुधारणा व बदल करण्यासाठी पुढील २० वर्षासाठीचा विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. महाराष्ट्र रिजन टाउन प्लॅनिंग ऍक्ट (एम आरटीपी) नुसार हा आराखडा तयार करण्यात येतो. वीस वर्षात झालेला बदल आणि सुधारणा या नव्या आराखड्यात समाविष्ट करण्यात येणार आहेत. येत्या दि. २ नोव्हेंबर २०२४ पर्यंत जुन्या विकास आराखड्याची मुदत होती.

### जुळे सोलापूर, विजापूर रोड विकास आराखडा प्राधिकरण संघर्ष समितीचा मोर्चा

सोलापूर महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास आराखड्याला विरोध दर्शवत त्यामध्ये बदल करण्याची जोरदार मागणी करत जुळे सोलापूर विजापूर रोड विकास आराखडा प्राधिकरण संघर्ष समिती आणि आणि विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आज महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला. या आराखड्यात हद्दवाढ भागाच्या विकासाचा विचार केलेला दिसत नाही. विशेषतः जुळे सोलापूर आणि विजापूर रोड परिसरातील अनेक मूलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी आवश्यक असलेले आरक्षण टाकण्यात आलेले नाही. त्यामुळे या आराखड्याला विरोध आहे. शासनाकडे हा आराखडा मंजुरीला जाण्यापूर्वी काही बदल सुचवित आहोत. महापालिका प्रशासनाने याचा विचार करावा, अशी मागणी केली आहे. विजापूर रोड जुळे सोलापूर परिसरात इंचगेरी मठासमोरील जागेत एसटी स्थानकासाठी आरक्षण टाकण्यात यावे. विजापूर रोड तसेच जुळे सोलापूर परिसरासाठी प्रशस्त नाट्यगृहासाठी जागा आरक्षित करावी. विजापूर रोड व जुळे सोलापूर परिसरातील गरीब गरजू लोकांसाठी महापालिकेचा स्वतंत्र दवाखाना आणि प्रसूती गृहासाठी आरक्षण टाकण्यात यावे. विजापूर रोड भागातील गोरगरीब लोकांच्या पाल्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा आवश्यक असून त्यासाठी आराखड्यात जागा आरक्षित करावी. जुळे सोलापूर भागात भाजी विक्रेते रस्त्यावर बसतात, त्यांच्या उदरनिर्वाहासाठी स्वतंत्र अद्ययावत मंडईसाठी जागा आरक्षित करावी. जुळे सोलापुरात नागरी सुविधांसाठी आरक्षण ठेवून आर्थिक तरतूद करावी. जुळे सोलापूर तसेच विजापूर रोड परिसरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता महापालिकेने अंतिम आराखड्यात वरील सर्व मागण्यांचा विचार करुन आरक्षण टाकावे आदी मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता.

### यंदा प्रथमच सर्व क्षेत्राचा आराखडा तयार केला जातोय

सोलापूर महापालिकेचे एकूण १७८.५८ चौरस किलोमीटर क्षेत्र आहे. या संपूर्ण क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा सध्या तयार करण्यात आला आहे. यंदा प्रथमच सर्व क्षेत्राचा आराखडा तयार केला जात आहे. जसजशी हद्द वाढ झाली. नवनवीन क्षेत्र जोडले गेले. वेगवेगळ्या क्षेत्राचे तीन आराखडे चालले होते. जुळे सोलापूर ,नियोजन प्राधिकरण म्हाडा व इतर एजन्सीचे आराखडे वेगवेगळे होते. यंदा संपूर्ण शहराच्या हद्दीचा आराखडा बनविण्यात येत आहे.

### ९२१ आरक्षणे या आराखड्यात प्रस्तावित

एकूण ९२१ आरक्षणे या प्रारूप विकास आराखड्यात प्रस्तावित केले आहेत. प्रक्षेपित लोकसंख्येची प्रक्षेत्र निहाय अंदाजीत परिगणना सन २०११ च्या जनगणना प्रभाग निहाय काम पूर्ण केले आहे. त्या आधारे सन २०११ च्या तुलनेत सन २०३८ व २०४८ ची वाढ विचारात घेऊन सेक्टर निहाय लोकसंख्या परीगणित केली आहे. त्या आधारे आवश्यक सोयी सुविधा परिगणना केली आहे. मूळ विकास योजनेमध्ये १६ प्रक्षेत्र कायम ठेवण्यात आली आहेत परंतु प्रक्षेत्र तेराचे क्षेत्र व त्यामधील प्रक्षेपित लोकसंख्या जास्त असल्याने त्याची विभागणी केली आहे. त्यामुळे एकूण प्रक्षेत्रांची संख्या आता १७ झाली आहे.

### १९ हजार २७१ कोटींचा विकास आराखडा

सोलापूर शहराच्या पुढील वीस वर्षाचा विचार करून करण्यात येत असलेल्या विकास आराखड्यामध्ये एकूण ९२१ आरक्षणे प्रस्तावित केली आहेत. त्यामध्ये नियोजित जमीन किंमत ६ हजार ८९३.९६ कोटी रुपये रेडी रेकनर प्रमाणे तर विकास किंमत १२ हजार ६७८.७७ कोटी रुपये असे एकूण १९ हजार २७१.८५ कोटी रुपयांचा हा प्रारूप विकास आराखडा असणार आहे. सोलापूर शहराच्या पारंपारिक गरजांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामुळे इतका निधी शासन व महापालिकेकडून उपलब्ध करावा लागणार आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तेवढा निधी मिळू शकला नाही. यामुळे हा आराखडा अंमलात आणणे आव्हानात्मक असल्याचे दिसून येते.

### मागील वीस वर्षांत केवळ १५ टक्के आरक्षणे केली विकसित

जुना आराखड्याची अंमलबजावणी पाहिली असता वीस वर्षात एकूण ८२९ पैकी १२१ आरक्षणे विकसित करण्यात आली आहेत. ते प्रमाण १५ टक्के आहे. जमिनीचा विकास करताना नेमका जुना की प्रस्तावित आराखडा लागू होणार असा प्रश्न नागरिकांना पडू शकतो. यामुळे पूर्वीचा आराखडा आणि प्रस्तावित विकास आराखडा यामध्ये जो कडक आहे. त्याचा उपयोग करण्यात येणार आहे.

### असे आहेत विकास आराखड्याचे टप्पे

यापूर्वी इरादा जाहीर करणे, लोकांच्या हरकती सूचना मागवणे, प्रस्तावित जमीन उपयोग बनवणे, प्रारूप विकास आराखडा बनवणे, त्यावर हरकती सूचना मागवणे, नियोजन समितीने त्यावर सुनावणी घेणे, नियोजन प्राधिकरणाने तो मंजूर करणे त्यानंतर तो आराखडा शासनाला अंतिम मंजुरीसाठी पाठवणे असे विविध टप्पे आहेत. सोलापूर शहराचा प्रारूप विकास आराखडा दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी मुदतीत बनविण्यात आला आहे. त्यास महापालिका प्रशासकांनी मंजुरीही दिली आहे. हा शहर विकास आराखडा लवकरच गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. गॅजेट प्रसिद्ध झाल्यानंतर एका महिन्याच्या कालावधीत नागरिकांनी त्यावर हरकती व सूचना द्यावयाच्या आहेत. त्यानंतर या हरकती, सूचनांवर नियोजन समितीकडून सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर नियोजन समिती अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे देईल. दोन महिन्याच्या आत अहवाल शासनाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

शहरातील नागरिकांना चांगले जीवनमान जगता यावे अशा प्रकारे हा आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा तयार करताना विविध सुविधांचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये बगीचा, खेळाचे मैदान, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा, आरोग्य सुविधा, सांस्कृतिक केंद्र, अग्निशामक सुविधा, वाहनतळ , घनकचरा संकलन व व्यवस्थापन केंद्र, पाण्याच्या टाकीचे नियोजन (इ एस आर) यात्रा मैदान व बहुद्देशीय मैदान, दहन व दफनभूमी, मनपा व बस चार्जिंग स्टेशन, मनपा झोन ऑफिस, केंद्र व राज्य शासनाच्या कार्यालयासाठी जागेचे नियोजन याशिवाय लहान मुलांसाठी स्वतंत्रपणे खेळाची मैदाने व बगीचा या सुविधाही प्रस्तावित करण्यात आले आहेत. दरम्यान १५ ठिकाणी पाण्याच्या टाक्यांचे आरक्षणे टाकले आहेत. कोर्टाने आठ आरक्षणे हटविले आहेत.

### शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आरक्षणे केली प्रस्तावित

या सुविधा प्रस्तावित करताना जास्तीत जास्त आरक्षणे महापालिका व शासकीय जागेवर प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे. काही आरक्षण ही रेखांकनातील सुविधा भूखंडावर प्रस्तावित केले आहेत.विकास आराखड्यात आरक्षणे शहराच्या गरजेनुसार व वयोगटानुसार अभ्यास करून प्रस्तावित केले आहेत. त्यासाठी २५ बैठका घेण्यात आल्या. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आरक्षणे प्रस्तावित केली आहेत.

### आराखड्यात या सुविधांचा विचार

प्रारुप आराखडा तयार करताना मुख्यत्वे करुन या सुविधांचा विचार केला आहे. यामध्ये बगीचा - २१४ हेक्टर, खेळाचे मैदान -२७३ हेक्टर, प्राथमिक शाळा- १५५ हेक्टर / माध्यमिक शाळा - ९२ हेक्टर, आरोग्य सुविधा - ७०.४७ हेक्टर , सांस्कृतिक केंद्र - २५ हेक्टर, अग्नीशामक सुविधा, वाहन तळ - २० हेक्टर, घनकचरा संकलन व व्यवस्थापन केंद्र, पाण्याचे टाकीचे नियोजन ईएसआर, यात्रा मैदान व बहुउद्देशीय मैदान (सभा इ.), दहन व दफन भूमी - ११० हेक्टर, शॉपिंग सेंटर आणि भाजी मार्केट - ६३ हेक्टर, म.न.पा. व बस ई चार्जिंग स्टेशन, म.न.पा. झोन ऑफिस, केंद्र व राज्य शासनाचे कार्यालयासाठी जागेचे नियोजन या शिवाय लहान मुलांच्यासाठी स्वतंत्रपणे खेळाचे मैदाने व बगीचा या सुविधा प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. या सुविधा प्रस्तावित करताना जास्तीत जास्त आरक्षणे म.न.पा. व शासकीय जागेवर प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कांही आरक्षणे ही रेखांकनातील सुविधा भूखंडावर प्रस्तावित केला आहे.

### महापालिकेत नियोजन आराखडा विभाग निर्माण करण्याची गरज

महापालिका प्रशासन अथक परिश्रम घेऊन पुढील २० वर्षासाठी शहर विकास आराखडा तयार करत असते. मात्र हा आराखडा वास्तवात उतरवण्यासाठी अंमलबजावणी करत असताना निधीची गरज असते. आराखड्यासोबतच या



निधीचा अंदाज ही काढण्यात येतो. त्याप्रमाणे हा लागणारा आवश्यक निधी केंद्र, राज्य आणि सोलापूर महापालिकेकडून कसा उपलब्ध करून देता येईल याचे नेटके नियोजन गरजेचे आहे. वीस वर्षात किती अंमलबजावणी झाली, ती निधी खर्च झाला, झालेल्या कामांची माहिती नेटक्या पद्धतीने ठेवण्यासाठी नियोजन आराखडा विभाग निर्माण करण्याची गरज आहे. तसेच या विभागाअंतर्गतच आमदार, खासदार, नगरसेवक यांच्यासह अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्याची गरज आहे. या समितीच्या बैठका व्हाव्यात. तरच हा अभ्यासपूर्ण आदर्शवत विकास आराखडा वास्तवात उतरू शकेल. शहर विकसित आणि सुजलाम - सुफलाम होईल.


संकलन : किरण बनसोडे, मो. ९८२२६१६१४१




### प्रारूप आराखड्यावर तब्बल २,४७९ तक्रारी आणि हरकती

सोलापूर शहर विकास आराखड्याचे गॅझेट प्रसिद्धीनंतर एका महिन्याच्या आत शहरातील नागरिकांना त्यावर हरकती व सूचना द्यायच्या होत्या. गॅजेट प्रसिद्ध झाल्यानंतर आराखडा महापालिका आयुक्त कार्यालय, नगर रचना कार्यालय तसेच वेबसाईटवरही पाहता आल्या. त्याचे नकाशे हवे असतील तर शासन नियमानुसार विहित शुल्क भरून नागरिकांना त्याच्या प्रती कार्यालयात उपलब्ध करण्यात आल्या. हरकती , सूचना सोलापूर महापालिकेच्या उपसंचालक नगर रचना कार्यालयाकडे सादर करण्यात आल्या. सोलापूर शहराच्या पुढील २० वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्यावर सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी मोठा विरोध दर्शविला आहे. यातूनच या प्रारूप आराखड्यावर तब्बल २ हजार ४७९ तक्रारी आणि हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत. हा प्रारूप आराखडाच रद्द करून नव्याने शहर विकासाच्या दृष्टीने सर्व समावेशक आराखडा तयार करावा, अशी मागणी केली आहे. त्या हरकती व सूचनांवर नियोजन समितीकडून सुनावणी घेण्यात येणार आहे. सोलापूर शहराच्या पुढील २० वर्षासाठी तयार करण्यात आलेला हा प्रारूप विकास आराखडा २ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. यावर तक्रारी आणि हरकती दाखल करण्यासाठी प्रथम दिलेली मुदत ही कमी अवधी असल्याची ओरड सुरू झाल्यानंतर यामध्ये वाढ करून ती ३१ जानेवारी पर्यंत करण्यात आली होती. शहराच्या या प्रारूप विकास आराखड्यावर आलेल्या प्रचंड प्रमाणावरील तक्रारी आणि हरकतीनंतर महापालिका प्रशासन देखील चक्रावले असून आता या मोठ्या प्रमाणावरील तक्रारी आणि हरकतींवर सुनावणी घेण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आले आहे. ९२१ आरक्षणांसह जीपीएसद्वारे विविध भागांचे अन्य रुपामध्ये रूपांतर करण्याच्या या शहर विकास आराखड्यावर दुपटीपेक्षा अधिक तक्रारी आणि हरकती पुढील न्यायालयीन लढाईच्या उद्देशानेच दाखल झाल्याची चर्चा मात्र महापालिकेत सुरू होती. टप्प्याटप्प्याने यावर पुढील पंधरा दिवसात सुनावणी घेण्याचे काम पूर्ण करण्यात येणार असून मालमत्ता धारकांच्या तसेच शहरवासीयांच्या सूचना हरकतींवरील युक्तीवादावर योग्य निर्णय घेऊन अंतिम शहर विकास आराखडा तयार करून तो महापालिकेकडून शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. महापालिकेकडून तयार करून जाहीर करण्यात आलेल्या विकास आराखड्याबाबत शहरातील नागरिकांच्या हरकती आणि तक्रारींचा ढीग लागला आहे. या विकास आराखड्यात असंख्य त्रुटी असून, बेकायदेशीररित्या खासगी मालमत्तेवर वेगवेगळ्या प्रकारची आरक्षणे टाकण्यात आलेली आहेत. सोलापूर शहराची लोकसंख्या व भविष्यात लागणारी आरक्षणे विचारत न घेता कुठल्याही जागेवर आरक्षण टाकण्याचा सपाटा लावण्यात आला असल्याची ओरड सुरू झाली आहे. याबाबत महापालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन, राज्याच्या नगर विकास विभागासह शासनापर्यंत प्रचंड तक्रारी गेल्याने महापालिकेने तयार केलेल्या या शहर विकास आराखड्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### आराखडा रद्द किंवा दुरुस्त करण्याची एमआयएमची मागणी...

सोलापूर महापालिकेने प्रारूप शहर विकास आराखडा रद्द करावा किंवा दुरुस्ती करावा अन्यथा मोठे जन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा एमआयएमच्या वतीने एमआयएम पक्षाचे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी दिला आहे. एमआयएमच्या वतीने महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना निवेदन देण्यात आले. सोलापूर शहरातील अनेक धार्मिक जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.शहरातील मोठमोठ्या टोलेजंग इमारती असलेल्या नगराना झोपडपट्टी भाग म्हणून घोषित करण्यात आले आहे. शहरातील मोक्याच्या जागी खाजगी जागावर आरक्षण जाहीर करण्यात आले आहे असा आरोप केला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दिव्यांग क्रिकेट भारताच्या वेस्ट झोनच्या कर्णधारपदी करण चाकोते

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**
कै. जगदीश चाकोते यांचे चिरंजीव व युवा खेळाडू करण चाकोते यांच्या अष्टपैलू खेळामुळे दिव्यांग क्रिकेटच्या भारताचे वेस्ट झोनच्या कर्णधारपदी निवड करण्यात आले आहे. ८ फेब्रुवारीला हैदराबाद येथे संपूर्ण भारताचे पाच झोनमध्ये सामना होणार आहेत. कारण चाकोते यांच्या नेतृत्वाखाली वेस्ट झोन खेळणार आहे. या ऐतिहासिक व चाकोते कुटुंबीयांना गौरवस्पद असल्यामुळे आज करणचे सत्कार व सन्मान करण्यात आले आणि त्यांच्या वडील कै जगदीश चाकोते यांचे स्वप्न होते की कारण एक दिवशी भारतासाठी खेळावे. याच्यासाठी करण अथक परिश्रम व मेहनत घेत आहे. हे स्वप्न पूर्ण व्हावे, असे शुभेच्छा व सिद्धेश्वर चरणी प्रार्थना.

### वरिष्ठ गट हॅन्डबॉल निवड चाचणी ६ फेब्रुवारीला

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**
चंद्रपूर येथे १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या ५०व्या वरिष्ठ गट पुरूषांच्या राज्य अजिंक्यपद हॅन्डबॉल स्पर्धेकरिता सोलापूर जिल्हा संघ निवड चाचणी ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. या निवड चाचणीतून सोलापूर जिल्ह्याचा हॅन्डबॉल संघ निवडण्यात येईल. या निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपला आधार कार्ड, १ फोटो व नोंदणी शुल्क शंभर रूपये निवड चाचणीच्या दिवशी सायंकाळी ५.३० वाजता अश्विनी हॉस्पिटल शेजारी राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर संदेश पवार (मो. ९९७५८८१३५०) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा हॅन्डबॉल संघटनेचे सुहास जाधव व राहुल हजारे यांनी कळविले आहे.

### वसंत चषक कुमार जिल्हा खो-खो स्पर्धा उद्यापासून

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**
कुमार मुले व मुली गटाची १८ वर्षाखालील वसंत चषक जिल्हा खो-खो स्पर्धा बुधवारी ५ फेब्रुवारीपासून पिराची कुरोलीतील (ता. पंढरपूर ) सावंतवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर आयोजित केली आहे. ५ फेब्रुवारीला मुलांची व ६ फेब्रुवारीला मुलींची स्पर्धा होईल. सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने पिराचीकुरोली येथील डीएनपी स्पोर्ट्स क्लबने ही स्पर्धा सहकार शिरोमणी वसंतराव काळे यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त आयोजित केली आहे. १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. भाग घेणाऱ्या संघानी मूळ आधार कार्ड व बोनाफाईड सर्टिफिकेट घेऊन यावे. स्पर्धेतील विजयी संघास १०,७ व ५ हजार रुपयांचे तसेच सर्वोत्कृष्ट अष्टपैलू, आक्रमक व संरक्षण यांना प्रत्येकी एक हजार रुपये पारितोषिक ठेवण्यात आले. इच्छुक संघानी ४ फेब्रुवारीपर्यंत नौशाद मुजावर (मो. ९८३४५०४६५७) अथवा दिनेश कौलगे (९७३०१३१३४०) यांच्याकडे नोंदणी करावी.

### हॉलीबॉल स्पर्धेत जयंत खंडागळे संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३ फेब्रुवारी-**
श्रीपूर येथील ब्रिमा सागर कारखान्यात कै. यश कोठारी यांच्या पुण्यस्मरणा निमित्त घेण्यात आलेल्य व्हॉलीबॉल स्पर्धेत जयंत खंडागळे संघाने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेचे उद्घाटन कारखान्याचे डायरेक्टर उदय कोठारी, आंतरराष्ट्रीय खेळाडू जयंत खंडागळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते दत्तात्रय मोरे यांच्या हस्ते क्रीडांगणाचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, डे. मॅनेजर चंद्रकांत भागवत, नरेश पाठक, जयंत आरगडे, सुरक्षा अधिकारी भागवत पारसे उपस्थित होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक जयंत खंडागळे व्हॉलीबॉल संघाने प्रथम क्रमांक मिळवत अकरा हजार १११ रुपये व ट्रॉफी, दुसरे बक्षीस बी. एस. एम. डी. एल. व्हॉलीबॉल संघ अ श्रीपूर, सात हजार १११ रुपये व ट्रॉफी, तिसरे बक्षीस बिजवडी व्हॉलीबॉल संघ तालुका माण जिल्हा सातारा पाच हजार १११ रुपये व ट्रॉफी, चौथे बक्षीस दूध पंढरी हॉलीबॉल संघ पंढरपूर तीन हजार १११ रुपये व ट्रॉफी त्याच बरोबर बेस्ट नेटसमन विशाल शेरे, बेस्ट डिफेन्सर शुभम भोसले, बेस्ट शूटर जुनेद कुरेशी यांनी बक्षीसे मिळवली. विजेत्यांना ब्रिमा सागरचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेसाठी अंपायर म्हणून रहीम तांबोळी, दादा पवार, स्कोरर म्हणून नितीन मिस्कर, समालोचन अनिल रणदिवे , आप्पा खुळे यांनी काम पाहिले. स्पर्धा पार पाडण्यासाठी भागवत पारसे, ऋषिकेश सदगर, सत्यजित पाटील, नानासाहेब केचे, अफजल शेख, रवींद्र नाईकनवरे,जयवंत गरड, दादा पवार, अजय खरे, पांडुरंग जाधव आबा मिस्कर, रहीम तांबोळी, ब्रिमा सागर कामगार वर्ग, सर्व व्हॉलीबॉल खेळाडू यांनी परिश्रम घेतले.

# बंद पडलेल्या जलतरण तलावामध्ये आंदोलन

## संभाजी ब्रिगेडचे अनोखे आंदोलन; पालकमंत्र्यांनी लक्ष घालण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**
संभाजी ब्रिगेडच्या वतीने विजापूर रोड जवळील आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव हा सुमारे ३ कोटी खर्च करून बांधलेला होता गेल्या चार-पाच वर्षांपासून तो तलाव बंद आहे त्यामुळे नागरिकांची व जलतरणपटूंची गैरसोय होत असल्याकारणाने या रिकामा तलावात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी पोहून गांधीगिरी मार्गाने अनोखे आंदोलन करण्यात आले.

विजापूर रोड जुळे सोलापूर व होडगी रोड परिसरातील नागरिकांना व जलतरणपटूंच्या सोयीसाठी हा जलतरण तलाव बांधण्यात आला होता. २०१८ मध्ये या तलावाचे उद्घाटन करण्यात आले होते.



यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले कार्याध्यक्ष अरविंद शेळके दक्षिण सोलापूर तालुका प्रमुख शेखर चौगुले दिलीप निंबाळकर मल्लिकार्जुन चाबुस्कर विठ्ठल भोसले आकाश कोळी सिद्धार्थ राजगुरू महेश भंडारे सचिन वनमाने रमेश चव्हाण राजेंद्र माने भरत भोसले ओंकार कदम सिद्धाराम कोरे शेखर कंटेकर रमेश चव्हाण साईनाथ फडतरे आदि उपस्थित होते.

### तत्कालीन पालकमंत्र्याचे प्रयत्नही अयशस्वी

जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष पालकमंत्री व जिल्हाधिकारी उपाध्यक्ष असतात. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत या संदर्भात बैठक झाली होती. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उपस्थित होते. परंतु आयुक्त तेली उगले अनुपस्थित असल्यामुळे निर्णय झाला नव्हता. परंतु तो तलाव महापालिकेने दुरुस्त करून द्यावा, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले होते. परंतु दोन्ही अधिकाऱ्याची अनास्था ात दिसून आली. आता नवीन पालकमंत्री यात लक्ष घालतील का असा प्रश्न जलतरणप्रेमीतून होत आहे

### महापालिका, क्रीडा कार्यालयाची टोलवाटोलवी

महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय ही दोन्ही कार्यालय एकमेकांवर लेखी पत्राने एकमेकावर आरोप करून टोलवाटोलवी करत आहेत. जिल्हा क्रीडा कार्यालयाने १४ फेब्रुवारी २४ पत्राने जलतरण तलाव दुरुस्तीसाठी ५५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. हा खर्च तरी द्यावा किंवा तलाव दुरुस्त करून द्यावा, तेव्हा आम्ही ताबा घेऊ असे कळविले असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी सांगितले. तर महापालिकेने ११ डिसेंबर २०२४ च्या पत्राने १५ डिसेंबर पासून ताबा सोडला आहे आणि सुरक्षा रक्षक ही काढून घेतले आहे, असे पत्र दिल्याचे तत्कालीन महापालिका क्रीडा अधिकारी गोपाळ पिडगुलकर यांनी सांगितले होते. त्यामुळे तीन कोटीच्या या शासकीय जलतरण तलावास दोन्ही कार्यालयाने वाऱ्यावर सोडले आहे

# पंढरपूरचा शुभम देवळकर सोलापूर टॉप १० श्री

## आ. सुभाष देशमुख पश्चिम महाराष्ट्र श्रीचा मानकरी बनला सांगलीचा विश्वनाथ बकाली






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी -**
सांगलीचा विश्वनाथ बकाली याने आमदार सुभाषबापू देशमुख पश्चिम महाराष्ट्र श्री शरीर सौष्ठव स्पर्धेचा मान मिळविला. सांगलीचा राकेश कांबळे उपविजेता ठरला. बेस्ट पोजरचा मान कोल्हापूरच्या ओंकार मिसाळ याने प्राप्त केला.

पंढरपूरचा शुभम देवळकरने युवानेते मनिष भैय्या देशमुख सोलापूर टॉप १० श्री चा मान मिळविला. करमाळ्याचा विशाल जाधवने उपविजेतेपद संपादिले. या स्पर्धेत एक लाख ५१ हजाराची पारितोषिके देण्यात आली.

भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर यांनी नेहरूनगर शासकीय ग्राऊंडवर या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे उदघाट्न सोलापूर जिल्हा भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस मनिष देशमुख यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग संघटनेचे अध्यक्ष संतोष पवार, एपीआय गायकवाड, रयतक्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, भाजपचे जेष्ठ नेते अनंत जाधव, बॉडी बिल्डिंग संघटनेचे सरचिटणीस विशाल गायकवाड, उपाध्यक्ष शशिकांत अक्कळवाडी, अमोल गायकवाड, महेश देवकर, डॉ. शिवराज सरतापे, श्रीनिवास बुरुडकर, शीतल गायकवाड, मनोजकुमार अलकुंटे, श्रीशैल हिरेपठ, भागवत शिंदे, संतोष कदम, अरुण कदम, आनंद गोसकी, राम आडम आदी उपस्थित होते.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचा साऊथ एशिया गोल्ड मेडलिस्ट पंचाक्षरी लोणारचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत १४३ खेळाडूनीं भाग घेतला. राजेस वडाम, मुरली वत्स, विशाल गायकवाड, संदीप यादव, शेखर खरमोठे, ओम सातपुते, विशाल विधाते, प्रदीप कांबळे, अमोल लांडगे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

# सोलापूर विद्यापीठात उपचारात्मक योगावर शनिवारी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलामार्फत पीएम-उषा योजनेतंर्गत उपचारात्मक योग या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाच्या सभागृहात करण्यात आल्याची माहिती आरोग्य संकुलाचे समन्वयक डॉ. अभिजीत जगताप यांनी दिली.

आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत योगशिक्षक पदविका आणि एम. ए. योग हे योगविषयक अभ्यासक्रम सुरू आहेत. या अभ्यासक्रमाद्वारे योगशास्त्राच्या प्रसाराचे कार्य चालू आहे. सदर अभ्यासक्रमांना शहरातील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.या कार्यशाळेत महिलांचे आरोग्य, ताणतणाव नियंत्रण, मानसिक स्वास्थ यासाठी 'उपचारात्मक योग', 'मेडिकल योग' आणि 'योगमधील संशोधन' या विषयांवर तज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाईल. कार्यशाळेसाठी नोंदणी शुल्क रु. १०० असून कार्यशाळा ही सर्व क्षेत्रातील व्यक्तींसाठी खुली ठेवण्यात आली आहे. कार्यशाळेचा जास्तीत जास्त व्यक्तींनी लाभ घ्यावा, असे आवाहन संकुलाचे समन्वयक डॉ. अभिजीत जगताप यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. शालिनी मस्के (७७२२०३६८७६) आणि प्रा. तृप्ती आवताडे (७०२००६५३२१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

# भारताच्या लॉन टेनिस संघात सोलापूरच्या संध्याराणी बंडगरची निवड

**सोलापूर दि. ३ फेब्रुवारी-**
येथील संध्याराणी गणेशराज बंडगर हिची भारताच्या लॉन टेनिस संघात निवड झाली. टर्की (मानवगट) येथे ९ ते १४ मार्च या कालावधीत होणा-या आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने आयोजित केलेल्या मास्टर वर्ल्ड टूर टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतातर्फे सहभागी होणा-या ४० वर्षापुढील वयोगटातील महिलांच्या संघात प्रतिनिधित्व करेल.



संध्याराणीने २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने सोलापूर, झज्जर(हरियाणा) व इंदौर येथे आयोजित केलेल्या स्पर्धेत सहभाग नोंदवून विजेतेपद व उपविजेतेपद पटकावले होते. या यशामुळे व वयैक्तिक गुणात वाढ होऊन तिने या वयोगटात प्रथम मानांकन प्राप्त केले होते. संध्याराणी या विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण खात्यात मुख्य लेखापाल पदावर कार्यरत असून त्यांना मनिषा पाटील, डीएफओ यांचे सहकार्य तसेच महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. सुधीर सालगुडे हे त्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी तसेच संघटनेचे सहसचिव पंकज शहा, कोषाध्यक्ष दिलीप अत्रे व दिलीप बचुवार यांनी शुभेच्छा दिल्या.

# भाजप क्रीडा प्रकोष्ठतर्फे स्पोर्टस कराटे कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**
शालेय व विद्यापीठ क्रीडा स्पर्धा तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कराटे क्रीडा प्रकारात उपयुक्त अशा नियम , गुणांकन व खेळतंत्रांच्या निःशुल्क प्रशिक्षणाची कार्यशाळा पोलीस कल्याण केंद्र येथे भाजप क्रीडा प्रकोष्ठ यशवंत पाथरूट आणि ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन व रुद्र अॅकॅडमी ऑफ मार्शल आर्टस व योग संस्था प्रमुख संगीता सुरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.

आधुनिक तंत्रज्ञान वापरुन कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव संदीप गाडे यांच्या सहमतीने व नॅशनल कोच कीर्तन कोंडू यांच्या अनुमतीने संयोजित केलेल्या या कार्यशाळेत कॉमनवेल्थ व साऊथ एशियन मेडलिस्ट वर्ल्ड रँकर अॅथलिट भुवनेश्वरी संगीता सुरेश जाधव यांनी हैद्राबाद येथील राष्ट्रीय कराटे मुख्यालयामधून ऑनलाईन पद्धतीने आणि राष्ट्रीय अस्तरीय पंच मिहिर संगीता सुरेश जाधव या तज्ज्ञांनी ऑफलाईन पद्धतीने चौदा व सतरा वर्षाखालील सहभागी अडीचशे कराटेपटूंना अद्ययावत व्हिडीओ क्लीप व प्रत्यक्ष कौशल्य तंत्रांच्या माध्यमातून तीन तासांचे दर्जेदार प्रशिक्षण दिले. क्रीडा प्रकोष्ठकडून योजलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते व शहराध्यक्ष नरेंद्र काळे, क्रीडा क्रीडाधिकारी गणेश पवार, पुअहो सोलापुर विद्यापीठ सिनेट सदस्य सचिन गायकवाड, क्रीडा शिक्षक संघटनेचे दशरथ गुरव यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी विविध कराटे संस्थांचे प्रमुख प्रशिक्षक आकाश झळकेनवरु, शिवशरण वाणीपरीट, प्रभुराज भिमदे, दशरथ काळे (सोलापुर) , यशवंत ढवण (पुणे), हर्षल पाडेलकर (मुंबई) हे उपस्थित होते. या कार्यशाळेचे संयोजन भाजप क्रीडा प्रकोष्ठच्या यशवंत पाथरुट यांनी संतोषकुमार कदम, किशोर सोलसकर यांच्यासह ऋतुराज साठे, अथर्व पवार, ओवी शिंदे यांच्या सहयोगाने पोलीस कल्याण केंद्राच्या प्रशस्त जागेत आधुनिक भव्य स्क्रीन लावून योग्य त्या सोयी सुविधांसह केले गेले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.




### कराटेपटूंचा सत्कार

यावेळी बोलताना कोठे म्हणाले की, भाजप तर्फे दर्जेदार क्रीडापटू व क्रीडाप्रकारांना आवश्यक त्या साहित्यासह योग्य ते प्रशिक्षक उपलब्ध करवून देऊन अधिकृत स्पर्धेसाठी गरजेची सर्व मदत मिळवून दिली जाईल. याप्रसंगी अकराव्या कॉमनवेल्थ कराटे चँपियनशीप विजेते भुवनेश्वरी सह आर्या यादव, अक्षिता कुलकर्णी, आदित्य पालिया, संकेत धन्नाईक , समिहान कुलकर्णी आणि खेलो इंडिया राष्ट्रीय कलरीपयत खेळाडू संस्कार कदम, अंश सोलसकर,अनुष्का पल्ली यांचा सत्कार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते करण्यात आला.

**३८ वी नॅशनल गेम्स**

# खो-खोत महाराष्ट्रचा डबल धमाका

## महिला व पुरूष संघाला सुवर्णपदक; पदकतालिकेत अव्वल क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**हल्दवणी, ३ फेब्रुवारी-**
३८ वी नॅशनल गेम्समध्ये (राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत) राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्रच्या महिला आणि पुरूष संघाने ओरिसाच्या दोन्ही संघांवर मात करित डबल धमाका साधला आहे. महिला आणि पुरूष संघानी सुवर्णपदक पटकाविले आहे. या विजयामुळे महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे.

उत्तराखंड येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत आज झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने ओडिसावर चूरशीच्या सामन्यात ३ गुणांनी (३१-२८) असा पराभव केला. मध्यंतराला महाराष्ट्र कडे तीन गुणांची (१५-१२) आघाडी होती. दुसऱ्या सत्रात कायम राखण्यात महाराष्ट्र संघाला यश आले. त्यामुळे हा विजय सुकर झाला. विजयी महाराष्ट्रातर्फे प्रियांका इंगळे (१.३० मि. , १.५२ मि. संरक्षण आणि ४ गुण), अश्विनी शिंदे (१.२३ मि. संरक्षण व १० गुण), संध्या सुरवसे (२.२४ मि., २.२३ मि. संरक्षण व २ गुण), रेश्मा राठोड (१.११ मि., १.४५ मि. संरक्षण आणि ४ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर ओडिसा तर्फे अर्चना प्रधान (१ मि., १.३५ मि. संरक्षण आणि ४ गुण), सुभश्री सिंग (१.८ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी चांगला खेळ केला.



पुरूष गटात महाराष्ट्राने ओडिसाचा सव्वा सात मिनिटे राखून ६ गुणांनी (३२-२६) पराभव केला. त्यात महाराष्ट्राच्या रामजी कश्यप (२.२० मि., १.१० मि. संरक्षण व २ गुण), सुयश गरगटे (१.१० मि. संरक्षण व ६ गुण), अनिकेत चेंदवणेकर (१ मि. व २ मि. संरक्षण), प्रतिक वायकर (१ मि. संरक्षण व ६ गुण), शुभम थोरात (१.३० मि., १.२० मि. संरक्षण आणि २ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. पराभूत संघातर्फे पाबनी साबर (१ मि. संरक्षण व ६ गुण), सुनिल पात्रा (१.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला.

उत्तराखंड येथे सुरू असलेल्या या नॅशनल गेम्समध्ये सर्व खेळात महाराष्ट्रच्या पथकाने चांगली कामगिरी बजावली आहे. खो-खो स्पर्धेतील यशामुळे पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर पोहोचला आहे. आतापर्यंत दहा सुवर्ण, १६ रौप्य, ११ कांस्य पदके मिळाली आहेत. खो-खो संघाने सुवर्णमय कामगिरी केल्याबद्दल दोन्ही संघाचे खेळाडू, प्रशिक्षक राजेंद्र साप्ते, पंकज चवंडे यांचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर, सचिव डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार अॅड. गोविंद शर्मा यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य आणि खेळाडूंनी अभिनंदन केले आहे.

### सलग चार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रास सुवर्ण

सलग चार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष व महिला संघाने सुवर्णमय कामगिरी केली आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे. यासाठी सर्व जिल्हा संघटना, राज्य शासनाचे क्रीडा खाते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, क्रीडा मंत्री भरणे यांचे मनापासून आभार मानतो. येणाऱ्या काळात होणाऱ्या स्पर्धामध्ये महाराष्ट्र अव्वल कामगिरी करीत राहील याची खात्री देतो.

**- डॉ. चंद्रजित जाधव, सचिव, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

## संक्षिप्त वृत्त

### आसरा चौकात हाणामारी; दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास आसरा चौकात झालेल्या हाणामारीमध्ये दोघे जखमी झाले. साईनाथ प्रभाकर द्यावनपल्ली (वय २३, रा. दत्त नगर, सोलापूर) आणि झुलफेकर उस्मान शेख (वय ३२, रा. नई जिंदगी, सोलापूर) अशी जखमींची नावे असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास आसरा चौकात अज्ञात कारणावरून साईनाथ द्यावनपल्लीला झुलफेकर शेख व इतर ७ जणांनी मिळून लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. तर झुलफेकर शेख यास साईनाथ द्यावनपल्ली व इतर चौघांनी मिळून लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण केली. या मारहाणीत साईनाथ व झुलफेकर हे दोघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी रोहित शिरसाल व इम्रान शेख यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अचानक ब्रेक दाबल्याने रिक्षा पलटी

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

दुचाकीस्वार समोर आल्याने अचानक ब्रेक दाबल्याने रिक्षा पलटी होऊन रिक्षाचालकासह दोघे जखमी झाले. अमजद जिलानी शेख (वय ४०, रा. शेटे वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) आणि अजीम बाबू (वय ४०, रा. एस टी स्टॅन्ड, सोलापूर) अशी जखमीची नावे आहेत. ३ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास अमजद शेख हे एस टी स्टॅन्ड येथून मार्केट यार्डकडे रिक्षा चालवित जात असताना मार्केट यार्ड जवळील बकरी बाजारजवळ रिक्षासमोर अचानक दुचाकी आडवी आल्याने रिक्षाला अचानक ब्रेक मारला. त्यामुळे रिक्षा पलटी होऊन त्यात चालक अमजद शेख यांच्या डोक्याला मार लागून तसेच पाठीमागील प्रवासी अजीम बाबू हे दोघे जखमी झाल्याने त्यांना अमजद यांची पत्नी सैफनबी शेख यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मानेगावात लोखंडी रॉडने मारल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

मानेगाव (ता. माढा) येथे लोखंडी रॉडने मारल्याने तरूण जखमी झाला. ज्ञानेश्वर पंडीत राऊत (वय ३१, रा. मानेगाव) असे जखमीचे नाव आहे. २ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास मानेगाव येथील शिवाजी चौकात अज्ञात कारणाने योगेश माने, विजय डोळसे व इतर ६ जणांनी मिळून लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने ज्ञानेश्वर यास मारहाण केली. या मारहाणीत ज्ञानेश्वर याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी संजय राऊत यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### नशेत स्वत:वर ब्लेडने वार करून घेतल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

नशेत स्वतःवर ब्लेडने वार करून घेतल्याने तरूण जखमी झाला. किशार अमरसिंग बंबेवाले (पस ३९, रा. बापूजी नगर झोपडपट्टी, सोलापूर सध्या रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास किशोर बंबेवाले याने दारूच्या नशेत राहत्या घरी स्वतःहून ब्लेडने गळ्यावर वार करून घेतल्याने जखमी अवस्थेत त्याला भाऊ सुनिल बंबेवाले यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अकोले येथे शेतात पाण्याच्या कारणावरून एकास मारहाण

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

अकोले (मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर) येथे शेतात पाण्याच्या कारणावरून एकास मारहाण करून जखमी करण्यात आले. बाळासाहेब पांडुरंग बंडगर (वय ५५, रा. अकोले) असे जखमीचे नाव आहे. ३ फेब्रुवारी रोजी सकाळी शेतात पाण्याच्या कारणावरून बाळासाहेब बंडगर यांना नागनाथ बजरंग बंडगर, श्रीधर रेवणसिध्द बंडगर, गोविंद बंडगर यांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये बाळासाहेब बंडगर यांच्या सर्वांगास मुका मार लागून ते जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




### वीरतपस्वींच्या प्रांगणात बहरला आनंदमेळा

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजींच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री वीरतपस्वी शिक्षण संकुल एमआयडीसी येथे आनंदमेळाचे आयोजन करण्यात आलेले असून त्याचे उद्घाटन काशी जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय खोमणे, संस्थेचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे व शिवानंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी केले. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांकडून ९० स्टॉल उभारण्यात आले होते. यामध्ये अंदाजे चार लाखांची उलाढाल झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, भाजीपाला व मनोरंजनात्मक खेळ ठेवलेले होते. हॉर्स रायडिंग, जम्पिंग, मिकी माऊस, पाण्यातील होडी याचाही आनंद बालगोपाळांनी घेतला. यातून विद्यार्थ्यांना व्यवसायिकतेचे व्यवहारज्ञान, खरेदी विक्री, नफा- तोटा यांचे ज्ञान मिळाले. आनंद मेळाव्यासाठी ३०० बाय ५०० मंडप, ९० स्टॉल, राजस्थान पद्धतीचे प्रवेशद्वार, १००० स्केअर फुटचे एलईडी वॉल, ५०० फोकस लाईटची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी दिली.




दक्षिण सिनेसृष्टीतील पद्मभूषण पुरस्कारप्राप्त अभिनेते नंदमुरी बाळकृष्णा यांचा सोलापूरच्या फॅन्सनी सत्कार केल्यानंतर त्यांनी दै. 'तरुण भारत'चा अंक पाहिला, वाचला आणि फॅन्सबरोबर अंकाचे प्रकाशनही केले. यावेळी एनबीके हेल्पिंग अॅन्ड फौंडर अनंतपुरम जगन, एनबीके युथ फौंडेशनचे प्रेसिडेंट नरसिम्हा कनकी, श्रीनिवास नंदाल, नागनाथ बंडा, हरी बुरा व फॅन्स.

## जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारींची झिरो पेंडन्सी ठेवा

- जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या विभाग प्रमुखांना सूचना
- प्रत्येक अधिकाऱ्यांनी लोकशाही दिनी हजर राहण्याचे आदेश
- सोमवारी दाखल झाल्या ५४ तक्रारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचे वेळेत निवारण करुन कायम झिरो पेंडन्सी राहावी, अशी सुचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या विभागप्रमुखांना आज सोमवार, दि. ०३ रोजी दिल्या. प्रत्येक लोकशाही दिनी सर्व विभागप्रमुखांनी हजर राहून नागरिकांच्या तक्रारीचा निपटारा करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, आज जिल्ह्यातून ५४ तक्रारी दाखल झाल्या असून, त्याचा एकेक करून लवकर निपटारा करण्याची ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आज दिली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. जिल्ह्यातून आलेल्या विविध तक्रारींची दखल घेऊन त्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी, तसेच तक्रारदाराला आपल्या तक्रारी संदर्भामध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती दिल्यास त्यांचे समाधान होईल. या दृष्टीने सर्व विभागप्रमुखांनी दखल घ्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रमाणे जिल्हा लोकशाही दिनाम ध्ये मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल होतात. प्रत्येक तक्रारीची चौकशी करुन संबंधित विभाग प्रमुखांकडून जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल मागितला आहे. यावेळी लोकशाही दिनामध्ये ५४ तक्रारी दाखल झाल्या आहेत. लोकशाही दिनी सर्व विभागप्रमुखांनी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले. श्रम व पैसा खर्च करुन सामान्य जनता आपल्या तक्रारी जिल्हा प्रशासनासमोर मांडण्यासाठी येतात. त्यांच्या तक्रारीसंदर्भात समाधान करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले. जिल्हा लोकशाही दिनी यापूर्वी सादर झालेल्या परंतु अद्यापर्यंत निपटारा न झालेल्या तक्रारीचा सर्व विभागाने आढावा घ्यावा. या सर्व तक्रारी एक महिन्याच्या आत निकाली काढाव्या, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.



### जिल्हा परिषदेचे सर्वाधिक ९ तक्रारी अर्ज

सोमवारी लोकशाही दिन असल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केल्या. यामध्ये जिल्हा परिषद सोलापूर एकूण ९ तक्रारी अर्ज, जिल्हा पोलिस अधीक्षक १, पोलिस आयुक्त (शहर) २, जिल्हा भूमि अभिलेख कार्यालय १, आस्थापना (जिअका) ४, सिव्हील सर्जन १, कामगार आयुक्त १, साबां विभाग ६, गौणखनिज २, महसूल शाखा ३, बार्शी तहसीलदार १, भीमा पाटबंधारे विभाग १, उत्तर तहसीलदार १, कृषी विभाग, सोलापूर २, जिल्हा मृद जलसंधारण विभाग, सोलापूर १, महावितरण सोलापूर २, मोहोळ तहसीलदार ३, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक, सोलापूर १, वनविभाग २, जातपडताळणी विभाग १, भूसंपादन शाखा १, दक्षिण सोलापूर तहसीलदार २, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय २, प्रांत पंढरपूर कार्यालय १, इतर अर्जदार यांना उत्तर देणे २, दुय्यम निबंधक १ अशा ५४ तक्रारी दाखल झाल्या आहेत.

## ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत आजपर्यंत जिल्ह्यात १२ हजारांवर शेतकऱ्यांची नोंदणी

**शेतकऱ्यांनी ओळख क्रमांकासाठी नोंदणी करण्याचे आवाहन**



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जानेवारी-**

शासनाच्या विविध कृषीसंलग्न योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीने व अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक दिला जात आहे. आजतागायत जिल्ह्यात १२ हजाराच्यावर शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, उत्तर सोलापूर तालुक्यामधील सर्व गावामध्ये सध्या ॲग्रिस्टॅक योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची कार्यवाही सुरु झाली आहे. याच धर्तीवर जिल्ह्यातील इतर तालुक्यातही होणार आहे. दरम्यान, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गावातील CSC चालक व महा ई सेवा चालक यांना सोबत घेऊन मोहिम स्वरुपात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रम ांक काढले जाणार आहेत. आपल्या गावच्या ग्राम महसूल अधिकाऱ्यांना गावामध्ये उपस्थित राहून सदरचे काम काज मोहिम स्वरुपात करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. आधार मोबाईल नंबर लिंक असलेले घेऊन आपले गावचे ग्राम महसूल अधिकारी, CSC चालक व महा ई सेवा चालक यांचेशी संपर्क साधून शेतकरी ओळख क्रमांक तयार करुन घ्यावा. असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना डिजिटल डेटाबसचा होणार फायदा

या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा आणि त्यांच्या शेतीच्या माहितीचा एक स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार केला जात आहे. यामध्ये जमिनीचा प्रकार, हवामान, लागवडीचे पद्धती, पाणीपुरवठा, पीक प्रकार, उत्पादन आणि विक्रीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबीची माहिती असणार आहे. ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी स्थापन स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## बेकायदा फेरीवाल्यांना पालिका-पोलिसांचाही नाही धाक

**पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई थंडावली**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

बेकायदा फेरीवाल्यांनी शहरातील एकही गल्ली किंवा जागा सोडलेली नाही. पदपथावरील बेकायदा फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे नागरिकांना एखाद्या दुकानात जाणेही कठीण होऊ बसले आहेत. पालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक किंवा पोलीस तैनात असले तरी बेकायदा फेरीवाले निर्धास्तपणे त्यांचा व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. या बेकायदा फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज असून महापालिका रस्ते, पदपथ फेरीवाला मुक्त ठेवण्याच्या म ुद्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते. बेकायदा फेरीवाल्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिका प्रशासनाला प्रयत्न करावे लागणार आहेत. परंतु, कारवाई करूनही पदपथांवर बेकायदा फेरीवाल्यांचे पुन्हा साम्राज्य दिसत असेल तर कारवाईमध्ये दोष असल्याचे दिसून येते.

शहरातील प्रत्येक पदपथावर बेकायदा फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याचे आणि त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे दिसून येते. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आल्यानंतर त्यांना पुन्हा पदपथ आणि रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण करण्यापासून रोखणे हे महापालिका अतिक्रमण विरोधी पथकावर आहे. त्याम ुळे, बेकायदा फेरीवाले पुन्हा पदपथावर अतिक्रमण करणार नाही यावर देखरेख ठेवणे ही म हापालिकेची जबाबदारी पालिका झटकित असल्याचे दिसून येते.

शहरात फेरीवाल्यांचे अतिक्रमण मोठ्या प्रमाणात असले तर परवानाधारक फेरीवाले त्यामानाने खूपच कमी आहेत. तर काही परवनाधारक फेरीवाल्यांच्या परवान्याची मुदत संपल्याचे दिसून येते. त्या फेरीवाल्यांनी त्यांचे परवाने नुतनीकरण करूनच घेतले नसल्याचे दिसून येते.

## वाहनाचे हफ्ते चुकवले; कर्जदाराच्या मुलाचे अपहरण

**तिघे जेलरोड पोलिसांच्या ताब्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**

सोलापुरात एका खासगी बँकेतील वसुली कर्मचाऱ्यांनी माणुसकीला काळिमा फासेल, असे कृत्य केले आहे. चारचाकी वाहनाचे हफ्त चुकवले म्हणून वाहनासह कर्जदाराच्या मुलालाही उचलून नेल्याची धक्कादायक घटना जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. याप्रकरणी, पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक फेब्रुवारी रोजी शहरातील जेलरोड पोलीस ठाण्यात एका तरुणाचे अपहरण झाल्याची तक्रार झाल्यानंतर पोलिसांनी याबाबत तपास केला. त्यानुसार, येथील बँक कर्मचाऱ्यांनी चारचाकी वाहनाचे हप्ते भरले नसल्याने कर्जदाराच्या मुलाचे चक्क अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे चारचाकी वाहनासह कर्जदाराच्या मुलाचेही अपहरण करण्यात आले होते. सोलापुरात या खासगी बँकेच्या वसुली कर्मचाऱ्यांकडून मोठी मुजोरी करण्यात आल्याचे पोलीस तपासातून समोर आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या कर्मचाऱ्यांनी कर्जदाराच्या मुलाचे अपहरण करत त्यास एका गोडाऊनमध्ये डांबून ठेवले होते. याप्रकरणी वसुलीसाठी अपहरण करणाऱ्या शकील बोंडे, इमरान शेख, देवा जाधव या तिघांविरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील अधिक तपास सुरू आहे.

वसुली कर्मचाऱ्यांनी कर्जदाराच्या मुलाचे अपहरण केले. मात्र, त्यानंतरही मुलाला सोडण्यासाठी दहा हजार रुपयांची खंडणी मागितल्याचेही पोलिसा तपासातून समोर आले आहे. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने जबरदस्तीने वसुली करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिला आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## महापालिकेच्यावतीने महात्मा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

महानगरपालिकेच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त रेल्वे स्टेशन चौक येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील कार्यालयात पूज्य महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे,समीर मुलाणी, विशाल सिद्दीवाल, पुरुषोत्तम बलदवा,उपेंद्र ठाकर, प्रा.राहुल बोळकोटे, व्ही.डी. गायकवाड, प्रा. सोमनाथ बडदाळ, सूर्यकांत शिवशरण, सोनाली सगर, बळीराम एडके, प्रमोद भवाळ, सोपान खांडेकर, लता ढेरे, डॉ. योगेश पल्लोलू उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### दाढी-कटिंगच्या दरात २० टक्के वाढ

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरातील सर्व नाभिक दुकानदाराची बैठक झाली. या बैठकीत दाढी कटिंगच्या दरामध्ये २० टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती नाभिक दुकानदार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर भालेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. महाराष्ट्रातील इतर शहर - जिल्ह्यात झालेली दरवाढ पाहता सोलापुरातही २० टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दि. १ फेब्रुवारी २०२५ पासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील मिळकत कर, लाईट बिल, जागा भाडे, सौंदर्यप्रसाधने यासह विविध साहित्याच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. यामुळे ही दर वाढ करणे अपरिहार्य ठरले आहे. त्यानुसार सध्या १०० रुपये असलेल्या कटिंगच्या दरात २० रुपयाने वाढ करण्यात आली आहे तर तर दाढी दर ५० रुपयावरून ६० रुपये करण्यात आला आहे, असे प्रभाकर भालेकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस बापूराव काळे, संतोष राऊत, भारत शिंदे, प्रकाश शिंदे, आनंद वाघमारे आदी उपस्थित होते.

### कॉल केल्याच्या कारणावरून शिवीगाळ

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

वारंवा कॉल का करतो असे विचारल्याच्या कारणावरून शिवीगाळ करून आत्महत्या करण्याची धमकी देणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रकाश शंकर काळे (वय ४९, रा. पाटील चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन कासिम रफिक पटेल (वय १९, रा. मदिना मशिदजवळ, सलगर वस्ती, सोलापूर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकाश काळे व कासिम पटेल हे दोघे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. २ फेब्रुवारी रोजी प्रकाश काळे हे दुपारी घरी असताना कासिम पटेल याने त्यांच्या मोबाईलवर कॉल केला. त्यावेळी काळे यांनी तु माझ्या फोनवरती सारखे सारखे कॉल का करतो, तु परत माझ्या मोबाईलवर कॉल करू नको असे म्हणाल्यानंतर पटेल याने काळे यांना शिवीगाळ करून मी म ाझ्या जीवाचे काही तरी करून घेतो व तुमच्या नावाची चिठ्ठी लिहून ठेवतो अशी धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

# हजारो नयनांनी अनुभवला याची देही याची डोळा रिंगण सोहळा!



# टाळ-मृदुंगाच्या गजरात नार्थकोट मैदानावर रंगला माघवारी सोहळा

**▸ प्रदीप मोरे यांच्या हस्ते अश्वपूजन, ६३ दिंड्या पंढरपूरकडे रवाना : साठे चाळीत मंगळवारचा मुक्काम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी**

सोलापूर शहर व जिल्ह्यातून माघवारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या सर्व दिंड्यांचे एकत्रीकरण करून त्या दिंड्यांचा एक अलौकिक रिंगण सोहळा मंगळवारी सायंकाळच्या सुमारास शहरातील नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर रंगला होता. मार्कंडेय मंदिरामध्ये पूजन केल्यानंतर नॉर्थकोट मैदानावर रिंगण सोहळा झाला. तर नंतर दिंड्या पंढरपूरच्या दिशेने रवाना झाल्या.

दरम्यान, माघ शुद्ध षष्टीला ३ फेब्रुवारी रोजी श्री.मार्कंडेय मंदिर, पंचकट्टा सोलापूर येथे( दु.५) वा. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी पूजन नागनाथ शिंदे महाराज , महेश जाधव महाराज, मल्लिनाथ गट्टे यांचे हस्ते करण्यात आले. वारकरी प्रथे प्रमाणे नित्य नियमाचे अभंग व भजन करून त्यावेळी जे उपस्थित सर्व दिंडीतील विणेकरी महाराज व पदाधिकारी यांचा सुरेश फलमारी पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर यांचे कडून दरवर्षी प्रमाणे सन्मान करण्यात आला . हा पालखी सोहळा ज्ञानोबा तुकाराम भजनाच्या गजरामध्ये नॉर्थकोट प्रशाला मैदान, सोलापूर येथे पोहोचल्या नंतर मान्यवर व उमाकांत मिटकर , दत्ता अण्णा सुरवसे, प्रदीप मोरे महाराज यांचे हस्ते अश्व पूजन केले तसेच अश्व चोपदार तुकाराम कोळी यांचा ही सत्कार करण्यात आला. तदनंतर महिला व पुरुष वारकरी भाविकांनी उत्साहमध्ये पाऊल , फुगडी खेळ केले व नंतर गोल रिंगण लाऊन घेतले . पहिले रिंगण ध्वजाधारी भाविकांचे झाले कारण दिंडीची सुरुवात पताका ने होते . तुळशी वृंदावनधारी महिला व मृदंगाचे रिंगण झाल्या नंतर विणेकरी रिंगण केले. शेवटी अश्व रिंगण करण्यासाठी कर्नाटक अंकली येथून आषाढी वारीतील माऊलींचे अश्व आले होते. अश्व रिंगण सुरु झाले आणि भाविकांमध्ये चैतन्य संचरले. सर्व वातावरण हे पंढरीमय झाले होते. सोलापूरकरांना वारीतील आनंद या माध्यमातून घेता आला.

हा सोहळा श्री महादेव मंदिर साठे चाळ, सोलापूर येथे पोहोचला व नंतर आनंद चंदनशिवे , विजय चोरमुले यांच्या हस्ते आरती करून समारोप केला. यामध्ये शहरातील ३८ व परिसरातील २५ दिंडी सहभागी झाल्या होत्या. हा सोहळा पाहण्यासाठी शहरातील व परिसरातील हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. तसेच सुधाकर इंगळे महाराज (राष्ट्रीय अध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला असून या सर्व कार्यक्रमासाठी जोतिराम चांगभले (प्रदेशअध्यक्ष), बळीराम जांभळे (राष्ट्रीय सचिव), किसन कापसे (प्रदेश उपाध्यक्ष), मोहन शेळके (प्रदेश सचिव), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा अध्यक्ष), संजय पवार (शहरअध्यक्ष), सचिन गायकवाड (उपाध्यक्ष) व पदाधिकारीनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात सुमारे १० हजार बेकायदेशीर रिक्षा

**▸ आरटीओकडील नोंदीनुसार १६ हजार ९७३ अधिकृत रिक्षा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**

शहराच्या विविध मार्गांवर विनापरवाना, आवश्यक कागदपत्रे, प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना आणि बॅच नसताना देखील बेकायदेशीरपणे रिक्षा धावत आहेत. प्रवासी वाहतूक करणाऱ्या बेकायदेशीर रिक्षाचालकांच्या अरेरावी आणि मनमानीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. पोलिस व प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) कडून बेकायदेशीर रिक्षां तसेच रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात येते; मात्र पुन्हा शहरात अनधिकृत रिक्षांचा सुळसुळाट पुन्हा वाढल्याचे समोर आले आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्यात जवळपास १६ हजार ९७३ रिक्षांची सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद आहे. मात्र प्रत्यक्षात नोंद नसलेल्या तरीदेखील शहरात सुमारे १० हजार अनधिकृत किंवा स्क्रॅप रिक्षा शहरात धावत आहेत. हे रिक्षाचालक मनम ानीपणे थेट भाडे आकारत आहेत. त्याचबरोबर महिला, तरुणी रिक्षाम ध्ये बसताच मोठ्या आवाजात गाणी वाजवणे आदी प्रकार होत असल्याने प्रवाशांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.







### दिसला प्रवासी की थांबव रिक्षा...

प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणी असलेल्या १६ हजार ९७३ रिक्षा आहेत. परंतु, महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस रस्त्यावर धावत नसल्यामुळे शहरात सुमारे २७ ते २८ हजार रिक्षा धावत आहेत. यामध्ये मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे अशा मोठ्या शहरात स्क्रॅप केलेल्या रिक्षांचा भरणा आहे. या रिक्षा प्रवाशी दिसला कुठेही थांबतात. यामुळे त्रास होत आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी

शहराचा सर्वांत वर्दळीचा रस्ता म्हणून छत्रपती शिवाजी महाराज चौक ओळखला जातो. या ठिकाणी ग्रामीण तसेच शहरातील नागरिक खरेदी, प्रवास आदी कारणांसाठी येतात. या परिसरातील दुकानदारांनी आपली दुकाने रस्त्यावर मांडली आहेत. त्याचबरोबर मनमानी पद्धतीने रिक्षाचालक रिक्षा कुठेही थांबवीत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना आणि वाहनधारकांना वाहतूक कोंडीतून वाट काढावी लागते. त्याचबरोबर पालिका प्रशासन आणि पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले नसल्याने नागरिकांना रोजच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रिक्षाम ध्ये तीन प्रवाशांची वाहतूक करण्याचा नियम असताना एका रिक्षाम ध्ये पाच ते सहा प्रवासी कोंबलेले असतात. अनेक वेळा जादा भाडे आकारले जाते. तसेच रांगा न लावता मनमानी पद्धतीने रिक्षा लावल्याने इतर वाहतुकीला अडचण निर्माण केली जात आहे.

### कोपऱ्यांवर रिक्षा थांबविण्याची स्पर्धा...

शहरातील अनेक महत्वांच्या रस्त्यांवर असलेल्या वळणांवर रिक्षा थांबविण्याची जणूच स्पर्धाच सुरु असल्याचे दिसून येते. वळणाच्या रस्त्यांवर किंवा कोपऱ्यावर रिक्षा थांबवून प्रवासी घेतले जात असल्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनचालकांचा अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत व घडत आहेत. अशावेळी रिक्षाचालकांकडूनच दुसऱ्या वाहनचालकास दमदाटी करण्यात येते.

### २३९ रिक्षा थांबे, अजूनही ७५ थांब्यांची मागणी

शहरात रिक्षा वाढल्या तरी रिक्षा थांबे तेवढेच आहे. वाहतुकीला अडथळा व कोणताही अपघात होणार नाही, अशा चौकांमध्ये रस्त्यांलगत प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांचे थांबे असतात. सध्या आरटीओ कार्यालयाकडे नोंद असलेल्या १६ हजार ९७३ रिक्षांसाठी शहरात २३९ थांबे आहेत. वाहतुकीला अडथळा व कोणताही अपघात होणार नाही, अशा चौकांमध्ये रस्त्यांलगत प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांचे थांबे असतात. सात-आठ वर्षांपूर्वी शहरातील रिक्षांसाठी २२७ थांबे निश्चित करण्यात आले. मात्र, त्यानंतर रिक्षांची संख्या भरमसाट वाढली, पण थांब्यांमध्ये केवळ १२ ची वाढ झाली. रिक्षाचालकांमध्येच सध्या स्पर्धा सुरू असून अनेकजण थांब्यांवर थांबतच नाहीत. वाटेत प्रवासी दिसेल तेथे थांबून त्यांची वाहतूक करतात. त्यामुळे किरकोळ अपघात वाढले असून वाहतूक कोंडीसाठी देखील हा बेशिस्तपणा कारणीभूत ठरू लागला आहे.

**शहरातील रिक्षांची सद्य:स्थिती रेकॉर्डनुसार**

**एकूण रिक्षा**
१६ हजार ९७३

**रस्त्यांवर धावणाऱ्या अंदाजे रिक्षा**
२७ हजार ते २८ हजार

**एकूण प्रवासी थांबे**
२३९

**वाढीव थांब्यांची मागणी**
७५

# शाळांना सतावतेय बोगस पटसंख्येची भीती

- अपार कार्ड देण्यात येताहेत अडचणी
- 'यू डायस' प्रणालीत नाही ८,४०० विद्यार्थ्यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांची इत्यंभूत माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध व्हावी, आणि धोरण निश्चिती करता यावी, यासाठी केंद्र सरकारने 'यू डायस' वर माहितीचे संकलन व सर्व विद्यार्थ्यांना अपार आयडी देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अपार कार्ड नोंदणीसाठी विद्यार्थ्यांचे आधार यू डायस पोर्टलवर व्हॅलिड (वैध) असणे आवश्यक आहे. मात्र, अद्याप जिल्ह्यातील आठ हजार ४०० विद्यार्थ्यांची माहितीच त्यावर भरली गेली नाही. त्यामागे बोगस पटसंख्येचा संशय व्यक्त होत आहे.राज्यातील पहिली ते बारावीपर्यंतच्या विविध शाळांत बोगस पटसंख्या दाखवून शिक्षक भरती केली जाते. याला आळा घालण्यासाठी, सदरची संकल्पना निर्माण करण्यात आलेली आहे.

दरम्यान, केंद्र सरकारकडून 'यू डायस प्लस' प्रणालीमध्ये दोन टप्प्यात माहिती संकलित करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात शाळेचे ठिकाण, व्यवस्थापन, माध्यम व भौतिक सुविधांचा समावेश होता. ती माहिती शाळांनी भरली आहे. मात्र, दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती भरावयाची आहे. यात त्यांच्या नावासह जात, बीपीएल, दिव्यांग प्रकार, शाळाबाह्य माहिती, आरटीई आदी माहिती मागितली आहे. या माहितीवर विविध अहवालांसह शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठीच्या योजना ठरणार आहेत. तर सर्व विद्यार्थ्यांना अपार (ऑटोमेटेड पर्मनंट ॲकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री) आयडी देण्यात येत आहे. अपार कार्ड व आधार कार्ड लिंक असल्याने बोगस




विद्याथ्यर्थ्यांची संख्या उघड होणार आहे. कारण यू डायस प्लसमध्ये कोणत्याही शाळेला इयत्ता दुसरी ते बारावीपर्यंतच्या वर्गात नवीन नोंद करता येणार नाही. विद्यार्थ्यांना केवळ ऑनलाइन माहिती हस्तांतर करून दुसऱ्या शाळांमध्ये प्रवेश नोंदविता येईल. यू डायसवर विद्यार्थ्यांची माहिती भरून सप्टेंबर अखेर राज्यांनी अंतिम प्रमाणपत्रता पूर्ण करणे अपेक्षित होते. तर अपारसाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली होती. जिल्ह्यात इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या ४ हजार ७०५ शाळा आहेत. या शाळांनी यू डायसवर शाळेची माहिती भरली आहे. मात्र, अद्याप ८ हजार ४०० विद्यार्थ्यांची माहिती भरली नाही. तर जिल्ह्यात ८३ टक्के विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढले असले तरी अद्याप एक लाख ३४ हजार ५७६ विद्यार्थ्यांची आयडी काढणे बाकी आहे.

**जिल्ह्यातील अपार कार्डची स्थिती**

| | |
|---|---|
| एकूण शाळा | ४,७०५ |
| एकूण विद्यार्थी | ७,९४,६२२ |
| कार्ड तयार | ६,५०,०४६ |
| टक्केवारी | ८३.०६ |

अपार कार्ड नोंदणीसाठी विद्यार्थ्यांचे आधार यू डायस पोर्टलवर वैध असणे आवश्यक आहे. यू डायस प्रणालीवर आधार कार्ड वैध केल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आधार कार्ड दुरुस्त केले आहे. त्यामुळे आधार कार्डमध्ये तफावत येत आहे. तर अनेक विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नसल्यानेही अडचण निर्माण होत आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांनी यू डायसवर माहिती भरली आहे. २९ हजार ४९ शिक्षकांपैकी केवळ १८ शिक्षकांची माहिती भरणे प्रलंबित आहे. मात्र, ८ हजार ४०० विद्याध्यर्थ्यांची माहिती भरली गेली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने (दि.२८) जानेवारी रोजी शिबिराचे आयोजन केले होते.




### अपारचे ८३ टक्के काम पूर्ण

शाळांची माहिती भरण्यात सोलापूर जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. ड्रॉप बॉक्सम ध्येही जिल्ह्याने चांगले काम केले आहे. अपारचे ८३ टक्के काम पूर्ण झाले आहे. दोन्हींचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी शिबिर घेतले आहे. ते लवकरच पूर्ण केले जाईल.


**- कादर शेख,**
**प्राथमिक शिक्षणाधिकारी,**
**जि.प. सोलापूर**

### दारूच्या नशेत शिवीगाळ; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

दारूच्या नशेत गॅरेज चालकास शिवीगाळ करणाऱ्या तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रफिक चाँद पठाण (वय ४९, रा. शोभा देवी नगर, नई जिंदगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजय दत्ता देवकुळे (वय २२, रा. अंबिका नगर, बाळे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रफिक पठाण व अजय देवकुळे हे दोघे एकमेकांना ओळखतात. २ फेब्रुवारी रोजी रफिक पठाण हे त्यांच्या कामाच्या ठिकाणी काम करीत असताना अजय देवकुळे हा तिथे आले. त्याने पठाण यांना विनाकारण नशेत शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१९

**नातरी एकचि उदक सहजें । परि सिनानां घटीं भरिजे ।**
**तैसे भिन्नत्व हे जाणिजे । योगसंन्यासाचे ।।**

मागच्या कांही ओव्यात श्रीकृष्णांनी अर्जुनाला योगी आणि संन्यासी याची सविस्तर माहिती दिली. अर्जुनाला योगी आणि संन्यासी हे दोन वेगवेगळे वाटत असल्याचे भगवंताला जाणवले. अर्जुनाचा हा भ्रम काढण्यासाठी भगवंतांनी स्पष्ट केले की, योगी आणि संन्यासी हे वेगवेगळे नसून ते एकच आहेत. या दोघातील नाम भेदाचा भ्रम दुर केला तर, योग म्हणजेच संन्यास आणि योगी आणि कर्मसंन्यासी ज्ञानप्राप्तीनंतर ब्रम्ह होतात, त्यामुळे अखंड ब्रम्हस्वरुपात भेद उरत नाही. ज्याप्रमाणे एकाच व्यक्तिला आपण दोन वेगवेगळया नांवाने हाका मारतो. काका, दादा, मामा अशा नांवानी हाक मारली तरी मुळात तो व्यंक्ति एकच असतो. त्याप्रमाणे योगी आणि संन्यासी एकच असून त्यांची फक्त नांवे वेगवेगळी आहेत. याचे पुन्हा स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले,

**नातरी एकचि उदक सहजें । परि सिनानां घटीं भरिजे ।**
**तैसे भिन्नत्व हे जाणिजे । योगसंन्यासांचें ।।**

अर्थात, मुळात एकच असलेले पाणी, भिन्न, भिन्न पात्रात भरले, तरी ते एकच असते. त्याप्रमाणे योगी आणि संन्यासी यातील वेगळेपण हे केवळ दिखावू आहे. प्रत्यक्षात ते दोन्ही एकच आहेत. कर्मधर्म संयोगाने आपल्या वाटयाला जे कर्म आले, ते कर्म कोणत्याही प्रकारची फलासक्ती मनात न धरता व मी हे कर्म करीत आहे किंवा करणार आहे अशी भावना न ठेवता जो कर्म करतो, तोच कर्मयोगी आहे आणि तोच संन्यासी आहे.आपल्या वाटयाला आलेली जी स्वाभाविक, नैमित्तीक कर्मे आहेत, त्याला बंधनकारक मानून त्याचा त्याग करावा असे जो म्हणतो, तो पहिले कर्म टाकून दुसरे कर्म अंगाला लावून घेतो असा त्याचा



अर्थ आहे. आधीच गृहस्थाश्रमाचे सहजच ओझे डोक्यावर असतांना ते व्यवस्थित न वागवता, संन्यासाचे दुसरे वाढते ओझे डोक्यावर घेण्याची गरज नसते. म्हणून अग्नी सेवा न टाकता, कुळधर्म, उचित धर्ममर्यादा न ओलांडता, केलेले स्वधर्म आचरण, कर्तृत्वाभिमान, कर्मफल यांपासून अलिप्त झाल्यामुळे सहजासहजी आत्मसुख प्राप्त होते. योग आणि संन्यास हे एकच असल्याने त्याला वेगवेगळे समजून माणसाने अडचणीत सापडण्याचे कारण नाही. योगरुप पर्वताचे शिखर गाठायचे असेल, तर कर्ममार्गाच्या पाय-यांनी चढून जाण्यास माणसाने चुकु नये. हा मार्ग कठीण असला तरीही मनोनिग्रहाने, सरावाने तो पार करता येऊ शकतो. अर्जुन युध्द करण्याच्या मानसिकतेपासून विचलीत झाला आहे. त्याची मानसिकता स्थिर करण्याची अत्यंत गरज आहे. हे ध्यानात घेऊन भवगंत त्याला वेगवेगळे मार्ग सांगत आहेत. हे मार्ग दिसायला वेगळे असले तरीही शेवटी ते एकाच उदिदृष्टांच्या ठिकाणी पोहोचतात. या मार्गावरुन जाण्यासाठी मनाची स्थिरता किती आवश्यक आहे, याचेही स्पष्टीकरण भगवंत करीत आहेत. आपण दैनंदिन जीवनात अनेकदा छोटया-मोठया गोष्टीवरुन, घटनेवरुन अस्थिर होत असतो. ही अस्थिरता आपल्या चिंतेला, दु:खाला कारणीभुत होत असते. अस्थीर मनाला जो स्थिर करु शकतो तोच खरा ज्ञानी असतो. मनाला स्थिर करण्याची ज्याची मानसिक तयारी असते तो प्रयत्नाअंती मनाला स्थिर करु शकतो. ज्ञानदेवांच्या या ओव्याच्या आधारे आपण मनाची स्थिरता करण्याचा प्रयत्न करु या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, जागतिक सुर्यनमस्कार दिन, रथसप्तमी, नर्मदा जयंती |
| दि. ४ फेब्रुवारी २०२५ | |
| विक्रम संवत् २०८०-८१ | |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. सप्तमी (२६.३०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अश्विनी (२१.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुभ (२४.०५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१५.३२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ** : थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे. जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : रोजगारात प्रगती राहील. आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क** : व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल. केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

**सिंह** : व्यापार व्यवसाय चांगला चालेल. महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या** : कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ** : जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक** : आर्थिक योग मध्यम आहेत. आरोग्य चांगले राहील. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु** : बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. चैनी करण्याकडे मन झुकेल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# ‘त्या’ शिक्षकांचे समायोजन नाहीच

## प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या पत्राला केराची टोपली

### संस्थाध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापकांना देणार नोटिसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्याच्या खासगी शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून उर्वरित शिक्षकांची माहिती प्राथमिक शिक्षण विभागास कळवावी, असे पत्र शिक्षणधिकारी यांनी दिले होते. त्यापत्राकडे खासगी शाळांनी दुर्लक्ष केले असून, अद्यापही शिक्षकांच्या समायोजनाची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर केली नाही.

दरम्यान, शाळेतील अनुदानित अतिरिक्त शिक्षकांची संस्थेमध्ये समान वेतनश्रेणीत रिक्त जागेवर संबधित शिक्षकांचे समायोजन करून मान्यतेसाठी प्रस्ताव कार्यालयाकडे पाठवावे. संस्था अंतर्गत शिक्षकांचे समान वेतनावर समायोजन करून उर्वरित अतिरिक्त शिक्षकांची माहिती शिक्षण विभागाकडे पाठवा, अशा सूचना खासगी शाळेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापकांना दिल्या होत्या. मात्र, याकडे खासगी प्राथमिक शाळांनी दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्याने वेतनाचा प्रश्न निर्माण होणार आहे. शिक्षकांची जबाबदारी शाळेवर राहील, असे सूचना प्राथमिक शिक्षण विभागाने दिल्या. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून उर्वरित शिक्षकांची माहिती द्यावे लागणार आहे.

**शाळांचा मनमानी कारभार**

खासगी प्राथमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून शिक्षकांची माहिती २९ जानेवारीपर्यंत शिक्षण विभागास सादर करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी जिल्ह्यातील खासगी शाळांना दिल्या होत्या. दिलेली तारीख संपून गेली असून, अद्यापही शाळांकडून प्राथमिक शिक्षण विभागाकडे माहिती देण्यात आली नाही.

**शाळेकडून अद्यापही माहिती आलेली नाही**

सोलापूर जिल्ह्यातील खासगी प्राथमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून त्याची माहिती पाठविण्याचे आदेश दिले. शाळेकडून अद्यापही माहिती आलेली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा त्यांना शिक्षकांचे समायोजन करण्याचे आदेश देण्यात येतील.

**- कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिक**

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (४१) गोरक्षण

घटना आहे पुसदची. जंगल सत्याग्रहाच्या आदल्या दिवशीची. म्हणजे २० जुलै १९३० ची. वाटेत एका गोठाणावर एक तरणीताठी गाय हातात धरून दोन खाटीक उभे होते. डॉक्टरांनी विचारले गाय कोठे चालविली ? खाटीक म्हणाले आम्ही थोड्याच वेळात तिची कुर्बानी करणार आहोत. भर हिंदू वस्तीच्या गावात गाईची अशी राजरोस हत्या ही कल्पनाच डॉक्टरांना असह्य करत होती. डॉक्टरांनी किंमत विचारली. त्यावर खाटीक म्हणाला आम्ही वर्षानुवर्षे येथे गाई मारत असतो व मांसाचे रतीब पुरवतो. २५ ते ३० रुपये कमाई होते. डॉक्टर ३० रुपये द्यायला तयार झालेत. पण तो खाटीक अजूनच उग्र स्वरात मी तुमच्या देखतच गाय मारतो असा ताठा मिरवू लागला. दोघात खडाजंगी झाली. तो खाटीक गाय व तू दोघांनाही मारतो असे म्हणू लागला. तो तंटा पाहण्यास खूप गर्दी जमली. आणि आरक्षक अधिकाऱ्यांनी दोघांनाही पकडून ठेवतो अशी धमकी वजा शिक्षा सुनावली. तो खाटीक वरमला व तीस रुपयात गाय विकून त्यांनी तिथून काढता पाय घेतला. डॉक्टरांनी गाय तेथील गोरक्षण संस्थेला दिली. या प्रसंगानंतर कानडे शास्त्रींनी एक सभा घेतली व डॉक्टरांच्या देशभक्तीची मुक्तकंठाने स्तुती करून एक क्रांतिकारक म्हणून उल्लेख केला. डॉक्टरांनी सर्वांना समर्थ बना असा संदेश दिला.

- **क्रमशः**



# कुमठे महाविद्यालयात योग शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

आर्ट ऑफ लिव्हिगचे संस्थापक गुरुदेव प.पू.श्री श्री रविशंकर यांच्या वतीने कुमठे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तीन दिवसाचे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कुमठे कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे विश्वस्त श्री जयकुमार माने व स्वाती माने यांच्या संकल्पनेतून शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. योग प्रशिक्षक देव गोसकी व गोरख डांगे यांनी या शिबिराचे मार्गदर्शन केले. या शिबिरात त्यांनी विविध प्रकारची प्राणायाम व योगासने यांचा मानवी शरीरासाठी होणारा फायदा यांचे महत्त्व सांगितले तसेच विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे योग व प्राणायाम करून घेतले. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रा.संजय जाधव, प्रा.दादाराव डांगे, प्रा. हनुमंत शिंदे, प्रा. दीपक शिंदे, प्रा. विजयकुमार वाळके, प्रा. विनोद थोरात, प्रा. राजीव निकम व प्रा. बंडोपंत बाबर यांनी परिश्रम घेतले.

# शासकीय रेखाकला परीक्षेत चंडक प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य कला संचलनालयातर्फ मार्फत घेण्यात आलेल्या शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेमध्ये ज.रा. चंडक प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला असून प्रशालेने घवघवीत यश संपादन केले. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत ४२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सायली गुरव, अंजली ढेकणे, सुरभी पैकेकरी, दिव्या गावडे आदींनी अ श्रेणी मिळवून यश संपादन केले तर साक्षी भवर, ऋतुजा मोरे रुद्र करंडे, साक्षी पवार ऋषभ शेंडगे रसिका उपाध्ये, राजनंदिनी तीर्थकर, प्रणाली भोसले ,श्रेया निर्मळ आदींनी बी श्रेणी मिळवली तर सावली इरकल, श्लोक राजुरे, श्रावणी सुपेकर, नरेंद्र माने, स्नेहल घोडके, सृष्टी कवाडे, सृष्टी सुरवसे, वैष्णवी रजपूत,



वेदांत माने, वैष्णवी गाडे, वेदांत पडसलगी, योगिता भोसले, पुनम मुळूक, मयुरी भोसले, मंजुळा भवर, मनस्वी भवर, कुणाल तांदळे, गायत्री मेडीगर ,अक्षरा सुरवसे, अजय कुंभार, आरती राठोड, आकाश मोरकाने आदींनी विशेष श्रेणी मिळवली तर इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत ३६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये रेणू गुरव, जानहवी शिरसागर, श्रावणी गाडेकर, हर्षा चव्हाण ,वैष्णवी फराटे वैष्णवी कदम ,अनुराधा करंडे, मल्हारी लोहार, अल्ताफ शेख, राजकुमार पाटील, प्रतीक करपे, ओंकार साखरे आदींनी विशेष श्रेणी मिळवत यश संपादन केले. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक मुकुंद मोरे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेच्या मार्गदर्शिका श्रीमती निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ, मुख्याध्यापक मोहनराव घोडके, पर्यवेक्षक सतीश सुभेदार आदींनी अभिनंदन केले.

# उद्यापासून ४५ दिवस अखंड आंदोलन अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या वतीने ४५ दिवस अखंड आंदोलन अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक विष्णू कारमपुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. बुधवार दि. ५ ते २० फ ेब्रुवारी पर्यंत सोलापुरातील विविध समस्यांचे सर्व विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. दि. २१ फेब्रुवारी ते २० मार्च २०२५ पर्यंत सोलापूर शहरातील १७७ झोपडपट्ट्यांमध्ये संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस जे.एम. शिकलकर, विठ्ठल कुऱ्हाडकर, विश्वनाथ राठोड, रेखा आडकी, राधिका मिठ्ठा आदी उपस्थित होते.

# निवासी अंधकार्यशाळेचे संगदरी येथे वनभोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळा, कर्णिक नगर या विभागाची कारभारी चिकू फार्म संगदरी येथे क्षेत्रभेट व वनभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना चिकू बाग, लिंबू बाग, विविध फळझाडे व वनस्पतीची ओळख व माहिती देण्यात आली. तसेच हुरडा, स्वीट कॉर्न, चिकू, फरसाण व वनभोजनचा आस्वाद विद्यार्थ्यांनी आनंदाने घेतले. यावेळी कारभारी चिकू फार्मचे मालक राजीव गांधी मेमोरियल ब्लाइंड स्कूलचे सहशिक्षक भैरप्पा कारभारी यांनी हुरडा पार्टीचे आयोजन केले होते.



यावेळी कार्यशाळेच्या अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी यांनी एकदिवसीय सहलीचे नियोजन केले. याला रियाज मुल्ला, आकांक्षा भंडारे यांचीही उपस्थिती होती. यासाठी संजय कलाल, श्रीनिवास समदुर्ले, शुभम वांझरे, भागीरथी नाईकवाडे, अर्चना अंजनाळकर व इरम्मा माडेकर यांचे सहकार्य लाभले.

# प्रभागातील विविध विकासकामांना चालना दिली : जाधव

## प्रभाग २२ येथे रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच प्रभाग क्रमांक २२ मधील विविध विकास कामांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून सर्वाधिक निधी मंजूर करून घेऊन प्रभागातील नागरिकांना पायाभूत व अत्यावश्यक ठरणाऱ्या विकास कामांना प्राधान्याने प्रत्यक्षात गती देत मार्गी लावण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी प्रभाग क्रमांक २२ येथील राजीव नगर ते आम्रपाली चौक रस्ता डांबरीकरण शुभारंभ प्रसंगी म्हणाले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, चंद्रकांत चलवादी, सुरेश भंडारे, मोतीलाल करबसू जाधव, पाटील वकील, रमेशचलवादी ,दिनेश चलवादी, बुवा लाकूड अड्डेवाले,भुजंग लामतुरे, यल्लाप्पा लामतुरे,लक्ष्मण कट्टी, शिवाय कलीम, शेख बबलू जगले, सय्यद तायप्पा बेरे, बजरंग भंडारे,जगन्नाथ सुरवसे, अनुसया शिंदे, पर्वती चोपडे, वनिता कोकरे, यशोदा पिसे, तानोबाई टकले, उषा कांबळे, राजश्री बोराटे, रहीबाई मस्के, मंगला कोरे, सोनाली हेमगड्डी, भानुबाई पवार, नागुबाई लामतुरे आदींच्या उपस्थितीत या रस्ता डांबरीकरण कामाचे शुभारंभ विधिवत पूजनाने करण्यात आले.

# अल्पवयीन मुलीच्या आत्महत्या प्रकरणी तरूणाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

अल्पवयीन मुलीच्या आत्महत्येप्रकरणी तरूणाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयत पिडीत मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन वेणुगोपाळ श्रीकांत विटकर (रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील पिडीता मयत मुलगी ही अल्पवयीन असून गेल्या सहा महिन्यापासून वेणुगोपाळ विटकर याने तिचा पाठलाग करून तिला बोलण्याचा वारंवार प्रयत्न करून तिला त्रास देत होता. त्यामुळे पिडीतेने हा सर्व प्रकार घरातील लोकांना सांगितल्यानंतर त्यांनी विटकर यास समजावून सांगितले होते. त्यानंतर विटकर याने पिडीतेचा पाठलाग करणे बंद केले नव्हते. तो पाठलाग करून पिडीतेला त्रास देतच होता. त्रासाला कंटाळून पिडीतने आत्महत्या केली. त्यामुळे पिडीतेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

# गाव कारभारीच वाऱ्यावर; सरपंच, उपसरपंचांनाच मानधन मिळेना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

ग्रामपंचायतीची धुरा सांभाळणाऱ्या सरपंच, उपसरपंचांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय राज्य शासनाने नोव्हेंबर २०२४ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला. तथापी वाढीव मानधन तर दूरच गेल्या तीन-चार महिन्यांपासून जितके आहे. तेवढेही मानधन मिळाले नसल्याने गावकारभाऱ्यांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीचा प्रमुख सरपंच असतो. गावातील ग्रामपंचायतीचा सर्व कारभार सरपंचाच्या हाती असतात. सरपंचाला ग्रामपंचायतीची कामे व जबाबदाऱ्या पार पडण्यासाठी ग्रामसेवक मदत करतात. सरकारी योजना गावात राबवणे, गावातल्या छोठ्या मोठ्या प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, यासारख्या महत्त्वाची कामे तो करत असतो. सरपंचपद मिळावे यासाठी गावात मोठी चुरसही असते. विधानसभा किंवा लोकसभेपेक्षा चुरशीच्या लढती या सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य होण्यासासाठी होत असतात. गावाच्या विकासासाठी सरपंचाची भूमिका महत्वाची असते. कोणतेही धोरणात्मक निर्णय घेण्याची तरतूद सरपंच पदावर विराजमान असणाऱ्या व्यक्तीकडे असते. जर मानधन वेळेवर मिळत नसेल तर गावाच्या विकासासाठी आवश्यक तेवढे प्रयत्न होत नाहीत.

**ग्रामविकासमंत्र्यांना दिले निवेदन**

शासनाने सरपंच, उपसरपंचाच्या मानधनात वाढ केली. सरपंचाप्रमाणे गावाच्या विकासात महत्याती भूमिका बजावणारे ग्रामपंचायत सदस्यांच्या मानधनात दुपटीने वाढ करावी, अशी मागणी सरपंच संघटनेच्या महिला जिल्हास्यक्षा कविता घोडके-पाटील यांनी निवेदनाद्वारे ग्रामविकास मंत्र्यांकडे केली आहे.

सरपंचाचे मानधन वेळेवर मिळत नाही. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबरचे मानधन अजूनही प्राप्त झाले नाही. सरपंच, उपसरपंचाचे मानधन वेळेवर मिळावे, सरपंचांना एसटीचा मोफत पास द्यावा, महिला सरपंच, उपसरपंच व पदाधिकारी यांच्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समितीत स्वतंत्र कक्ष स्थापन करावे या मागणीसाठी आम्ही लढतो आहोत. शासनाकडून लवकर मानधन मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**- यशपाल वाडकर, सरपंच कासेगाव दक्षिण सोलापूर**

**सरपंचाचे मानधन ऑनलाईन जमा करावे**

मागील तीन ते चार महिन्यांपासून मानधन मिळाले नाही. त्यामुळे गावच्या कारभाऱ्यांचाव गाडा डगमगला जात आहे. जुनेच मिळाले नाही अन् दुपटीची घोषणा केल्याने लोकप्रतिनिधी संतप्त झाले आहेत. निवडणूक वर्षाचा परिणाम अन् नव्या सरकारची घडी अजून व्यवस्थित न बसल्याने सरपंच, उपसरपंचाचे वाढीव मानधन वेळेवर मिळत नसल्याचे सांगण्यात आले. निवडणुकीपूर्वी सरपंच, उपसरपंचाच्या मानधनात दुप्पट वाढ केल्यामुळे त्यांच्या कामाचा उत्साह वाढला. मात्र, मानधनासाठी प्रतीक्षा करावी लागते. याशिवाय सदस्यांच्या मानधनात देखील दुप्पट वाढ करून त्यांचेही मानधन ऑनलाइन जमा करावे.

**- कविता घोडके-पाटील, महिला अध्यक्षा, सरपंच परिषद, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### सामान्य कुटुंबातील सायल शेख सीए परीक्षेत उत्तीर्ण



**नातेपुते, दि. ३ फेब्रुवारी-**

सायल रहेमान शेख या युवतीने कठोर परिश्रम घेऊन सीएची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. सर्वसामान्य कुटुंबातील सायल रहेमान शेख हिचे वडील किराणा दुकान व थोडी शेती करुन आपला उदरनिर्वाह चालवत आहेत तर आई गृहिणी आहे. तिचे शालेय शिक्षण ज्ञानदीप बालक मंदिर, एस. एस. एम. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय माळेगांव येथे झाले. बारावी ह्युम मेकहेनरी स्कूल व क्लाईन मेमरी स्कूल बिबवेवाडी तर एस. पी. कॉलेज पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. यानंतर मनाशी खूणगाठ बांधून सीएची तयारी केली. ही परीक्षा देण्यापूर्वी सीपीटी व आयपीसीसी या परीक्षा दिल्या. यानंतर अशी सीए परिक्षा पास झाले. सदर यशासाठी आई शरीफा शेख, वडील रहमान शेख, विक्रमसिंहराजे जाधवराव, योगेंद्रसिंह, विरेंद्र सिंह, अ‍ॅड. सोनाक्षी, डॉ. नेहा जाधवराव यांचे तिला मार्गदर्शन लाभले.



### मोहोळ येथील शिबिरात ३७ जणांचे रक्तदान

**मोहोळ, दि. ३ फेब्रुवारी-**

टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथे आयोजित शिबिरात ३७ जणांनी रक्तदान केले. दि.२ फेबुवारी रोजी डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोलापुर आणि जय जवान पेट्रोलीयम टाकळी सिकंदर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. माजी सैनिक कै. गुंडिबा सोपान चव्हाण आणि त्यांचे पुत्र कै. आबासाहेब चव्हाण यांचे स्मरणार्थ आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जयंती वसंत पंचमी यांचे औचीत्य साधून या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन माजी सैनिक विश्वनाथ आनुसे यांचे हस्ते करण्यात आले. या शिबिरास जिल्हा लेबर फेडरेशनचे नूतन संचालक शिवाजी चव्हाण, भीमाचे माजी संचालक ज्ञानेश्वर चव्हाण, रमेश फाटे यांसह अनेकांनी भेट दिली.



### विद्याविकास संस्थेच्या वतीने हळदी-कुंकू कार्यक्रम

**अणदूर, दि. ३ फेब्रुवारी-**

अणदूर परिसरामध्ये शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विद्या विकास शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने महिला पालक मेळावा व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका दिपाली निसरगुंडे तर प्रमुख अतिथी म्हणून भगीरथ कुलकर्णी, डॉ. राजश्री मुंडे, डॉ. हमीनाथ शेख, डॉ. मोसमी मुळे उपस्थित होते. यावेळी अनन्या कबाडे हिने सादर केलेल्या 'आई मला माफ कर तुझा मोबाईल जरा ऑफ कर' या गाण्याने सर्वांचे लक्ष वेधले. पालकांमधून खंडेराव शिंदे, अनुसया कुताडे, माधुरी घोडके, सारिका येडगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक बसवेश्वर निसरगुंडे यांनी केले तर आभार कदरगे यांनी मानले. सूत्रसंचालन श्रद्धा नरवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी कदम, पूजा मोकाशी, सानिका मुळे, भाग्यश्री बिराजदार, किरण निसरगुंडे यांनी परिश्रम घेतले.



### करकंब गावच्या लेकीचे झाड अभियान टीमकडून स्वागत

**करकंब, दि.३ फेब्रुवारी-**

सार्वजनिक संघटना टीम कर्जत, सायकलवरून प्रतिवर्षाप्रमाणे विठूरायाचे दर्शन आणि पर्यावरण रक्षणासाठी प्रचार आणि प्रसारासाठी करकंब येथे आली असता त्यांचा दुपारचा विसावा व करकंब येथील सुप्रसिद्ध, चवदार बाजार आमटीच्या जेवणाची व्यवस्था निळकंठ ढोबळे व परिवाराच्यावतीने करण्यात आली होती. या विश्रांती व भोजन व्यवस्थेसाठी करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमने परिश्रम घेतले. यावेळी स्वागत सार्वजनिक संघटना टीमचा तसेच पर्यावरणप्रेमी संभाजी नांगरे-पाटील यांचा प्रातिनिधिक स्वरूपात हरिशचंद्र वास्ते यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.



### प्रमोद पाटील यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.३ फेब्रुवारी-**

अक्कलकोट शहर लगत गेल्या अठरा वर्षांपासून हजारो जनतेला मोफत गरमागरम हुरडा सेवा देणारे शामराव पाटील दुकानाचे मालक प्रमोद पाटील यांचा सोलापूर शिक्षक संघाच्या वतीने आळंदचे आ. बी. आर. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवड, रेवणसिद्द हत्तुरे, बसवराज खिलारी, जिल्हा उपाध्यक्ष बाळकृष्ण मैत्रे, माजी चेअरमन कशिनाथ विजापुरे, अप्पशा उमराणी, मल्लिनाथ पुजारी, नरोणे, बिराजदार आदी उपस्थित होते.

# करकंब-उंबरे रस्त्यावरील पुलाचे काम अर्धवट

### प्रवाशांच्या जीवाला धोका

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.३ फेब्रुवारी-**

करकंब ते उंबरे (पागे) या रस्त्यावरती जळोली गावापासून दोन किलोमीटर अंतरावरती असणाऱ्या ओढ्यावरील पुलाचे काम अर्धवट अवस्थेत असतानाच त्या फुलावरून वाहतूक सुरू करण्यात आल्याने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. श्रीपूर येथील साखर कारखान्याकडे जाणारा शेतकरी वर्ग,अकलूज परिसरात जाणारा व्यापारीवर्ग,शिखर शिंगणापूर व पंढरपूर या तीर्थक्षेत्रांना जाणारे भावीक तसेच या भागातील नागरीक,व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, नौकरदारवर्ग याच रस्त्याने जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक सुरू असते. या रस्त्यावरूनच पांडुरंग सहकारी साखर कारखाना श्रीपूर, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना युनिट नंबर २करकंब, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे या कारखान्यांना ऊस घेऊन जाणारी वाहने याच मार्गावरून ये,जा करत असतात.या पुलाच्या दोन्ही बाजूस तीव्र चढ,उतार असल्याने ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना तर जीव धोक्यात घालूनच या पुलावरून प्रवास करावा लागत आहे.



या पुलाच्या दोन्ही बाजूस तीव्र चढ, उतार असल्याने तसेच या पुलाच्या दोन्ही बाजूच्या कच्च्या रस्त्यावर ठीक ठिकाणी २ते२.५ फुट रुंदीचे व १ते १.५ फूट खोलीचे खड्डे पडले आहेत. वाहनधारकांना या खड्ड्यातूनच वाट काढत प्रवास करावा लागत आहे.

दोन्ही बाजूस चढ असल्याने काही वेळेस ही ऊस वाहतूक करणारी वाहने चढावरच उभी करावी लागत आहेत त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनधारकांना जीव मुठीत धरूनच सदरच्या वाहनास ओलांडून पुढे जावे लागत आहे.गेल्या वर्षभरापासून संबंधित पुलाची अवस्था अशीच आहे.

या पुलावरून प्रवास करणारी हलकी चार चाकी वाहने या खड्ड्यांमुळे खालच्या बाजूस घासल्याने या वाहनांचे नुकसान होत आहे. या पुलावरील अपूर्ण रस्त्यामुळे एखादा अपघात होऊन कोणी जखमी किंवा मृत होण्याअगोदरच या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी. संबंधित ठेकेदार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या पुलावरील रस्त्याचे अर्धवट राहिलेले काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

#### सिमेंटचाच रस्ता करण्यात यावा

पुलाच्या दोन्ही बाजूस तीव्र चढ, उतार असल्याने व या भागातील साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणाऱ्या वाहनांची वर्दळ असल्याकारणाने या ठिकाणी डांबरी रस्ता न करता दीर्घकाळ टिकणारा सिमेंटचाच रस्ता करण्यात यावा.जर या रस्त्यावरती डांबरीकरण केले तर कालांतराने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वर्दळीमुळे सदर रस्ता काही दिवसांनी खराबच होणार आहे. त्यामुळे शासनाचे पर्यायाने नागरिकांचेच लाखो रुपये वाया जाणार आहेत.

## ब्राह्मण महासंघाच्या वतीने बार्शीतील पत्रकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**




ब्राह्मण महासंघाच्यावतीने लोकशाहीचा चौथा स्तंभ मजबूत करण्याचे त्याचबरोबर समाजाच्या समस्या निर्भीडपणे मांडणाऱ्या बार्शीतील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

ब्राह्मण महासंघ शाखा बार्शीच्यावतीने महिन्यातील शेवटच्या रविवारी जानेवारी महिन्यातील ब्रह्मवृंदाचे वाढदिवस व समाजातील जेष्ठ व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बार्शी शहरातील नामवंत २४ पत्रकारांचाही सन्मान करण्यात आला. यात शहाजी फुरडे, चंद्रकांत करडे, प्रशांत काळे, गणेश गोडसे, अरुण बळप, गिरीश कुलकर्णी, एन.आर. कुलकर्णी, सचिन अपसिंगकर, नंदकुमार माढेकर, नाना गव्हाणे, संदीप आलाट, उमेश पवार, सचिन वायकुळे, संजय बारबोले, धैर्यशील पाटील, गणेश भोळे, संतोष सूर्यवंशी, प्रशांत गायकवाड, निलेश झिंगाडे, राजश्री गवळी, मयुर थोरात, विजय शिंगाडे, किरण नान्नजकर, नीता देव, सुवर्णा शिवपुरे या प्रिंट आणि डिजीटल मिडीयातील पत्रकारांचा समावेश होता. यावेळी प्रभाकर उर्फ बंडू जोशी, रंजन अग्निहोत्री, सदानंद करंदीकर, सुरेश देशपांडे या समाजातील जेष्ठ व्यक्तीचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी राजेंद्र खंडेलवाल हे होते.

प्रारंभी समाजातील विजयकुमार जोशी, अरुण बडवे यांच्या मातोश्री शकुंतला बडवे तसेच इंदिरा देशमुख यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते भगवान परशुराम व बार्शीचे आराध्य दैवत श्री भगवंत यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र खंडेलवाल व कार्यक्रमाचे प्रायोजक महेश कुलकर्णी, भर्तरी कुलकर्णी, पांडुरंग कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ होमी भाभा परीक्षेत राज्यात स्थान मिळविलेल्या सानवी देशपांडे हिचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण शिरशीकर यांनी केले व ब्राह्मण महासंघाची नूतन महिला व पुरुष कार्यकारिणी घोषित केली. यात दिनकर सापनाईकर व स्वप्ना केसकर यांची नूतन अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यानंतर एक शाम सुरोंके साथ या हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम गुरुदत्त कुलकर्णी व मीरा देशपांडे यांनी सादर केला. निवेदन शीतल कुलकर्णी यांनी केले. समाजातील जानेवारी महिन्यातील ६५ व्यक्तींचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी महिलांचा संक्रांतीचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला. आभार अध्यक्ष दिनकर सापनाईकर यांनी मानले. सूत्रसंचालन अनिल काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यंकटेश कुलकर्णी, सुधीर टंकसाळे यांनी परिश्रम घेतले.




## दहावीचं वर्ष हे आयुष्यातील टर्निंग पॉईंट : विश्वेश झपके

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ फेब्रुवारी-**

इयत्ता दहावी हा सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनातील टर्निंग पॉईंट असून इथूनच आपल्या जीवनाला कलाटणी मिळते. करिअर रुपी पुढील मार्ग इयत्ता दहावीनंतर विविध क्षेत्राद्वारे आपणास खुणावत असतात. विद्यार्थ्यांनी कसोशीने प्रयत्न करावेत व विद्यामंदिरची गौरवशाली परंपरा कायम राखावी, असे आवाहन उद्योगपती विश्वेश झपके यांनी सांगोला विद्यामंदिरमध्ये आयोजित एसएससी बोर्ड परीक्षासाठी प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा समारंभामध्ये उपस्थित विद्यार्थ्यांना केले. यावेळी व्यासपीठावर संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. यावेळी तनुजा चोपडे, समृद्धी भोसले, अविनाश सरगर, आकांक्षा फुले, दिव्याराणी देवडकर या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून आजपर्यंत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये विद्यामंदिरचा सिंहाचा वाटा असून या शाळेचे व शाळेतील शिक्षकांचे ऋण आयुष्यभर न विसरण्याजोगे असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन उन्मेश आटपाडीकर, आभार शैलजा झपके यांनी मानले.



## श्री भगवंत मल्टिस्टेटला बँकोचा प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**

येथील श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि. बार्शी यांना 'बॅको अवार्ड २०२४' या प्रथम क्रमांक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अविज पब्लिकेशन कोल्हापूर व गॅलक्सी इनमा पुणे ही संस्था देशभरात को-ऑपरेटीव्ह मल्टीस्टेटचा आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन अवलोकन करत असते. ज्या मल्टीस्टेट उत्तम आर्थिक परिस्थिती ठेवून भक्कमपणे उभ्या राहून कार्यरत आहेत. अशा संस्थेच्या बँको ब्ल्यू रिबन ही संस्था सन्मान करत असते. त्याप्रमाणे श्री भगवंत मल्टीस्टेटला लोणावळा येथे ॲम्बी व्हॅली येथे घेतलेल्या समारंभात माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते 'बॅको अवार्ड २०२४' प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मल्टिस्टेटचे चेअरमन संतोष रावसाहेब ठोंबरे, सीईओ मिलिंद सिद्राम कांबळे, शाखाधिकारी नवनाथ गुणवंतराव भोसले व अक्षय पांडुरंग नलगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मल्टिस्टेटचे सभासद, ग्राहक, अधिकारी, कर्मचारी व संचालक मंडळामुळे हा पुरस्कार मिळाला आहे. मार्च २०२४ अखेर आर्थिक स्थितीवर आधारित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेच्या ठेवी जवळपास ८० कोटींच्या पुढे आहेत. आर्थिक उलाढाल, कामाची पद्धत आणि ग्राहकांना दिली जाणारी सेवा या गोष्टींचा विचार करुन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, सभासदांनी चेअरमन संतोष ठोंबरे, सीईओ मिलिंद कांबळे यांच्यासह संचालकांचे कौतुक केले आहे.

## पसारे यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय : पन्नालाल सुराणा

**अक्कलकोट, दि.३ फेब्रुवारी-**

जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे, या भावनेतून दरवर्षी आपला वाढदिवस समाजातील अनाथ, पिडीत, वंचित मुलांना त्यांची शैक्षणिक गरज पाहून शैक्षणिक साहित्य, गणवेश भेट देऊन अनोख्या पद्धतीने वाढदिवस गेली अनेक वर्षी पसारे करत आहेत. त्यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पन्नालाल सुराणा यांनी व्यक्त सांगितले. अक्कलकोट येथील एम. बी. पसारे क्लासेसच्या संचालिका एम. बी. पसारे यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त नळदुर्ग येथील बालगृहातील १०४ विद्यार्थ्यांना ट्रॅक सूट व टी शर्ट भेट देण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पन्नालाल सुराणा यांच्या हस्ते पसारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी धर्मण्णा तुप्पद, जगदेवी तुप्पद, सावित्री पसारे, जनकल्याण बचत गटाचे सदस्य सुभाष पुजारी, शांतप्पा कलबुर्गी, संतोष वगाले, नितीन उपरे, सायबण्णा सोनकांबळे, महादेव बिराजदार, सिद्धारम धुत्तरगी, समर्थ वगाले, आपलं घरं बालगृहाचे अधीक्षक संदीप चवले उपस्थित होते.




## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३ फेब्रुवारी-**

राज्याचे ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांच्यासोबत माढ्यातील महात्मा फुले प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विविध प्रश्नासंदर्भात चर्चा केली. यावर पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व प्रश्नाची सोडवणूक करण्याचे आश्वासन देत माढ्याला येण्याचा शब्द दिला.

यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा माढ्याचे नगरसेवक आजिनाथ अप्पा माळी यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळाने पालकमंत्री यांच्या बोराटवाडी तालुका माण येथील घरी जाऊन त्यांचा सत्कार केला. माढा सह तालुक्यातील अनेक प्रश्नासाठी लक्ष घालण्याची विनंती केली. यावेळी मी स्वतः माढा येथे येतो. आपल्या सर्व प्रश्नाची सोडवणूक करतो असे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. हनुमान क्षीरसागर, सचिव लक्ष्मण राऊत, धोंडीराम राऊत, माजी उपसभापती उल्हास राऊत, ज्येष्ठ मार्गदर्शक परमेश्वर आबा पुजारी महादेव बापू राऊत हनुमंत भोसले अक्षय पिसे आदी उपस्थित होते.



# माढा रोटरी क्लबच्या राष्ट्र शिल्पकार, व्यवसाय सेवा पुरस्कारांचे १० फेब्रुवारीला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३ जानेवारी-**

रोटरी क्लब माढ्याच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्र शिल्पकार व व्यवसाय सेवा २०२५ या पुरस्कारांची वितरण सोमवार १० जानेवारी सायंकाळी ६ वाजता जगदाळे मंगल कार्यालय येथे होणार असल्याचे माढा रोटरीचे अध्यक्ष डॉ. सोमेश्वर ढवळे व डिस्टिक डायरेक्टर डॉ. सुभाष पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

अध्यक्षस्थानी माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा मीनलताई साठे राहणार आहेत. यावेळी आ. अभिजीत पाटील, रणजितसिंह शिंदे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांची प्रमुख उपस्थितीत असणार आहे. तसेच शहरातील प्रमुख मान्यवर व्यक्ती देखील या कार्यक्रमाला उपस्थित असणार असून या सर्व मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस डिस्टिक डायरेक्टर डॉक्टर सुभाष पाटील, रोटरीचे अध्यक्ष डॉ. सोमेश्वर टोंगळे, सचिव सुनिल रावडे, प्रोजेक्ट डायरेक्टर प्रविण भांगे, सचिन घाडगे, नागनाथ घाडगे, प्रमोद वेदपाठक, दिनेश जगदाळे, बंडू पवार हे उपस्थित होते. यावेळी सर्व पत्रकार बंधूंचा सन्मान करण्यात आला. याबरोबरच माढा शहरातील अंकिता आनंद भांगे व दीप्ती विकास कदम या दोन विद्यार्थिनींचा सनदी लेखापाल झाल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब माढ्याचे सचिव सुनिल रावडे केले आहे.

#### राष्ट्र शिल्पकार पुरस्काराचे मानकरी

नीता नंदकिशोर गिरी (जि. प. प्रा. शाळा माढा मुली), संतोष कुमार भगवान राऊत (जि. प. प्रा. शाळा, पाटील वस्ती, जामगाव), स्मिता चंद्रकांत नाझरे (जि. प. प्रा. शाळा, मानेगाव), प्रवीण मधुकर कदम (जि. प. प्रा. शाळा भंडारखिळा, अंजनगाव खे), अविनाश मधुकर मिरगणे (जि. प. प्रा. शाळा कदम वस्ती, घाटणे), सारिका उमेश जामदार (जि. प. प्रा. शाळा उपळाई खु), अण्णाराव नागनाथ खंडागळे (लिटिल मास्टर इंग्लिश स्कूल शेटफळ)

#### व्यवसाय सेवा पुरस्कार

बी. के. दुर्गादेवी माढा,(अध्यात्मिक क्षेत्र), महारुद्र चव्हाण, केवड (शैक्षणिक क्षेत्र), सचिन कवले, वडाचीवडी (सामजिक क्षेत्र), सृष्टी विनोद काळे माढा, (क्रीडा क्षेत्र), डॉ. संतोष गुजरे, अनगर (वैद्यकीय क्षेत्र), सुधीर दयानंद लोंढे चिंचोली, (कृषी क्षेत्र) शंभूराजे शहाजी कदम माढा (उद्योग क्षेत्र), हिम्मत अरुण जाधव माढा (पत्रकारीता), प्रा. मनमोहनदास खुडे माढा (सांस्कृतिक क्षेत्र), सचिन पवार (कला क्षेत्र).

## राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात तनवीर तांबोळीचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

२८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ वार या कालावधीमध्ये ५२ वे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन डॉ. पंजाब देशमुख विज्ञान नगरी, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती या ठिकाणी पार पडले. या प्रदर्शनामध्ये राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी प्रयोगाचे सादरीकरण केले. यामध्ये महाराष्ट्र विद्यालयातील माध्यमिक



गटातून चौथा क्रमांक मिळवत तनवीर जमील तांबोळी याने यश संपादन केले. या विद्यार्थ्याला संग्राम देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मीराताई यादव, एस. बी. शेळवणे, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, विज्ञान प्रमुख एस. एम. हाजगुडे यांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त...



### पालकमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन

**मोहोळ, दि. ३ फेब्रुवारी-**

मोहोळ येथील एसटी स्टँडचे विस्तारीकरण करावे, ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयाचे काम तातडीने सुरू करावे, क्रीडा संकुलाच्या कामाला गती द्यावी,शहरातील पंढरपूर पालखी महामार्गासाठी संपादित झालेल्या जमिनीच्या मोबदला संबंधितांना तातडीने मिळावा,आणि सन २००४ पूर्वीच्या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची एक बैठक पालकमंत्र्यांनी घेऊन त्यांच्याशी संबंधित समस्या सोडवाव्यात अशा मागणीचे निवेदन सोलापूर जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे यांना दिले.यावेळी भाजपाचे मोहोळ तालुका सरचिटणीस आणि मोहोळ तालुका पत्रकार संघाचे नूतन अध्यक्ष महेश सोवनी आणि ब्रम्हदेव उर्फ फंटू गोफणे, भारतीय मजदूर संघाचे तालुकाध्यक्ष मच्छिंद्र गाडे -पाटील, प्रज्ञावंत आघाडीचे माजी जिल्हा सहसंयोजक आणि मोहोळचे माजी शहराध्यक्ष अविनाश पांढरे आदि उपस्थित होते.

### शरद बिरादार यांची नियुक्ती

**विजयपूर, दि. ३ फेब्रुवारी-**



येथील शांतीनिकेतन शिक्षण संस्थेचे संचालक मंडळाचे सदस्य शरद बिरादार यांची विजयपूर महसूल उपविभागीय स्तरीय जागृती व प्रभारी समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्यपदी नियुक्ती करुन कार्य करण्याची संधी दिल्याबद्दल शरद बिरादार यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि समाजकल्याण खात्याचे निर्देशक बी. जी. इंडी व समितीच्या सदस्यांचे आभार मानले आहे.

### विजयकुमार कांबळे यांना परिवर्तन पुरस्कार प्रदान

**अणदूर, दि. ३ फेब्रुवाी-**



येथील बँकिंग क्षेत्राच्या माध्यमातून गोरगरीब जनतेची सेवा करणारे विजयकुमार कांबळे यांना परिवर्तन सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार देण्यात आला. शिपाई ते शाखाधिकारी असा प्रवास करून जनतेला बँकिंग क्षेत्रातील सेवा देणाऱ्या विजयकुमार कांबळे यांनी गेली अनेक वर्षे धाराशिव जिल्ह्यातील विविध स्टेट बँकेच्या शाखांमधून गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्याचे कार्य केले असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पुरस्कार देण्यात आला. त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने अणदूर परिसरातून त्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे. खडकाळी मॉर्निंग क्लब, जयमल्हार पत्रकार संघ व ८-फार्मा ग्रुप यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.




### ओंकार साखर कारखान्याला पुरस्कार

**पिलीव, दि.३ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील ओंकार साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी व कामगारांसाठी भरिव योगदान देऊन आर्थीक प्रगती साधून सर्व युनिट मधील भागाचा कायापालट केला आहे. याचीच दखल घेत नवी दिल्ली येथील शिया २०२५ मधील साखर उद्योगातील आंतरराष्ट्रीय पुरस्कार चिनीमुंडी फेस्टीव्हलमध्ये सीने अभिनेत्री हिनाखान यांच्या हस्ते ओंकार साखर कारखाना परिवाराचे संचालक ओमरोज बोत्रे-पाटील यांना प्रदान करण्यात आला. ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील, संचालक प्रशांत बोत्रे-पाटील यांनी गेल्या पाच वर्षात शेतकरी, कामगार वर्ग यांचे हित जोपासत कायापालट केला. याचीच दखल घेत या कारखान्यास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

### अहिल्यानगर येथे १६ फेब्रुवारीला माळी समाज वधू-वर मेळावा

**माळीनगर, दि.३ फेब्रुवारी-**

राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर व पालक परिचय मेळावा १६ फेब्रुवारी रोजी आयोजित केल्याची माहिती शुभ रेखा माळी वधू-वर सूचक केंद्राचे संचालक सुभाष शिंदे आणि सुरेखा शिंदे यांनी दिली. शुभरेखा वधू-वर केंद्राचे हे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. रविवारी १६ फेब्रुवारी रोजी दुपारी एक ते पाच या वेळात लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय टिळक रोड, एसटी स्टॅन्डजवळ, अहिल्यानगर येथे आयोजित केला आहे. वधू-वरांसोबत दोन व्यक्तींना प्रवेश आहे. मेळाव्याला हजर असलेल्या वधू-वरांना मेळाव्यानंतर आठ दिवसात इतर वधू वरांचे फोटो, फोन नंबरसह माहिती पाठवली जाणार आहे. नोंदणीसाठी ८०५५३७५५९९ तसेच ८४५९१०३५४२ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा, असे आवाहन संचालक सुभाष शिंदे यांनी केले आहे.

## अनैतिक संबंधास अडथळा ठरणाऱ्या पतीचा पत्नीने काढला काटा

### सुळेवाडी येथील विहिरीत फेकलेल्या मृतदेहाचे गूढ उकलले; आरोपींना गुरुवारपर्यंत पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३ फेब्रुवारी-**

अनैतिक संबंधास आड येणाऱ्या पतीचा प्रियकराच्या मदतीने काटा काढला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह विहिरीत टाकून दिला. या घटनेचे गूढ उकललेले असून, पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. ही घटना सुळेवाडी (ता. माळशिरस) येथे उघडकीस आले आहे.

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील पाणीपुरवठा विहिरीत खून करुन अज्ञात व्यक्तीचा मृतदेह चक्क मुरघास बॅगेत भरुन टाकला होता. याचा पोलिसांनी २४ तासाच्या आत झडा लावला असून पत्नी, प्रियकर व मदतनीस यांना गजाआड केले. याची संपूर्ण हकिकत अशी की, २३ जानेवारीला मयताची पत्नी विजयमाला निर्मळ यांनी आपले पती हे चांदापुरी येथून बेपत्ता झाले आहेत, अशी तक्रार माळशिरस पोलीस ठाण्यात दिली होती. २७ जानेवारी रोजी सुळेवाडीच्या पोलीस पाटील वंदना लोखंडे यांनी पोलीस नाईक दत्ता खरात यांना फोन करुन सुळेवाडी येथील पाणीपुरवठा विहिरीत मुरघास बॅगेत



काही तरी भरलेले तरंगत असून त्यातून प्रचंड दुर्गंधी येत असल्याचे फोन करुन सांगितले. यानंतर लगेच पोलीस यंत्रणा कामाला लागली व घटनास्थळी पोहोचली असता विहिरीतून सदर मुरघास बॅग बाहेर काढली असता अंगात लाल रंगाचा शर्ट व पांढरी बंडी असलेला अनोळखी ४० ते ४२ वर्षाचा अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह त्यामध्ये असल्याचे आढळून आले. कोणतरी अज्ञात कारणावरुन सदरच्या अज्ञात व्यक्तीचा मृतदेह खून करुन टाकल्याचे सिद्ध झाले. यावेळी माळशिरस पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या मिसिंगवरुन सखोल चौकशी केली असता मयताचा भाऊ अशोक व पत्नी विजयमाला निर्मळ यांना पोलिसांनी चौकशी साठी ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता .यावरुन मयताची ओळख पटली व तो मृतदेह दत्ता निर्मळ यांचाच असल्याची खात्री पटली. यामध्ये मयताची पत्नी विजयमाला व तुळशीराम ऊर्फ बबन शिंदे या दोघांचे अनैतिक संबंध होते. यामुळे त्यांच्यामध्ये सतत खटके उडत होते. याच्या चौकशीसाठी विजयमला निर्मळ व प्रियकर तुळशीराम ऊर्फ बबन शिंदे यांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले असता पत्नी विजयमाला व तुळशीराम शिंदे या दोघांचे प्रेमसंबंध होते. याचा संशय पतीला आला होता. यामुळे कुटुंबात सतत भांडण होत होते. यामुळेच पत्नी विजयमाला निर्मळ हिने प्रियकर तुळशीराम ऊर्फ बबन शिंदे व त्याचा पठाणवस्ती येथील मित्र मोहन लोंढे या दोघांनी मयत दत्ता निर्मळ यास दारु पाजून सुळेवाडी येथील तलावाजवळ नेऊन त्या दोघांनी दोरीने गळा दाबून मारुन टाकून मुरघासाच्या बॅगेत भरुन तो मृतदेह पाणीपुरवठा विहिरीत टाकून दगड बांधून दिल्याची कबुली दिली. या गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर मयताची पत्नी विजयमला निर्मळ, प्रियकर तुळशीराम ऊर्फ बबन शिंदे व मोहन लोंढे यांना पोलिसांनी अटक केली आहे. संबंधित आरोपींना ६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कस्टडी दिली आहे.

ही कामगिरी अकलूज विभाग उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, पंढरपूर पोलीस उपविभागीय अधिकारी अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदशनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल जानकर, सपोनि गोसावी, पोहेकॉ घोगरे, स्वरुप शिंदे, हरिश्चंद्र पाटील, पंडीत मिसाळ, पोहेकॉ दत्ता खरात, धनाजी झगडे, पोलीस कॉन्स्टेबल अजित कडाळे, मन्सूर नदाफ, युसुफ पठाण व सपोनि वायकर यांच्या टीमने बजावली.

#### या घटनेत केला मोठा बनाव

यामध्ये मयत दत्ता निर्मळ याचा आपण गेम केला आहे असा संशय पोलीस व नातेवाईकांना येऊ नये म्हणून प्रियकर व विजयमाला हिने मयत दत्ता निर्मळ हे २३ जानेवारीला पाठीमागून ५ वाजता ऊसतोड करण्याकरिता येतो म्हणाले व ते नंतर ऊसतोड करण्याकरिता आलेच नाहीत म्हणून माळशिरस पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल केली होती. ही सर्व घटना घडल्यानंतर मयताची पत्नी विजयमाला निर्मळ व प्रियकर तुळशीराम ऊर्फ बबन शिंदे हे माढा तालुक्यातील म्हैसगाव येथे निघून गेले होते. त्या ठिकाणी आपला संसार थाटण्याच्या प्रयत्नात होते. याचा छडा पोलिसांनी दाखल केलेल्या मिसिंगवरुन २४ तासाच्या आतच लावला.




## उन्हाळा सुखकर करण्यासाठी वृक्ष लागवड करा

### ज्ञानेश्वर दुधाणे : निसर्ग पूजा हिच खरी पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३ फेब्रुवारी-**

गादेगाव (ता.पंढरपूर) येथे उमा महाविद्यालय पंढरपूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उन्हाळा सुखकर करण्यासाठी वृक्ष लागवड करण्याचे आवाहन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.

तरुण युवक युवतीवर सामाजिक बांधिलकीचे संस्कार रुजावेत, समाजिक काम करत असताना कोण, कोणत्या अडचणी येतात? याविषयीची माहिती मिळावी या उद्देशाने हे सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर प्रत्येकवर्षी आयोजित करण्यात येते. सुरुवातीस उपसरपंच गणपत मोरे, वक्ते ज्ञानेश्वर दुधाणे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी प्रमुख वक्ते प्रा.शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज या विषयावर मनुष्याला भविष्यकाळ सुखकर घालवायचा असेल तर वृक्ष लागवड आणि संवर्धन केलेच पाहिजे. अनेक ठिकाणी आपण पाहतो प्रत्येक वर्षी वृक्षारोपण केले जाते परंतु तेथे फक्त खड्डेच दिसतात. असे न करता झाडे वाढवली पाहिजेत. झाडे लावताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते, जशी आपली लहान मुलं आपण घरामध्ये सांभाळतो त्याच पद्धतीने झाडांचं संवर्धन केलं तरच ती झाडे चांगली येतील. वृक्ष, निसर्गपूजा हीच खरी पूजा आहे.कारण वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी पक्षी सुस्वरे आळवती या संत तुकाराम महाराजांच्या रचनेनुसार वृक्ष सर्वांना समान वागणूक देत आपलं सर्वस्व अर्पण करतात. हा गुण आपण झाडाकडून घेतला पाहिजे. झाडे लावली, जगवली पाहिजेत याच अनुषंगाने करकंब गावच्या लेकीच झाड अभियान टीमच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून करकंबच्या सर्व प्रवेशद्वारावरती जवळपास ७०० मोठ्या झाडांची लागवड करून यशस्वी वृक्षारोपण करण्यात आले आहे, असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पृथ्वीराज अटकळे, प्राजक्ता पवार, भूमिका वाघ, रुक्मिणी वर्षे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी नंदिनी कदम हिने तर आभार विजय बागल यांनी मानले.

## पंढरपूर-देहूदरम्यान रेल्वे सुरू करा


### केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडे खा. मोहिते-पाटील यांनी केली मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ फेब्रुवारी-**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे खा.मा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे, देहू आणि पंढरपूर रेल्वेमार्गावर रेल्वे सुरू केल्याची मागणी केली. महाराष्ट्रभरातील लाखो वारकरी भक्तांसाठी पंढरपूर देहू रेल्वे सुविधायुक्त ठरेल असे खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच देहू येथील संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान, तसेच आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराजांची समाधी राज्यभरातील लाखो भक्तांचे प्रमुख तीर्थस्थळे आहेत.सध्याच्या परिस्थितीत, देहू आणि पंढरपूर दरम्यान रेल्वे सेवा उपलब्ध नसल्यामुळे भक्तांना आणि सामान्य प्रवाशांना अडचणी येत आहेत. खा.मोहिते-पाटील यांनी रेल्वे मंत्रालयाकडे त्वरित रेल्वे सेवा सुरू करण्याची विनंती खा.मोहिते-पाटील यांनी केली. याचबरोबर दादर-पंढरपूर सांगोला-मिरजमार्गे सातारा ही एक्सप्रेस आठवड्यातून तीन दिवस चालते प्रवाशांच्या सोईकरता ही रेल्वे दररोज नियमित करण्यात यावी. कुर्डुवाडी जंक्शनवर पुणे-सिकंदराबाद शताब्दी एक्सप्रेसला थांब्याची मागणी केली आहे.तर हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसला माढा व जेऊर येथे थांबा देण्याची मागणी केली.

मुंबई-हैदराबाद एक्सप्रेस ही कोरोना काळानंतर संपूर्णपणे एसी कोचमध्ये रूपांतरित करण्यात आली आहे. सध्या या गाडीत २ स्लीपर कोच आणि २ जनरल कोच उपलब्ध आहेत.मुंबई ते हैदराबाद दरम्यानच्या अन्य स्थानकांवरून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांना कोचच्या कमतरतेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे, या गाडीमध्ये अतिरिक्त २ स्लीपर आणि २ जनरल कोच जोडण्यात यावे म्हणून सांगितले.



#### सकारात्मक प्रतिसाद

खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मतदारसंघातील विविध रेल्वे प्रश्न केंद्रीय रेलवे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमक्ष मांडले यावर मंत्री महोदयांनी संबंधित मागण्या मार्गी लावण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.

## पोषक वातावरणामुळे गव्हाचे पीक जोमात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३ फेब्रुवारी-**

गव्हाला पोषक वातावरण असल्यामुळे यावर्षी सुरवातीस (नोव्हेंबर) केलेले गव्हाचे पीक जोमात आल्याचे सर्वत्र दिसून येत असून शेतकऱ्यामधून समाधान व्यक्त होत असून पीक हातात येईपर्यंत निसर्गाने साथ दिली तर चांगले उत्पन्न मिळण्याची आशा शेतकऱ्यांना आहे.

शेतकरी मिलिंद कुलकर्णी यांनी चांगली मेहनत घेऊन गव्हाचे पिक जोपासले असून एकरी १६ ते २० क्विंटल उत्पादन मिळेल अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली. त्यांनी अंकुर केदार या गव्हाच्या जातीची इकारी ४० किलोप्रमाणे तीन एकर क्षेत्रात पेरणी केली. पेरणी करताना १८;४६ खताची एकरी २ पोती. दिली.२१ दिवसानंतर वेस्टा या तणनाशकाची फवारणी केली. त्यानंतर दिड महिन्यानंतर



डीएपीची फवारणी केली व युरिया खताची मात्रा व शेवटी पोटश खताची मात्रा देवून गरजेनुसार पाण्याच्या सहा पाळ्या दिल्या आता गव्हाची चांगली वाढ होऊन चांगली लोंबी लागली असून चागला दाणा भरला आहे. सुमारे चार इंच लांबीची लोंबी असून ५० ते ६० दाणे भरले आहेत.

पिकावर कसलीही रोगराई आली नाही. मार्चच्या पहिल्या आठवड्यात गहू काढणीला येऊन एकरी १६ ते २० क्विंटलप्रमाणे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा त्याने व्यक्त केली.



निसर्गाने साथ दिल्याने सुरवातीस पेरणी केल्याने हवामानात थंडी टिकून राहिल्याने गहू पिकाची वाढ चांगली झाली असून बियाणेही दर्जेदार असल्याने पीक एकसारखे आले आहे. एकरी १६ ते २० क्विंटल उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.

**- मिलिंद कुलकर्णी, शेतकरी, माळशिरस**



## ब्रिमा सागर कारखाना भजनी मंडळाचा राज्यात तिसरा क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ यांच्या वतीने नाशिक येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धेत श्रीपूर येथील ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टलरीज लिमिटेड कारखान्याच्या कामगार भजनी मंडळाने भजन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला.

यामध्ये कंपनीचे रसायन तज्ञ डी. बी. कुलकर्णी, सुनिल मदाल, भारत मोरे, संजय यादव, विठ्ठल कदम, सुनील गोसावी, नानासाहेब केचे, रामकृष्ण गवळी, दावल शिवशरण, प्रसाद कोकीळ, नामदेव जाधव, गणेश विभुते यांनी सहभाग घेतला होता तर सोलापूर जिल्हा कामगार कल्याण मंडळ अधिकारी तालीकोटी यांचे सहकार्य लाभले. भजनी मंडळाने मिळवलेल्या या यशाबद्दल मिळवल्याबद्दल ब्रिमा सागर कारखान्याचे डायरेक्टर उदय कोठारी, डायरेक्टर भरतकुमार शेठीया, कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, डेप्युटी मॅनेजर चंद्रकांत भागवत, नरेश पाठक, सुरक्षा अधिकारी भागवत पारसे यांनी अभिनंदन केले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## येवती येथील ३५ रामभक्तांचे १४ दिवसासाठी वनवासास प्रयाण

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापुर तालुक्यातील मौजे येवती येथील ३५ रामभक्त १४ दिवस वणवासासाठी सोमवार दि.३ फेब्रुवारी रोजी गावातून प्रयाण केले.

येवती येथे श्री संत एकनाथ महाराज लिखित भावार्थ रामायण ग्रंथ सुरू असून हे तिसरे वर्ष आहे. रविवार दि.१६ फेब्रुवारी



रोजी सायंकाळी श्री लक्ष्मण शक्ती सोहळा संपन्न होत असून या लक्ष्मण शक्ती सोहळ्या निमित्त ३५ रामभक्त वनवासास प्रयाण झाले सकाळी गावातून राम भक्तांनी रामफेरी काढली यावेळी गावातील सर्व रामभक्त या फेरी मध्ये उपस्थित होते.

जय श्रीराम जय श्रीराम च्या जय घोषाने अवघा परिसर दणाणून गेला. येवती येथे मोठ्या उत्साहात व आनंदात श्री भावार्थ रामायण ग्रंथ सुरू असून हे रामायणाचे तिसरे वर्ष आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### उस्मानाबाद जनता बँकेस सहकार मंत्र्यांची भेट

**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेस सदिच्छा भेट दिली. यावेळी बँकेचे अध्यक्ष वसंत संभाजीराव नागदे यांनी त्यांचा सत्कार केला. यानंतर बँकेचे वरिष्ठ संचालक विश्वास शिंदे व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय घोडके यांनी बँकेच्या आर्थिक स्थिती व कामकाजाविषयी माहिती दिली. यावेळी बाबासाहेब पाटील यांनी आपल्या भाषणात बँकेबद्दल आत्मीयता व्यक्त केली. ते म्हणाले, मी ४०-४५ वर्षांपासून या बँकेचा सभासद आहे. माझ्या व्यवसायासाठी घेतलेले पहिले कर्जही याच बँकेमधून होते. बँकेच्या सहकार्यामुळेच मी पुढे एका बँकेची स्थापना करू शकलो. याप्रसंगी बँकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध बँकांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी बँकेचे उपाध्यक्ष वैजिनाथ ज्ञानदेव शिंदे यांनी मंत्री महोदयांचे तसेच उपस्थितांचे आभार मानले.

### रुपाली अंकुशराव सन्मानित

**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

प्रजासत्ताक दिनी महिला बालकल्याण केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी व दिल्लीच्या राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांच्या हस्ते रूपाली नितीन अंकुशराव यांचा प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.




धाराशिव तालुक्यातील कौडगाव येथील अंगणवाडी सेविका रूपाली अंकुशराव यांची प्रजासत्ताक दिनासाठी जिल्ह्यातून एकमेव निवड करण्यात आली होती. दिल्ली येथील समारंभात अंकुशराव यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी महिला बालकल्याण विभागाचे आयुक्त कैलास पगारे, उपायुक्त उज्वला पाटील आदींसह अधिकारी उपस्थित होते. याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, महिला बालविकास विभागाचे देवदत्त गिरी, प्रकल्प अधिकारी सविता देशमुख, विस्तार अधिकारी किशोर वंजारवाडकर, वंदना सुकाळे, ययाखान पठाण यांनी अभिनंदन केले आहे.

### मंदिर कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे केवळ पंधरा ते वीस मिनिटात आग आटोक्यात...

# तुळजाभवानी मंदिर स्टॉक रूमला शॉर्टसर्किटने आग








**एसीला रूममध्ये बसवलेले एसीला शॉर्टसर्किट ! मंदिरच्या सक्षम यंत्रणामुळे संभाव्य धोका टळला...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दोन्ही मंदिर महाद्वाराच्यामध्ये असणाऱ्या इमारतीत असलेल्या स्टॉक रूमच्या एसीला झालेल्या शॉर्टसर्किटने दि.३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच साडेपाचच्या सुमारास आग लागली. अचानक इमारतीमधून येणाऱ्या धुराकडे मंदिर महाद्वारपाशी असणारे भाविक पुजारी आणि सुरक्षा रक्षकांच्या ही बाब लक्षात येताच मंदिरात असणारे फायर ब्रिगेडच्या टाक्यांनी ही आग केवळ १५ ते २० मिनिटात आटोक्यात आणली.

मंदिर कर्मचारी सुनील काकडे यांनी तातडीने आग लागलेल्या स्टॉक रूमच्या खिडक्यांच्या काचा फोडून त्याच भिंतीला असणाऱ्या एसीला लागलेली आग विझवण्यासाठी मंदिरात उपलब्ध असलेले अग्निशामक यंत्राच्या साह्याने आग विझवली. स्टॉक रूममध्ये तुळजाभवानी देवीचे लॅमिनेशनचे फोटो ठेवले होते. आगीमुळे कुठलेही नुकसान झाले नसल्याचे मंदिर कर्मचाऱ्यांनी सांगितले. फायर ब्रिगेडच्या पाच टाक्या आग आटोक्यात आणण्यासाठी फोडण्यात आल्या होत्या. आग लागल्याचे समजतात. मंदिर प्रशासकीय कार्यालयातून मंदिर धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर इंतुले, विश्वास कदम, जयसिंग पाटील, विश्वास सातपुते, नागेश शितोळे यांच्यासह सर्वच कर्मचारी तातडीने घटनास्थळी धावून गेले. घटनेचे गांभीर्य ओळखून दोन्ही मंदिर महाद्वारापैकी एक महाद्वार काही काळासाठी भाविकांच्या प्रवेशा बंद ठेवण्यात आले. आणि दुसऱ्या महाद्वारातून दर्शनासाठी भाविकांना सोडण्यात आले.

आग आटोक्यात आल्यानंतर मंदिरच्या हाउसकीपिंग कर्मचाऱ्यांनी स्टॉक रूमची साफसफाई केली.

## अल्पवयीन मुलीची घरात शिरून छेडछाड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

शहरातील एका कॉलनीमध्ये अल्पवयीन मुलगी घरात एकटी असल्याचे बघून त्याच कॉलनीत राहणाऱ्या एका युवकाने घरात शिरूर मुलीला छेडछाड करण्याचा प्रयत्न केला.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, आई, वडील, दोन भाऊ यांच्यासह शहरातील एका कॉलनीत इयत्ता नववीमध्ये शिकणारी मुलगी राहण्यास असुन मुलीचे वडील एका हॉटेल मध्ये काम करतात व आई सुद्धा एका हॉस्पीटल मध्ये काम करते.

दि.२९ जानेवारी रोजी मुलगी नेहमीप्रमाणे सकाळी ११.३० ते ०५.३० वाजेपर्यत शाळेत जावुन परत घरी आली. त्यावेळी आई ही कामावरुन अजुन घरी आली नव्हती. तसेच वडील देखील कामावर गेले होते.

मुलगी घराचा दरवाजा उघडा ठेवुन किचनमध्ये काम करुन सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास हॉलमध्ये आली असता हॉलमधील बेडवर एक अनोळखी मुलगा बसलेला दिसल्याने ती मुलगी दचकली. तेवढ्याच त्या युवकाने मुलीचा उजवा हात पकडुन त्याचेजवळ मुलीला ओढले. अचानक घडलेल्या प्रकारामुळे मुलगी घाबरली आणि मोठमोठ्याने ओरडली.

कामावरुन घरी आल्याने मुलीच्या आईस धक्काबुकी करुन ढकलुन घरातुन पळुन गेला. मुलीचे आई वडील व नातेवाईक यांनी तातडीने पोलीस स्टेशनला जाऊन छेडछाड करणाऱ्या युवकाविरुद्ध तक्रार दिली.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचारप्रकरणी आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपी हकीम मेहबूब काझी (रा. रामनगर, सांजा रोड ) याला विशेष न्यायालयाने १० वर्षे सक्तमजुरी व २१ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. विशेष न्यायाधीश टी.जी. मिटकरी यांच्या न्यायालयाने हा निर्णय दिला.

प्रकरणाचा थोडक्यात माहिती अशी की, पीडितेचे कुटुंब व आरोपी हे दोन वर्षांपासून ऊसतोड कामगार म्हणून एकत्र काम करत होते. आरोपीने पीडितेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला व तिला व तिच्या आईला मजुरीचे काम मिळवून दिले. ७ मे २०१९ रोजी आरोपीने पीडितेला कामावर न जाता दुसऱ्या ठिकाणी नेण्याच्या बहाण्याने फसवले. त्यानंतर तिला हुमनाबाद आणि जहीराबाद येथे ऊन २६ मे २०१ ९ पर्यंत एका खोलीत डांबून ठेवले. या कालावधीत त्याने वारंवार लैंगिक अत्याचार केले.

तपास व न्यायालयीन प्रक्रिया पीडितेच्या आईने आनंदनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा नोंदवण्यात आला. तपास पीएसआय डी.व्ही. सिद्धे व पीएसआय एस.जी. भुजबळ यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. पीडितेची साक्ष, मुख्याध्यापकाची साक्ष आणि वैद्यकीय अहवाल महत्त्वाचे ठरले. न्यायालयाचा निर्णय सरकार पक्षाचे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता सचिन सूर्यवंशी यांच्या युक्तिवादावर न्यायालयाने विश्वास ठेवला.

आरोपीला भादंवि कलम ३६३, ३ वर्षे सक्तमजुरी व ३ हजार रुपये दंड वर्षे, भादंवि कलम ३६६-५ सक्तमजुरी व ३ हजार रुपये दंड, भादंवि कलम ३७६-१० वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ६ प्रत्येकी १० वर्षे सक्तमजुरी व प्रत्येकी ५ हजार रुपये दंड शिक्षा ठोठावण्यात आली. आरोपीला ठरवण्यात आलेल्या शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत.

या खटल्यात महिला पोलीस कॉन्स्टेबल (ब. नं.१४०६) सी.बी. तर्फेवाड यांनी कोर्ट पैरवीचे काम पाहिले.

## सव्वापाच लाख शेतकऱ्यांना मिळणार २५० कोटींचा दिलासा : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश भागाला यंदाच्या खरिपात पावसाने झोडपून काढले. त्यामुळे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असलेल्या सोयाबीनच्या क्षेत्राला मोठा फटका बसला. परिणामी सोयाबीनच्या उत्पादनातही मोठ्या प्रमाणात घट दिसून आली आहे. खरिपातील मुख्य नगदी पीक असलेल्या सोयाबीनला सर्वाधिक फटका बसल्याने शेतकरी बांधवही अडचणीत सापडले आहेत. नुकसानीची पूर्वसूचना दिलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विम्यापोटी किमान रु. ६२०० ते ६५०० प्रती हेक्टरी सर्व मंडळांना मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या पावसामुळे शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने आर्थिक कोंडीत सापडलेल्या जिल्ह्यातील जिल्ह्यातील ५ लाख ४९ हजार ७९१ शेतकऱ्यांनी खरीप हंगामात ओढवलेल्या नैसर्गिक आपत्ती दरम्यान विमा कंपनीच्या निकषानुसार झालेल्या नुकसानीच्या पुर्वसुचना नोंदवल्या होत्या.नोंदविण्यात आलेल्या एकूण ५ लाख ३२ हजार ८२६ शेतकऱ्यांच्या पुर्वसुचना पात्र ठरल्या आहेत. पात्र ठरलेल्या या ५ लाख ३२ हजार ८२६ पूर्वसूचनांपैकी ४ लाख ७० हजार ७२ पुर्वसुचना एकट्या सोयाबीन पिकाच्या आहेत. वरील सर्व पात्र पूर्वसूचनांचा आढावा जिल्हास्तरीय समितीमध्ये घेण्यात आला आहे.

विमाकंपनीने मान्य केलेल्या या सर्व पात्र पूर्वसूचनांचा हेक्टरी रक्कम ६ हजार २०० ते ६ हजार ५०० रुपयांचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. लवकरच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हा हक्काचा विमा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून येत्या महिन्याभरात ही रक्कम शेतकरी बांधवांच्या खात्यात एकूण २५० ते २६० कोटी रुपये जमा होतील. त्यासाठी आपला आग्रही पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## रस्ता रुंदीकरणाचे काम; महिलांचे आमदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**

विकास प्राधिकरण योजनेमध्ये मंजूर असलेल्या हुतात्मा स्मारक, जवाहर गल्ली, आर्य चौक ते साळुंके गल्ली, किसान चौक या रस्त्याचे रुंदीकरण करा म्हणून आ. राणाजगजितसिंह पाटील यांना या भागातील रहिवासी महिलांनी निवेदन दिले आहे. तसेच साळुंके गल्लीतील जागृत श्री खंडोबा मंदिरास तात्काळ जागा उपलब्ध करून देण्याचीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत हुतात्मा स्मारक जवाहर गल्ली आर्य चौक ते साळुंके गल्ली किसान चौक या रस्त्याचे १२ मीटर रस्ता रुंदीकरणाचे काम मंजूर झालेले आहे. परंतु या भागातील रस्ता रुंदीकरणाचे काम वर्षा नु वर्ष रखडलेले असून याचा फटका या भागातील रहिवाशांना बसत आहे. रस्ता अरुंद असल्याने या भागात कायम वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

निवेदनावर सावित्रा साळुंके, अनिता साळुंके, सुवर्णा भालेकर, अंजली साळुंके, उल्का साळुंके, स्वाती साळुंके, शालिनी साळुंके, जयश्री साळुंके, शुभांगी साळुंके, कविता साळुंके, शितल साळुंके, संगिता साळुंके, श्वेता साळुंके, वैष्णवी साळुंके, आश्विनी साळुंके यांच्यासह या भागातील रहिवाशांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## विश्व साहित्य संमेलनात तुळजाभवानीचा जागर अन् पंढरीची दिंडी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राच्या लोककलेचा मानदंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुळजाभवानी देवीचा जागर आणि पंढरीच्या पांडूरंगाची दिंडी यंदाच्या विश्व साहित्य संमेलनात प्रमुख आकर्षण ठरले. धारशिवच्या २५ कलाकारांच्या पथकाने शनिवार, १ फेब्रुवारी रोजी पुणे येथे पार पडलेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात उत्कृष्ट सादरीकरण केले. या जागर आणि दिंडीने संमेलनातील सारस्वतांसह साहित्यप्रेमींची वाहवा मिळविली.

पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवारी सायंकाळी ४ ते ४.३० या कालावधीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या मुख्य मंचावर आराधी लोकनृत्य आणि दिंडी लोकनृत्य सादर करण्यात आले. धाराशिव शहरातील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शाखेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दरवर्षी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील लोक महोत्सवात महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा प्रभावी अविष्कार विविध लोकनृत्याच्या माध्यमातून सादर करतात. यंदा नाशिक येथे झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात सुवर्णपदक जिंकत या पथकाने दिंडी लोकनृत्याच्या माध्यमातून सबंध देशभरात महाराष्ट्राच्या लोक परंपरेचा बाज प्रभावीपणे सादर केला होता.

लय, ताल आणि लोकसंगतेचा बाज असलेल्या या पथकाला आता आंतरराष्ट्रीय स्तरावरील विश्व मराठी साहित्य संमेलनात आपले सादरीकरण करण्याची संधी मिळाली. १४ मिनिटांचे आराधी नृत्य आणि १४ मिनिटांचे दिंडी नृत्य, अशा २८ मिनिटांच्या सादरीकरणासाठी २५ कलाकारांनी मोठी मेहनत घेतली. यात आठ मुली आणि १७ युवकांचा सहभाग होता.

### मराठा जनआक्रोशच्या नावाखाली खंडणी वसुली...

# ‘ब्लॅकमेलर’ला आंदोलनकर्त्यांकडून चोप

**आष्टीचे आमदार सुरेश धस यांच्या नावाचा गैरवापर करून अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या अशिष विशाळवर पोलिसात तक्रार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

मराठा जन आक्रोश आंदोलनाच्या नावावर आणि आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचे सांगत अधिकाऱ्यांकडून खंडणी वसूल करणाऱ्या अशिष विशाळ नामक ब्लॅकमेलरला मराठा जन आंदोलनकर्त्यांनी भरचौकात चोप देत पोलिसांच्या हवाली केले. या प्रकरणी संबंधित व्यक्तीच्या फोन कॉल्स व बँक खात्यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून धाराशिव शहरातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये स्वतःला आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सांगणाऱ्या अशिष विशाळने अधिकाऱ्यांना धमकावत खंडणी वसूल केल्याचे उघडकीस आले. तो मराठा जन आक्रोश आंदोलनाच्या नावावर पैसे उकळत असून, संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला मदत करण्याच्या बहाण्याने अधिकाऱ्यांना वेठीस धरत असल्याचा



आरोप आहे. या गैरप्रकारामुळे मराठा समाजाच्या आंदोलनाची व आमदार सुरेश धस यांच्या प्रतिमेची नाहक बदनामी होत असल्याचे लक्षात येताच, मराठा आंदोलकांनी विशाळला भरचौकात चोप दिला.

अधिकाऱ्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यास त्यांना आमदार सुरेश धस यांच्याकडे तक्रार करून चौकशी लावण्याची धमकी विशाळ देत होता. त्यामुळे बऱ्याच अधिकाऱ्यांनी दडपणाखाली पैसे दिल्याची चर्चा आहे.

मात्र, हा प्रकार मराठा आंदोलकांच्या निदर्शनास येताच त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची खातरजमा केली. त्यानंतर विशाळला भररस्त्यात जाब विचारण्यात आला. मात्र, तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने आंदोलकांचा संयम सुटला आणि त्यांनी त्याला चोप देत पोलिसांकडे सुपूर्द केले.

### मराठा आंदोलनाच्या बदनामीमुळे संताप

या घटनेमुळे मराठा आंदोलनाच्या प्रतिमेवर डाग लागण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, मराठा जनसेवकांनी वेळीच कारवाई करत समाजाच्या नावाने सुरू असलेल्या खंडणीखोरीला आळा घालण्याचे ठरवले. आंदोलकांनी स्पष्ट केले की, मराठा समाजाच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या आंदोलनाचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही.



खंडणीखोर
अशिष विशाळ

मराठा जनसेवकांनी हा संपूर्ण प्रकार आमदार सुरेश धस यांच्या कानावर घातला असता, त्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्या व्यक्तीला सोडू नका. त्याच्या फोन कॉल्स आणि बँक खात्यांची सखोल चौकशी करा, असा स्पष्ट आदेश त्यांनी आंदोलकांना दिला. तसेच, मुख्यमंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर असल्याने ६ फेब्रुवारीला अशिष विशाळला आष्टीला आणण्यास सांगितले. मी त्याला कसा तुडवतो, ते स्वतः पहा! असे त्यांनी ठणकावून सांगितले.

सध्या आनंद नगर पोलीस ठाण्यात अशिष विशाळवर चौकशी सुरू असून, त्याच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी केली जात आहे. मराठा समाजाच्या वतीने या प्रकरणात कडक कारवाईची मागणी होत आहे.

## शाळेला बुट्टी मारणाऱ्या गटशिक्षण अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ फेब्रुवारी -**

शासनाच्या वेळेचे बंधन न पाळता किंवा शाळेत पर्यायी शिक्षक न देता स्वताची मनमानी करत शाळेत रजेचा अर्ज न ठेवता केवळ लाडक्या भावाच्या जीवावर शाळेला बुट्टी मारणाऱ्या शिक्षकावर गटशिक्षण अधिकाऱ्यांनी कडक कारवाई करावी अशी मागणी मैलारपुर तांडा ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन ग्रामस्थांनी केंद्रप्रमुखांना दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, मैलारपुर तांडा ता. तुळजापुर येथे जि. प. प्राथमिक शाळा आहे. ही शाळा मुर्टा ग्रामपंचायत अंतर्गत येत असुन ही शाळा इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत आहे. या शाळेत असणारे शिक्षक मिसाळ हे कुठलेही कारण न देता शाळा सोडुन जातात. शाळेला उशिरा येणे, शाळेतुन दुपारी तीन वाजताच निघुन जाणे अशाप्रकारची मनमानी हे शिक्षक करत आहेत. हे शिक्षक धाराशिव येथुन ये, जा करीत असल्याने ते नेहमीच शाळेला उशिरा येतात. दि. ३१ जानेवारी रोजी सकाळचे सव्वा दहा वाजले तरी शाळा उघडली नव्हती. वास्तविक पाहता शिक्षकाने साडेनऊ वाजता शाळेत येणे अपेक्षित होते.

याबाबत शिक्षण विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ कडक कारवाई करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी मैलारपुर तांडा ग्रामस्थांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### लोखंडे अनिशा यांची शहर पोलीस ठाणे धाराशिव चालकपदी निवड

**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत श्री. स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, रूईभर कला शाखेची अनिशा लोखंडे विद्यार्थिनीची धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे चालकपदी निवड झाली. धाराशिव शहर पोलीस ठाणे यांची चालक पदासाठी झालेल्या परीक्षेत लोखंडे यांनी यश संपादन केले. जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमातून धुत्ता ग्रामीण भागातील लोखंडे यांनी आपले यश संपादन केले. लोखंडे यांच्या यशाबद्दल महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते शॉल, बुके देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक जयप्रकाश कोळगे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### मंगरुळ जि.प. शाळेत बाल आनंद बाजार

**मंगरूळ, दि.३ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगरूळ तालुका तुळजापूर येथे शनिवार १ फेब्रुवारी रोजी बाल आनंद बाजार व माता पालक यांच्यासाठी हळदी कुंक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञानातही भर पडावी व विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानही बालवयात अवगत व्हावे यासाठी या बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात होते यावेळी विद्यार्थ्यांनी घरी बनवून आणलेले खाद्यपदार्थ, शेतात पिकवलेल्या भाज्या, सौंदर्यप्रसाधने व स्टेशनरी साहित्य एकमेकांस व उपस्थित पालकांना विकून नफा तोट्याच्या ज्ञानाचे धडे गिरवले व हजारो रुपयांची उलाढाल केली. यावेळी उपस्थित महिला मातांचा मकर संक्रांतीनिमित्त हळदी कुंकू लावून शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला व त्यांच्या विविध स्पर्धाही घेण्यात आल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपसरपंच गिरीश डोंगरे, पोलीस पाटील लक्ष्मण माळी, चांदसाहेब शेख, ग्रामपंचायत सदस्य आदमशा फकीर, आप्पासाहेब जेटीथोर, उपाध्यक्ष दिलीप जाधव, मनोज डोंगरे, उद्धव हजारे व उपस्थित माता पालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य यांचा पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ, युवक व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बाल आनंद बाजारासाठी मुख्याध्यापक डोलारे, हेरकर, रामशेटे, वडुळे, डोलारे यांच्यास आदि उपस्थित होते.

## चुकीच्या जीवनशैलीमुळे आजार वाढत आहेत : जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चाकूरकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

चुकीच्या जीवनशैलीमुळे विविध आजार बळावत असून, वेळीच उपचार घेतल्यास दुर्धर आजार टाळता येतात, असे प्रतिपादन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले.

पळसप येथे १० व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनानिमित्त विविध संस्थांच्या सहकार्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयाच्या वतीने भव्य सर्वरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. विक्रम वसंतराव काळे होते. त्यांनीही नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करून घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

या शिबिरात डॉ. नितीन भोसले, डॉ. स्वप्निल सांगळे, डॉ. विवेक कोळगे, डॉ. रंजीत कदम, डॉ. चंद्रशेखर मेनबुले, डॉ. अनुजा कंदले, डॉ. क्षितिजा बनसोडे, डॉ. किरण देशमुख, डॉ. विनोद बर्वे, डॉ. निलेश कुरील आदी तज्ज्ञांनी ५०० हून अधिक रुग्णांची तपासणी करून मोफत औषधे वितरित केली.

यानिमित्ताने पळसपमध्ये पशु चिकित्सा शिबिरही आयोजित करण्यात आले. उद्घाटन प्राचार्य डॉ. रमेश दापके यांनी केले. पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शरदचंद्र लाकाळ, डॉ. आर. डी. जाधव, डॉ. भारत कुंभार, डॉ. क्षीरसागर आणि सचिन कर्णवाल यांनी ७६ जनावरांची तपासणी करून लसीकरण केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अनिल काळे, गंगाधर आरडले, प्रा. अंकुश नाडे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, बालाजी तांबे, राजकुमार मेंढेकर, प्रा. ज्ञानोबा गायकवाड, सरपंच सिद्धेश्वर काळे, उपसरपंच राम लाकाळ आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रदीप इंगळे यांनी केले, तर आभार डॉ. रणवीर काळे यांनी मानले.

## तेरणा महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

तेरणा महाविद्यालय येथे कै. बाजीराव पाटील अंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन तेरणा महाविद्यालय, धाराशिव येथे कै. बाजीराव पाटील अंतर महाविद्यालयीन वाद विवाद स्पर्धा बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात येत आहे.

स्पर्धेचा विषय आहे 'राजकीय पक्षांकडून घोषित करण्यात येणाऱ्या सवंग योजना राज्याच्या विकासास तारक/ मारक' हा विषय ठेवण्यात आला आहे. या स्पर्धेत वैयक्तिक सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या स्पर्धकास प्रथम पारितोषिक रुपये ७००१, द्वितीय पारितोषिक रुपये ५००१ व तृतीय पारितोषिक रुपये ३००१ तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके एकूण चार प्रत्येकी रुपये १००१ देण्यात येणार आहे. विजेत्या संघास कायम स्वरूपी स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे.

तरी प्रत्येक महाविद्यालयाने स्पर्धेसाठी संघ पाठवून स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांनी केले आहे.

## ॲड. मैना भोसले यांना राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथील रहिवासी, जिल्हा न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ, जिल्हा बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. मैना भोसले यांना राज्यस्तरीय परिवर्तन समाजसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नळदुर्ग (ता. तुळजापूर) येथील आपलं घर येथे दि.२ फेब्रुवारी रोजी परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या वतीने संविधान सन्मान परिषद व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजवादी नेते भाई पन्नालाल सुराणा हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर येथील जेष्ठ विचारवंत डॉ. सुरेश वाघमारे, पुणे येथील सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिलींद वाकोडे, प्रा. राजा सोनकांबळे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब वडवे, संचालिका रेश्मा बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. मैना भोसले या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करीत आहेत.

धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून अनाथ, निराधार, मतीमंद मुलांच्या प्रश्नांवर त्या न्यायीक पध्दतीने कार्य करीत आहेत, त्याचीच दखल घेत परिवर्तन सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय परिवर्तन समाजकार्य पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते नळदुर्ग येथे प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी कैलास गवळी, अंकुश लोखंडे, विलास वकील, विजय कांबळे, प्रविण गुरव यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन भैरवनाथ कानडे यांनी तर आभार एस.के. गायकवाड यांनी मानले

## उर्सनिमित्त दर्ग्यावर विद्युत रोषणाई

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नळदुर्ग येथील हजरता सैय्यदा खैरून्नीसा बेगम उर्फ नानिमाँ सरकार यांच्या ५० व्या उर्स निमित्त दि.५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उरूसनिमित्त नानीमाँ सरकार यांच्या दर्ग्यावर आकर्षक विद्युत रोषनाई करण्यात आली आहे.

उर्स निमित्त दर्गाह परीसरात विविध व्यवसायिकांनी दुकाने थाटली आहेत. नानीमाँ सरकार यांच्या उर्स.ची सुरुवात ५ फेब्रुवारी रोजी ४ वाजता संदल मिरवणुकीने होणार आहे.

## जगाच्या कल्याणाकरता संतांचा अवतार : हभप. बाल किर्तनकार मानवी ठोंगे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ फेब्रुवारी -**





ब्रम्हांडनायक संत बाळूमामा मंदिर या ठिकाणी अमावस्या भंडारा उत्सवाच्या निमित्ताने बाल किर्तनकार हभप. मानवी महेश ठोंगे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली.

अमावस्याच्या निमित्ताने सकाळी संत बाळूमामा मूर्तींना अभिषेक करण्यात आला. त्यानंतर स्वामी समर्थ भजनी मंडळ खासगाव, सोनगिरी, भोंजा, कुभेंजा, व उपस्थित भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर अकरा ते एक वेळेमध्ये हभप. बालकीर्तनकार मानवी महाराज ठोंगे यांचे कीर्तन सेवा संपन्न झाले.

त्यावेळी त्यांनी कीर्तनामध्ये ब्राह्मडंनायक संत बाळूमामा चरित्राचा उल्लेख केला. संत ब्रह्मांडनायक संत बाळूमामांनी भक्तीच्या प्रचाराबरोबर समाज प्रबोधनाचा फार मोठे कार्य केले. किर्तन सेवेसाठी भक्ती वेदांत इंटरनॅशनल वारकरी गुरुकुल शिक्षण संस्था कुंभारगाव चे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी किर्तन सेवेनंतर शिवाजी कोळपे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी जिल्हाप्रमुख दत्तात्रय साळुंखे, हभप. रामराजे महाराज भोसले, हभप. ज्ञानेश्वरी मांगले, हभप. कार्तिकी शेंडे, हभप. प्रतीक्षा, हभप. अथर्व महाराज लकडे, काकासाहेब महाराज गवारे, नागेश महाराज मांजरे, नारायण महाराज माळी, बापू रुपनवर, बालाजी नेटके, भागवत दडलमल, बळीराम महाराज कोळी, शहाजी महाराज सुतार, जाधव महाराज, परमेश्वर महाराज नेटके, अंकुश जमदाडे जगन्नाथ मदने नागनाथ देवकते नागेश मदने, दत्ता लिमकर, नागेश मिसाळ सचिन डुकरे, उत्तरेश्वर सुरवसे, शारदा खंबायत, साधना राजपूत, कमलताई गायकवाड, वर्षाताई अवसरे, मंगल डडमल, कार्यक्रमाचे आयोजन केशर काकू वैरागे मदने यांच्यावतीने करण्यात आले होते.

## तात्याराव मोरे महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक क्रीडा युवा महोत्सवाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ फेब्रुवारी -**

भारत शिक्षणसंस्था संचलित तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेल क्रिडा युवा महोत्सव उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. सलग दहा दिवस महाविद्यालयामध्ये होणाऱ्या सांस्कृतिक वार्षिक स्नेहसंमेलनाचे क्रिडा महोत्सवाचे शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कवलजीत बिराजदार, तसेच डॉ. प्रशांत माने, डॉ. गणेश केशवशेट्टी, प्रा. सुरज भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

धरोहर २०२५ या नावाने महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यां मार्फत लेझीम ढोल ताशाच्या गजरात महाविद्यालयामध्ये धरोहर २०२५ प्रदर्शन करत या युवा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या सलग दहा दिवस महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम यामध्ये क्रिडा स्पर्धा कॅरम, बुद्धिबळ, क्रिकेट कबड्डी खो-खो रस्सीखेच रनिंग गोळा फेक थाळीफेक तसेच विद्यार्थ्यांमार्फत या महोत्सवामध्ये नृत्य, लावणी गीत, शेतकरी गीत, आदिवासी नृत्य, भारूड, कोळीनृत्य, नाटिका, राष्ट्रभक्तीपर गीत यासारख्या विविधतेने नटलेल्या उत्कृष्ट पारंपारिक कलाविष्काराचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे क्रीडा शिक्षक अंकुश तरमोडे व सांस्कृतिक विभागाचे प्रमुख सौरभ साठे, यांनी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य बोलत असताना या महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारासाठी प्राप्त झालेली एक संधी आहे. कारण, विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे गुण स्नेहसंमेलनामध्येच विकसित होत असतात. कलाविष्कार या सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राची लोकधाराअंतर्गत सादर करण्यात येणार आहे. यावेळी या महोत्सवाची महाविद्यालयातील विद्यार्थी आतुरतेने वाट पाहत असणाऱ्या या वार्षिक सांस्कृतिक स्नेसंमेलनाचा कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा पाठिंबा वाखाणण्याजोगा होता.

यावेळी प्राध्यापिका धृती माने, स्नेहल चनशेट्टी, दीपाली भगत प्रा. अभिलाषा हांडे, प्रा. लक्ष्मण निंबाळे, प्रा. मंगेश खिल्लारे, प्रा. दीपक घोटाळे, प्रा. रफिक शेख संगमेश मंठाळकर, अभंग शिंदे, आकाश सूर्यवंशी संदीप माने अभिमन्यू कांबळे, अमित रेड्डी, अभिजीत माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रक्तदान शिबिरामध्ये ५५ रक्तदात्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ फेब्रुवारी -**



तुळजापूर येथील गेल्या २४ वर्षापासून सर्वसामान्य ग्राहकांना स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अविरतपणे अर्थसहाय्य व मनोबल देणारी पतसंस्था म्हणून अग्रेसर असणारी आणि गरजू रुग्णांसाठी ब्लड बँक म्हणून अशी वेगळी ओळख असणारी समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्ताने संस्थेच्या वतीने दि.२ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

या रक्तदान शिबिरामध्ये ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपला सहभाग नोंदविला. या शिबिरामध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे व्हा. चेअरमन श्रीकांत भोजने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव सज्जन जाधव, संचालक राजेंद्र माळी, संजय व्हटकर, श्रीकांत देशमाने, शिवाजी गायकवाड यांच्यासह संस्थेचे सभासद खातेदार ठेवीदार बहुसंख्य संख्येने हजर होते. संस्थेने आजपर्यंत अनेक क्षसामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक उपक्रम राबवून सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा एक वेगळा ठसा उमटविला आहे.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अभिजित म्हेत्रे, अश्विनी तांबे, सुनील शेरेकर, तानाजी फुलसुंदर, भागवत गुंड, जावेद शेख, श्रीनिवास मुळे, गणेश ठेले, आशिष भोजने, तुषार डोंगरे, अशपाक सय्यद, मधुकर साळवे, प्रवीण मोरे यांनी परिश्रम घेतले.

## परंडा तालुक्यात ज्वारीचे पीक दमदार; चिकट्या रोगामुळे कडब्यावर होणार परिणाम

**तभा वृत्तसेवा / श्रीराम विद्वत**
**परंडा, दि.३ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या यावर्षीच्या रब्बी हंगामातील ज्वारी या मुख्य पिकावरच सध्या ज्वारीचे पीक हे परंडा तालुक्यातील महत्त्वाचे पीक मानले. पुर्वीच्या काळात हा तालुका ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जायचा. पण अलीकडील काळात सिंचन क्षेत्र वाढल्याने बहुतेक शेतकरी ऊस या पिकाची लागवड करीत आहे. तसेच सध्याच्या काळात शेतातील कामासाठी मजुर देखील वेळेवर मिळत नाहीत. सध्या सर्वत्र ज्वारीचे पिक समाधानकारक अवस्थेत दिसत आहे. परंतु असे असले तरी देखील बहुतांश ठिकाणी त्यावर चिकटा या रोगाचा प्रादुर्भाव



मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे जनावरांना चाऱ्यासाठी लागणाऱ्या कडब्यावर परिणाम होण्याची शक्यता दाट आहे.

उत्पन्नात देखील घट होण्याची भीती तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे यंदा पिके चांगली दिसत असली तरीदेखील शेतकऱ्यांची चिंता मात्र कायम आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेवटी शेवटी निसर्गाच्या अवकृपेमुळे खरीप हंगामात खरीपपिकांचे काही प्रमाणावर नुकसान झाले होते. त्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात ज्वारी या पिकाकडून मोठ्या अपेक्षा आहेत शिवाय ग्रामीण भागातील कोरडवाहू शेती करणारे शेतकरीही याच पिकाकडे डोळे लावून बसले आहेत. यंदा पेरण्या उशिरा झाल्या नसल्यामळे. मध्यंतरी बदलत्या वातावरणात पिके बऱ्यापैकी फुलली. आता बहुतांश ठिकाणी ज्वारीचे पीक हे हुरडा अवस्थेत आले आहे.

तर मध्य फेब्रुवारीत काढणीला सुरुवात होईल असे दिसते. मागील महिन्यात पडलेल्या आवकाळी पावसामुळे आणि गेले तीन ते चार दिवस सलग पडत असलेल्या धुक्यामुळे ज्वारीवर चिकट्या या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे, सुरुवातीलाच जमिनीत पुरेशी ओल नसल्यामुळे ज्वारीचा पेरा उशिरा झाला आहे. आता पुढच्या महिन्यात ज्वारी काढण्यात सुरुवात होईल. मात्र सध्या ज्वारीवर मोठ्या प्रमाणात चिकटा रोग पडल्यामुळे पिकांचे उत्पन्नात घट होते की काय या भीतीपोटी शेतकरी हवालदिल झाल्याचे चित्र या भागात निर्माण झाले आहे.

शिवाय जर रोगाचे निर्मुलन झाले नाही, तर होणारा कडबा जनावरांना खायला घालावा की नाही अशा द्विधा मनस्थितीमध्ये सध्या या भागातील शेतकरी असल्याचे दिसते आहे.

## ४ फेब्रुवारीपासून कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ फेब्रुवारी -**

४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार ४ फेब्रुवारी हा दिवस United by Unique या थीमवर आधारित आहे.

या दिनाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थिती एकनाथ शिंदे व अजित पवार उपमुख्यमंत्री, प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य मंत्री, मेघना बोर्डीकर-साकोरे, राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होत आहे.

या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये करण्यात येणार आहे. जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने ४ फेब्रुवारी रोजी सर्व आरोग्य संस्थांनी आपल्या संस्थांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच या कर्करोग तपासणी शिबाराचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा.असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी केले आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पत्रकारांनी दिले पालकमंत्री भोसले यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
राज्याचे बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना पत्रकारांच्या विविध मागण्याचे निवेदन लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आले.

पत्रकारिता करताना पत्रकारांना अनेक असुविधाचा सामना करावा लागत आहे. वार्तांकन करण्यासाठी पत्रकार सतत फिरत असतात त्यांना बसण्यासाठीही जागा नसते. लातूर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगर परिषद, नगरपालिका, नगर पंचायत या शासकीय कार्यालयात पत्रकारांसाठी अद्यावत पत्रकार कक्षाची स्थापना करावी अशी मागणी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केली आहे.

तसेच शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मध्ये मोफत प्रवास सवलत दिली जाते. परंतु आज शासनाने वेगवेगळ्या प्रकारच्या बसेस घेतल्या असल्यामुळे व लाखांवर असलेल्या सर्वांना सर्व बसेस मध्ये सवलत आहे, परंतु राज्यात फक्त अधिस्वीकृतीधारक पत्रकारांची संख्या २ हजारावर असताना अनेक बसचे वाहक व पत्रकारांमध्ये सतत वाद होत असतात. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये पत्रकारांना मोफत प्रवास सवलत योजना लागू करावी तसेच पत्रकाराच्या पत्नीला ही मोफत प्रवास योजना लागू करावी.

पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना निवेदन देताना जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## मुक्कामी बसचे टायर पळवले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
मुक्कामी थांबलेल्या बसचा दरवाजा उघडून चोरट्याने स्टेअर टायर डिक्ससह पळवल्याची घटना शिवणखेड (ता. अहमदपूर) येथे रात्री घडली. याबाबत अहमदपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी बसचालक बळीराम सोपान कानवटे (रा. सयदपूर खु) हे अहमदपूर आगाराची बस घेऊन शिवणखेड गावी मुक्कामी गेले होते. जेवण करून बस ग्रामपंचायत कार्यालयासमोर थांबवली असता, चोरट्यांनी बसचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला व बसमधील टायर चोरून नेले. ३१ जानेवारी रोजी सकाळी हा प्रकार उघड झाला. याबाबत अहमदपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पो. ह. आरदवाड हे करत आहेत. गावात मुक्कामी आलेल्या बसचे टायर चोरीला गेल्याने ग्रामस्थांनीही बराचवेळ या संदर्भात चौकशी केली. त्यानंतर चालकाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

## पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
येथील जय मल्हार शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयात १२ वी कला, विज्ञान, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवारी झाला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य एकनाथ पाटील होते. यावेळी प्रा. वर्षाराणी कांबळे, प्रा. सुरेंद्र खपाटे, प्रा. महादेव बरुरे, प्रा. संतोष तोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक उपप्राचार्य सतीश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अनुजा उंप, साक्षी बोराडे, ऐश्वर्या लांडगे, करण लकडे यांनी केले. शुभांगी गायकवाड हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. अजय मिरकले, प्रा. प्राची जाधव, प्रा. दीपक मुंडे, प्रा. मयुरी बिरादार, प्रा. जाकीर कादरी, प्रा.धनराज मस्के, प्रा. नारायणकार, प्रा. राजे, प्रा. स्वप्नाली क्षीरसागर, वृषल ढेपे आदींनी परिश्रम घेतले.

## घरासमोरून दुचाकीची केली चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
छत्रपती शिवाजी महाराज चौकातील घरासमोर पार्किंग केलेल्या एमएच २४ एयू ७३३३ या क्रमांकाच्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली. जुन्या वापरातील दहा हजार रुपये किमतीची दुचाकी असल्याचे फिर्यादी नबी इब्राहिम मणियार यांनी शिवाजीनगर पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

## सर्वांच्या प्रयत्नातूनच बँकेला प्रगतिपथावर नेणार : कव्हेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
सभासद, ग्राहक, ठेवीदार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून बँकेला राज्यात प्रगतिपथावर नेण्याचे काम करू, असे प्रतिपादन महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी येथे केले.

महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या वतीने आयोजित जेएसपीएम संचालित, पॉलिटेक्निक महाविद्यालय सभागृहात आयोजित 'निर्धार संवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला बँकेच्या संचालिका प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संचालक सूर्यकांतराव शेळके, सुभाषअप्पा सुलगुडले, किशनसिंह गहिरवार, नितीन सराफ, विश्वनाथ सुरवसे उपस्थित होते. महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून सभासद, ग्राहकांचे हित जोपासण्याचे काम गत अनेक वर्षांपासून सुरू आहे. महाराष्ट्र नागरी बँकेच्या कार्यातून महिलांना स्वावलंबी बनविण्याचे काम मायक्रो फायनान्सच्या माध्यमातून केले जाते. आजपर्यंत दहा हजार महिलांना विनातारण कर्ज देऊन स्वावलंबी बनविण्याचे काम केले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांनाही आर्थिक मदत करुन आधार दिला आहे. या कार्यामुळे बँकेस अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्याचबरोबर, बँकिंग क्षेत्रातील मानाचा असणारा पद्मभूषण वसंतदादा पाटील पुरस्कारही मिळाला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गुन्हे शाखेची कारवाई :सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
रस्त्याने एकट्या जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण हिसकावणाऱ्या चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्याच्याकडून ६८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व वाहन असा तीन लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातून तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

लातूर जिल्ह्यातील चोरी व चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पथके तयार करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत जिल्ह्यातील गुन्हेगारांची माहिती एकत्र करून तपास करण्यात येत आहे.

दरम्यान, एक इसम चेन स्नॅचिंग करून चोरलेले सोन्याचे दागिने विकण्याच्या प्रयत्नात औसा रोडवरील एका पेट्रोलपंपाजवळ थांबला असल्याची माहिती पथकाला मिळाली. पथक तत्काळ त्या ठिकाणी पोहोचले. संशयित राजू सहदेव जाधव (वय २२, रा. याकतपूर, ता. औसा, जि. लातूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. मागील काही महिन्यांपासून लातूर शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रस्त्यावरून एकटी पायी जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण हिसकावून दुचाकीवरून पसार झाल्याची त्याने कबुली दिली. त्याच्याकडून चोरलेले सोन्याचे ६८ ग्रॅम वजनाचे ३ मंगळसूत्र, गंठण आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा तीन लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यातून तीन गुन्ह्यांची उकल झाली आहे. पुढील कारवाईसाठी त्याला शिवाजीनगर पोलिसांच्या



ताब्यात देण्यात आले आहे. सदर आरोपीकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, अर्जुन राजपूत, दीनानाथ देवकते, युवराज गिरी, मोहन सुरवसे, राजेश कंचे, विनोद चलवाड, पोलीस अंमलदार बालाजी कोतवाड, सोनवणे यांनी ही सेवा बजावली.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दयानंद शिक्षण संस्था कटीबद्ध : लाहोटी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
कलेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असून तिच्यामुळेच जीवनात खरा आनंद मिळत असतो.विद्यार्थ्यांना कलेच्या क्षेत्रातही करिअरच्या अनेक संधी आहेत.दयानंद शिक्षण संस्थेचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच पाठिंबा असेल.विद्यार्थ्यांना कार्यशाळेतील ज्ञानाचा फायदा निश्चितच भविष्यात होईल.विद्यार्थ्यांनी सुप्त कलागुणांना वाव देत कलेच्या क्षेत्रात नावलौकिक करावे,असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'साहित्य सांस्कृतिक मंडळा'च्या वतीने 'ललित कला व प्रयोगजीवी कला' या विषयावर संस्थेतंर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला.यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य विशाल अग्रवाल,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ प्रभारी प्रा.मेघा पंडित,मिमिक्रीकार सुमित हसाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संस्थेचे विशाल अग्रवाल प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना असे म्हणाले की,कला ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून कलेमुळेच जीवनात निखळ आनंदाची प्राप्ती होत असते. प्रत्येक विद्यार्थ्यांत कला दडलेली असते,फक्त त्या कलेला ऊर्जा देण्याची गरज असते.विद्यार्थ्यांनी चित्रकला, मूर्तिकला, शिल्पकला, पेंटिंग, स्केचेस, स्किट, माईम, सिनेमा, वक्तृत्व, नाट्य, शिल्प, संगीत,गायन अशा विविधांगी कलेत आपापल्या आवडीनुसार कलेची जोपासणा व साधना केली पाहिजे.दयानंद शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे,असे ते म्हणाले. तर प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी दयानंद शिक्षण संस्थेकडे पाहण्याचा संपूर्ण महाराष्ट्राचा दृष्टिकोन चांगला आहे असे सांगून संस्थेचे पाठबळ नेहमी असते म्हणूनच कलेप्रमाणे विविधांगी क्षेत्रात संस्थेचे विद्यार्थी झळकतात,असे ते म्हणाले.

सूत्रसंचालन पर्णवी ढवारे हिने केले तर आभार प्रा.मेघा पंडित यांनी मानले.यावेळी उन्मेष वार्षिकांक संपादक मंडळातील प्राध्यापक,क्रीडाक्षेत्र,अन्वेषण, कार्यशाळेतील सहभागी यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.पर्णवी ढवारे, सुदर्शन बेंडले व विद्या पाटील या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील तीन दिवशीय अनुभव सांगितले.याप्रसंगी मंडळातील डॉ.चंद्रशेखर स्वामी, डॉ. गजानन बने,डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ. रामशेट्टी शेटकार,प्रा.शैलेश सूर्यवंशी,मंडळ अध्यक्ष सायली पंडित तसेच डॉ.महेश बेंबडे,डॉ. रोहिणी शिंदे, डॉ.संगीता जाजू,प्रा. शिवाजी आळणे,प्रा.गोपाल अवस्थी यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## बांधकाम भवनातून दुचाकी लंपास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
शहरातील राजीव गांधी चौक परिसरात असलेल्या बांधकाम भवन येथे पार्किंग केलेल्या एमएच २४ एझेड ०१७७ या क्रमांकाच्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना ३१ डिसेंबर रोजी घडली.

याबाबत शुभम राजेगावे (रा. तुळजाभवानी नगर, लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जुन्या वापरातील ३५ हजार रुपये किमतीची दुचाकी आहे.

## शारदा सेमी शाळेत निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
येथील शारदा सेमी इंग्लिश स्कुलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवारी झाला. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम पाटील होते. यावेळी डॉ. वैशालीताई पाटील, प्राचार्य लक्ष्मण पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पाटील म्हणाल्या, यश साध्य करताना अडथळे आले तरी त्याचे निवारण करण्यासाठी आधारस्तंभाची गरज असते. तो आधारस्तंभ म्हणजे पालक व शिक्षक आहेत. त्यांच्या जीवनातील अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू दिली. तसेच विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या वसुंधरा दहिफळे व अजीजा पठाण यांनी केले. प्रास्ताविक राधिका मुंडे हिने केले. आभार संजना चौधरीने मानले.

कार्यक्रमाची सांगता पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयिका वर्षा कांबळे यांनी हरवली पाखरे.. हरवली पाखरे... या गीताने केली. यावेळी शाळेची सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## उजवा कालव्यात पाणी सोडण्यात यावे: आ. कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
लातूर ग्रामीण मतदार संघातून मांजरा प्रकल्पाचा उजवा कालवा जात असून तातडीने येत्या चार ते पाच दिवसात मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे अशी सूचना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातून मांजरा प्रकल्पाचा उजवा आणि डावा कालवा जात आहे या दोन्ही कालव्यामुळे मतदार संघातील अनेक गावच्या जमिनी सिंचनाखाली येतात. जेव्हा जेव्हा मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला जातो त्यावर्षी या कालव्यांना पाणी सोडून जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली जाते.

मागील काळात मांजरा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याला काही प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते. कालवा सल्लागार समितीमध्ये मांजरा प्रकल्प उजवा कालव्याची पाणी आवर्तने मंजूर करण्यात आली आहेत, तथापि परतीचा पाऊस जास्त झाल्यामुळे रब्बी पिकांकरिता शेतकऱ्याकडून जास्त पाण्याची मागणी नव्हती. मात्र आता पिकांना पाण्याची आवश्यकता भासत असल्यामुळे कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी कालवा काठच्या विविध गावातील संबंधित शेतकऱ्याकडून होत आहे. शेतकऱ्याची गरज लक्षात घेऊन तातडीने येत्या चार ते पाच दिवसात मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली.

## विद्यार्थ्यांना वृक्षलागवड अनिवार्य करावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
आता विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड व संवर्धन अनिवार्य करावे, अशी मागणी लातूर येथील वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा यांनी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे. मात्र, हा विषय केवळ थेअरी न शिकवता तो प्रात्यक्षिक म्हणून वृक्षलागवड आणि संवर्धन करण्याची गरज आहे. वृक्षचळवळ गतिमान व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर पर्यावरण प्रात्यक्षिक ज्ञान देण्याची गरज आहे. ही मागणी चांगली आहे. याबाबत मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री यांच्याशी चर्चा करू असे आश्वासन पालकमंत्री भोसले यांनी दिले.

# रयतू बाजारासाठी आमदारांना साकडे

### ❋जागा देण्याची भाजीपाला, फळे विक्रेत्यांची मागणी❋



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**
शहरातील लातूर रयतू भाजी फ्रूट मार्केट असोसिएशनसह लातूर शहरातील गंजगोलाई, उषाकिरण चित्रमंदिर, क्रीडा संकुल व इतर चौकातील गाड्यावरून फळे व इतर वस्तू विकणाऱ्या विक्रेत्यांनी बाभळगाव निवासस्थानी जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांची भेट घेऊन व्यवसायासाठी कायमस्वरूपी जागा मिळत नाही, तोपर्यंत पर्यायी तात्पुरती जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली.

यावर मनपाने अतिक्रमण म्हणून हटवलेल्या सर्व फेरीवाल्यांना शहरातील वेगवगळ्या भागात तात्पुरती जागा उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना मनपा प्रशासनाला केल्या आहेत.

लातूर रयतू भाजी व फ्रूट मार्केट असोसियशनसह लातूर शहरातील गाड्यावरून फळ इतरवस्तू विकणाऱ्या विक्रेत्यांनी माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांना निवेदन देऊन कायमस्वरूपी जागा मिळेपर्यंत तात्पुरती पर्यायी जागा शहरात उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली. फळ व भाजीपाला विक्रेत्याकडे महानगरपालिकेचा परवाना आहे, त्यांना मनपा प्रशासनाने कायमस्वरूपी जागेची व्यवस्था करावी.

तोपर्यंत त्यांना व्यवसाय करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात लातूर शहरात जागेची व्यवस्था करावी, असा सूचना मनपा प्रशासनाला योवळी केल्या.

**शिष्टमंडळामध्ये यांची होती उपस्थिती..!**

याप्रसंगी असंघटित कामगार काँग्रेस लातूर शहराध्यक्ष गौस गोलंदाज, मजीद बागवान, हमीद बागवान, रविकांत सूर्यवंशी, राजेखां पठाण, सायरा पठाण, तम्मा स्वामी, पप्पू देशमुख, नागसेन कामेगावकर, दत्ता सोमवंशी, अयुब मणियार, तर रयतू भाजी व फळ विक्रेते असोसिएशनचे बालाजी गिरी, गोविंद गिरी, अयुब पठाण, छाया शेवाळे, राम साळुंके, शकुंतला पुरी, शकिला बागवान, प्रभावती ढोके आदी उपस्थित होते. गेल्या महिनाभरापासून व्यवसाय बंद असल्यामुळे उपासमारीची वेळ आल्याचे भाजीपाला, फळ विक्रेत्यांनी सांगितले.

# ग्रीन लातूर वृक्ष टीमच्यावतीने महिलांना रोपट्यांचे वाण वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ फेब्रुवारी -** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वीरशैव तेली समाज महिला मंडळ आयोजित मकर-संक्रांती निमित्त हळदी कुंकू समारंभ वीरशैव सांस्कृतिक भवन येथे असंख्य महिलांच्या उपस्थितीत भव्य दिव्य पार पडला.

हळदी कुंकू संमारंभाचे उद्घाटन भाजपा नेत्या डॉ. सौ. अर्चनताई पाटील चाकुरकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून सौ.उषा फेसगाळे,सौ. माया कलशेट्टी, सौ. मिनाक्षी राऊत, सौ.माहेश्वरी क्षीरसागर,सौ.शशिकला हारनाळे, सौ. मनीषा भुजबळ,सौ. प्राजक्ता लोखंडे,सौ.संगीता उदगिरे, सौ.महादेवी क्षीरसागर, ग्रीन लातूर वृक्ष प्रतिनिधि सौ. दिपाली राजपूत,सौ. आशा आयचीत हे उपस्थित होते.

या सर्व मान्यवर महिलांचे स्वागत हळदी कुंकू महिला समिती प्रमुख सौ.वनिता व्यवहारे व महिला समिती सदस्य यांनी केले .कार्यक्रमाची सुरूवात कु. अंजली चोपडे व मंजिरी चोपडे यांच्या स्वागत गीताने व महात्मा बसवेश्वरच्या आणि सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून




झाली. या प्रसंगी ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सौ. दीपाली राजपूत यांनी वृक्ष लागवडीचे महत्व उपस्थित महिलांना सांगून ग्रीन लातूर वृक्ष टीम तर्फे सर्व महिलांना ५०० फुलांचे रोपटे वाण म्हणून देण्यात आले.

कार्यक्रम स्थळी सौ. प्रियंका देशमाने व सौ.विद्या टाकणे यानी देवीची मूर्ती तयार करून आकर्षक सजावट केली होती व सर्व महिलांचे प्रमुख आकर्षण केंद्र बनली होती. सुबक आणि सुंदर रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती त्यासाठी सौ. प्रियांका महेंद्रगीकर व कु. प्रज्ञा क्षीरसागर यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. पल्लवी व्यवहारे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सर्व महिला मंडळा कडून अतिशय नियोजन बद्ध व काटेकोर पणे कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती त्यामध्ये प्रामुख्याने सौ.अश्विनी लोखंडे,सौ.सारिका क्षीरसागर,सौ. अनुसया देशमाने,सौ.वर्षा चोपडे,सौ.सोनाली होकळे ,सौ. रोहिणी लोखंडे,सौ. सुनीता नाईक, ,सौ.अश्विनी धुमाळे, सौ. पूजा शेगांवकर, सौ.रेखा कलशेट्टी सौ.रागिणी लोखंडे सौ.वैशाली देशमाने, सौ. ज्योति फेसगाळे, सौ. उषा टाकणे, सौ.ज्योती गंगणे,सौ. दिपाली नवगिरे यांनी कार्यक्रम पार पाडला . याप्रसंगी समाजातील सर्व महिला आपल्या परिवारासह उत्साहाने उपस्थित होत्या.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट युवा संशोधक प्राध्यापक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ फेब्रुवारी -**

दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूरच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा उत्कृष्ट युवा संशोधक प्राध्यापक पुरस्कार राज्याचे सहकार विभागाचे मंत्री बाळासाहेब पाटील आणि कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख दहा हजार रु. असे होते.

हा पुरस्कार विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयातील संशोधन करणाऱ्या युवा संशोधक प्राध्यापकाला दरवर्षी दिला जातो. डॉ. क्रांती सातपुते यांना फार्मसी क्षेत्रातील अध्यापनाचा १८ वर्षांचा अनुभव आहे. त्यांचे १५ पुस्तके, ५२ रिसर्च पेपर, २ बुक चॅप्टर प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या वैयक्तिक नावाने ३ पेटंट रजिस्टर्ड आहेत. त्यांची फार्मसी विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर फार्मसी विषयतज्ञ (बी.ओ.एस.) अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून निवड हि झाली आहे. त्या पीएचडी संशोधन मार्गदर्शक आहेत. आणि त्यांच्या मार्गदर्शनात २२ हून अधिक विद्यार्थ्यांनी पी.जी. करिता मार्गदर्शन घेतलेले आहे.

त्यांच्या संजीवनी बेट : त्वचा विकारांसाठी नॅनो हर्बल फॉर्म्युलेशनची रचना आणि विकास व नॅनोजेल हर्बल फॉर्मुलेशन फॉर डेरमाटीटीस ट्रीटमेंट या दोन शोध प्रकल्पास विद्यापीठा मार्फत आणि महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन मुंबई द्वारा मंजुरी देण्यात आली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### रंगकर्मी प्रतिष्ठानच्या कार्याचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने गौरव

**उदगीर, दि.३ फेब्रुवारी -**

येथील रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मराठी पत्रकार परिषद मुंबई यांच्या वतीने परभणी सेलू येथे झालेल्या कार्यक्रमात रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानने सामाजिक शैक्षणिक, साहित्य, कला, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रातील केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख, वृत्तनिवेदक विशाल परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बिभिषण मद्देवाड, उपाध्यक्ष सिद्धार्थ सुर्यवंशी, सचिन शिवशेट्टे, नागनाथ गुट्टे, सुनील हावा, अर्जुन जाधव, श्रीनिवास सोनी, व्ही.एस. कुलकर्णी आदींनी हा पुरस्कार स्विकारला.



### ॲड. रमेश उंबरगे यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.३ फेब्रुवारी -**

शिरूर अनंतपाळ शहरात नुकतेच संपन्न झालेले ४ मराठी साहित्य संमेलनात माजी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी तथा प्रसिद्ध लेखक, साहित्यीक व कवी ॲड. रमेश उंबरगे यांनी आई वर स्वतः लिखीत सुंदर कविता सादर केली. यावेळी रमेश उंबरगे यांच्या कवितेचे सर्वांनी कौतुक केले. तसेच शिरूर अनंतपाळ शहरातील लेखक यांनी त्यांचे काव्य संग्रह सादर केल्याबद्दल त्यांचा सेवानिवृत्त आदर्श शिक्षक पेठे गुरूजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नगरसेवक सुधिर लखनगावे, प्रा.प्रभाकर बिराजदार, आदर्श शिक्षक देविदास सांगवे, माजी उपनगराध्यक्ष संजय व्यंजने उपस्थित होते.

### रेहान महाळंग्रे अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**वलांडी, दि.३ फेब्रुवारी -**

देवणी तालुक्यातील जवळगा येथील जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थी रेहान घुडूसाब महाळंग्रे इयत्ता



९ वी वर्गातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय आविष्कार अभियानांतर्गत राजस्थान येथे जाणाऱ्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. माझी मुख्यमंत्री सुंदर शाळा या अभियानात सहभागी शाळेतील विद्यार्थ्यांची निवड या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आलेली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संजय गांधी निराधार योजना अध्यक्ष प्रशांत पाटील, विजयकुमार पाटील, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल पाटील, मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान, सहशिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# सोयाबीन खरेदीसाठी २८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ द्या : भरत चामले

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ फेब्रुवारी -**

केंद्र सरकार द्वारे नाफेड मार्फत राज्यात शासनाच्या प्रयत्नातून हमीभावाने सोयाबीन खरेदी चालू केली आहेत. त्याबद्दल खरेदी-विक्री संघाच्या वतीने आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी यांच्या वतीने शासनाचे धन्यवाद मानत असतानाच, ही खरेदी जर चालू केली नसती तर बाजारामध्ये सोयाबीनचा भाव फार कमी राहिला असता, आणि शेतकऱ्यांची फार मोठी गोची झाली असती. यावर्षी सोयाबीनचा पेरा वाढल्यामुळे उत्पन्नही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सरासरी विचार केल्यास प्रत्येक शेतकऱ्यांना हजारो रुपये कमी मिळाले असते ते शासनाच्या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांच्या पदरी पडले आहेत.

मात्र सध्या नोंदणी केलेल्या पूर्ण शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदीची क्षमता विचारात घेतल्यास आणखी मोठ्या प्रमाणात सोयाबीन शिल्लक आहे. यावर्षी बाजारात हरभरा व तुरीला भाव हमीभावापेक्षा जास्त असल्यामुळे तुर, हरभरा खरेदी फार करावी लागणार नाही, असे आज जरी वाटत असले तर नगदी पीक म्हणून ८० टक्के सोयाबीनची पेरणी झाल्याचे दिसून येत आहे. सोयाबीन खरेदीसाठी नाफेड केंद्राला अगोदर ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली होती.

त्यानंतर आणखी सहा दिवस दिलेली आहेत. मात्र ही मुदत देखील अपुरी आहे. कारण कित्येक शेतकरी खरेदी केंद्राच्या बाहेर मुक्काम ठोकून आहेत. गाडी भाड्याला महाग होण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे.



या सर्व गोष्टीचा गांभीर्याने विचार करून महाराष्ट्र शासनाने सोयाबीन खरेदीसाठी हमी केंद्रांना २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्यावी.

जर ही मुदतवाड देणे शक्य नसेल तर बाजारभावातील फरका प्रमाणे कमीत कमी आठशे ते हजार रुपये शेतकऱ्यांना फरकाची रक्कम शेतकऱ्यास देण्याची व्यवस्था करावी. अशी मागणी स्वर्गीय रामचंद्र पाटील तळेगावकर सहकारी खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दोन लाख क्विंटल चे उद्दिष्ट वाढवून दिल्यामुळे शेतकऱ्यांचा निश्चित फायदा होणार आहे. मात्र वेळेची मर्यादा विचारात घेऊन आणखी वेळ देणे गरजेचे आहे. लातूर जिल्ह्याला सोयाबीन हमीभावाने खरेदीचे १२ लाख ४८ हजार १७० क्विंटल चे उद्दिष्ट प्राप्त झाले होते, मात्र हे उद्दिष्ट पूर्ण होऊनही काही नोंदणी कृती शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी शिल्लक असल्याने लातूर जिल्ह्याला आणखी दोन लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

ही अत्यंत अभिनंदनीय बाब असल्याचेही भरत चामले यांनी नमूद केले आहे. एका अर्थाने शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. लातूर जिल्ह्याला हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी आता ६ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ती मुदत वाढ आणखी वाढवून द्यावी, जेणेकरून सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन नाफेडच्या केंद्रावर देता येईल. ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीन शिल्लक असल्याने जिल्ह्याचे उद्दिष्ट वाढवून सोयाबीन खरेदी पुन्हा सुरू करण्याची मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत होती. जिल्हा पणन अधिकारी यांनी शासनाकडे या संदर्भात अहवाल सादर केला होता. त्याप्रमाणे दोन लाख क्विंटल सोयाबीनचे उद्दिष्ट वाढवून देण्यात आले आहे. शासनाच्या या निर्णयाबद्दल खरेदी विक्री संघाचा चेअरमन म्हणून आपण शासनाचे अभिनंदन करत असल्याचेही भरत चामले यांनी नमूद केले आहे.

सोबतच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून मुदतवाढ २८ फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी. अशी विनंती ही शासन दरबारी त्यांनी केली आहे.

## उरुसानिमित्त नळदुर्गमध्ये विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथील हिंदु-मुस्लिम धार्मियांचे आराध्य दैवत असलेले हजरता सय्यदा खैरुन्निसा रह. उर्फ नानीमाँ सरकार यांचा ५० वा उरूस दि.५ ते ७ फेब्रुवारी रोजी साजरा होणार आहे. उरूसनिमित्त आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन सय्यद रिजवानउल्ला इमदादुल्लाह काझी चिस्ती यांनी केले आहे.

उरूसनिमित्त दि. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वा. शहरातुन भव्य संदल मिरवणुक काढण्यात येणार आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वा. चिरागा, नात-बयान होणार आहे. दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा. जियारत कार्यक्रम झाल्यानंतर उरुसाची सांगता होणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन सय्यद रिजवानउल्ला इमदादुल्लाह काझी चिस्ती यांनी केले आहे.

## साहित्य संमेलनातसृजन रंगकर्मी चित्र प्रदर्शनात चित्रकारांची चित्रे

### साहित्य संमेलनात 'सृजन रगकर्मी' चित्र प्रदर्शन कलादालनाची मेजवानी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई व रंगकर्मी प्रतिष्ठान उदगीर आयोजित दि. ८ फेब्रुवारी रोजी श्री शिवाजी महाविद्यालय उदगीर येथे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनात सृजन रंगकर्मी या नावाचे कलादालन उभा करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील चित्रकार, कलावंत, कलाध्यापक व कलारसिक बंधू भगिनींनी आपण साकारलेली कलाकृती या साहित्य संमेलनात प्रदर्शित करण्यासाठी ही अनमोल संधी संयोजकांनी कलावंत बंधूंना उपलब्ध करून दिले आहे. या दालनात चित्र प्रदर्शित करण्यासाठी ग्राफिक्स डिझायनर शिवाजी हांडे ९९६००६५५११, मंहादेव खळुरे ८७९६६६५५५५, चंद्रदिप नादरगे ८६०५७७६४७८, दिपक हालकंचे ९४२१३४३०१९ यांच्याशी संपर्क साधून आपली कलाकृती पाठवून द्यावेत, असे आवाहन साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, कार्यवाह रामचंद्र तिरुके, रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बिभीषण मद्देवाड, सिद्धार्थ सुर्यवंशी, रसुल पठाण, रामदास केदार, आदींनी चित्र प्रदर्शनासाठी आवाहन केले आहे. सहभागी सर्व उपस्थित कलावंतांना सहभाग नोंदवल्याचे प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात येणार असून या चित्र प्रदर्शनात सहभाग नोंदवण्यासाठी प्रमुख महादेव खळुरे यांनी आवाहन केले आहे.

## आंतरविद्यापीठ तायक्कांदो पदक विजेता सुमित राठोड व क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ फेब्रुवारी -**

सेवा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त २०२३-२४ या वर्षासाठीच्या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले.



या गौरव समारंभात महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा आंतरविद्यापीठ तायक्कांदो पदक विजेता खेळाडू सुमित राठोड आणि क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते.

त्यांच्या हस्ते सन्मानित खेळाडू व क्रीडा संचालक यांना स्मृतिचिन्ह, ब्लेझर आणि रोख रक्कम ८००० रुपये प्रदान करण्यात आली. सुमित राठोड यांनी तायक्कांदो क्रीडा प्रकारात आंतरविद्यापीठ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून पदक पटकावले. त्याच्या या यशाने महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचे नाव प्रसिद्धी झोतात आले आहे.

कार्यक्रमास विद्यापीठातील अधिसभा सदस्य, सिनेट सदस्य, विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.जी. पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## दैठणा येथे आ. संजय बनसोडे यांच्याकडून सांत्वनपर भेट

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.३ फेब्रुवारी -**

दैठणा (ता. शिरूर आनंतपाळ) येथील हरिश्चंद्र सखाराम रेड्डी उर्फ नमनगे यांचे अतिशय अल्प अशा हृदयविकाराच्या आजारात निधन झाले. यानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उदगीर विधानसभा राखीव मतदार संघातील विद्यमान आमदार व माजी राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याकडून आपल्या सहकारी सोबत भेट देण्यात आली आणि या भेटीत नमनगे परिवारावरती आलेले दुःखाचे संकट नाहीसे करण्यासाठी त्यांच्याकडून खूप असा आत्मियतेने प्रयत्न करण्यात आला हरिश्चंद्र सखाराम रेड्डी यांच्या पश्चात जे कौटुंबिक सदस्य आहेत.

या सांत्वन भेटीच्या प्रसंगी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामभाऊ तिरुके, माजी जिल्हा परिषद पशुधन सभापती गोविंदराव चिलकुरे, जिल्हा मध्यवर्तीचे संचालक व्यंकटर बिरादार, सदविवेक मिरकले, ॲड. बालाजी मिरकले, भाऊराव पाटील, डॉ. श्याम डावळे, वसंत पाटील, शंभू उंबरगेकर, रावणगावचे सरपंच ज्ञानेश्वर पाटील, शंभू उमरगा येथील सरपंच लिंगेश्वर स्वामी, उदगीर बाजारपेठेतील अधिकृत व्यापारी कमलेश पेठे, सताळा गावचे सरपंच शिवलिंग जळकोटे या सर्वांकडून उदगीर राखीव विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आ. संजय बनसोडे यांच्यासोबत उपस्थिती लावण्यात आली.

## दैवशाली टेंकाळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ फेब्रुवारी -**

येथील सुवर्णा माता देशमुख कन्या विद्यालयातील शिक्षिका दैवशाली टेंकाळे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल शाळेतर्फे मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, भर आहेर देऊन सत्कार करण्यात आला.

मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सरोजा पाटील, सुलाबाई पाटील, सुमित्रा कोयले, नरेंद्र पाटील, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण जाहुरे, नागनाथ सकाये, डॉ. राधाकृष्णन पतसंस्थेचे माजी चेअरमन रमेश वंगाटे, मुख्याध्यापक हणमंत घोडके, अश्विनी निवर्गी, सुनंदा सरदार, सुनील क्षीरसागर, किशन उगले, रेवता जाधव, वर्षाराणी चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी दैवशाली टेकाळे लिखित भावनांकुर पुस्तकाचे प्रकाशन प्रा. प्रवीण जाहुरेव इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. शिक्षिका, लेखिका, योगशास्त्राची जानकार, शाळेसाठी समर्पित व्यक्तिमत्व असा शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव सर्वच वक्त्यांनी केला. यावेळी बोलताना प्रा. जाहूरे म्हणाले भावनांकुर मध्ये विविध अनुभव, व्यक्ती चित्रे सहज सोप्या भाषेत रेखाटली असून समाज प्रबोधन करणारे लेख आहेत. ते वाचकांच्या पसंतीस उतरतील. ग्रामीण, वंचितांच्या मुलींसाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरक असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या विद्यार्थिनीच्या वतीने सनाकाझी, अनुष्का वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक हणमंत घोडके यांनी केले. सूत्रसंचालन बाबुराव पाटील यांनी केले तर आभार विश्वंभरगव्हाणे यांनी मानले.

# राज्यस्तरीय फार्मा व्हॉलीकप स्पर्धेत पाथरीचा संघ विजेता

**▶▶ कॉलेज ऑफ फार्मसी मुरुम द्वितीय तर शिवलिंगेश्वर फार्मसी आलमला तृतीय...**



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३ फेब्रुवारी -**

आलमला येथील शिविलगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वेश्वर संकुलात झालेल्या १० व्या व्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन फार्मा व्हॉली कप स्पर्धेच्या अंतिम लढतीत पाथरीतील डीजेपीएस कॉलेज ऑफ फार्मसीच्या संघाने सलग दोन सेटमध्ये पराभूत करुन प्रथम पारीतोषिक पटकावले. यामुळे मुरुम येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीने द्वितीय तर आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीने तृतीय पारितोषिक मिळविले आहे.

आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी मैदानात दोन दिवस रंगलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, जनरल सेक्रेटरी ऑफ महाराष्ट्र युथ ट्रेडीशनल असोशिएशन ऑफ इंडिया तथा फुटबॉल प्लेयर रोहित थोरात, दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, शिरीष उटगे, बालाजी पिंपळे, सचिव बसवेश्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, योगेश धाराशिवे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, अभिलाष आंबुलगे, वागदरे एस.एस. प्रशांत धुमाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

दिशा प्रतिष्ठान, लातूर, रोटरी क्लब मिडटाऊन, लातूर, सिध्देश्वर सर्विसेस औसा, रामनाथ अग्रो आलमला, शैलेश ईलेक्ट्रीकल लातूर, आपली कॅन्टीन आलमला, प्राची डिजीटल लातूर, के. के. ग्राफिक्स लातूर, विश्वेश्वरया झेरॉक्स आलमला, बोरा युनिफॉर्मस लातूर, हरुन स्टील ट्रेडर्स लातूर, नक्षत्र ग्लास अण्ड अल्युमिनीयम लातूर, महालक्ष्मी प्लाय लातूर, पांडूरंग ऑफसेट औसा, सय्यद फॅब्रीकेशन लातूर, लातूर युनिफॉर्मस व अपूर्वा स्टोनस लातूर यांच्या वतीने विजेत्यांना विशेष रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्राचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट व शिस्तबध्द संघाचे पारितोषिक अल्लमप्रभू कॉलेज ऑफ फार्मसी लातूर, बेस्ट लिफटर डीजेपीएस कॉलेज ऑफ फार्मसी, पाथरीच्या राजेश चावलवार, बेस्ट स्मॅशर म्हणुन माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी मुरुमच्या शुभम सुरवसे तर प्लेयर ऑफ द टूर्नामेंट पारितोषिक शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या सौरव सिंग यांनी पटकावले. या सर्वांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. .दिपक पाटील, सोमनाथ पाटील, विजय हांडे, दिपक मुनाळे, शैलेंद्र डावळे, पृथ्वीराज पाटील, सोमी लोणे, मशायक मुंगळे, पाशाभाई लंगडे, निजाम सर, प्रकाश बुरसे यांनी या स्पर्धेत पंच म्हणुन उत्कृष्ट कामगिरी पार पाडली. या स्पर्धेचे समालोचन महादेव मेहकरे यांनी केले. याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा.डॉ. प्रसाद कटारे, दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, युवराज काटु, विकास मुगळे, किरण रोडगे, डॉ. अजय फुगटे, डॉ. मोहम्मद रईस, वागदरे एस.एस, गणेश गोसावी, कापसे विद्या, मयुरी चंद्रवंशी, सय्यद अझिम, सिरगिरे कविता, गोपाळ माळी, गौरी परतकर, अजहर ठेंगाडे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला. घेतले. प्रा.डॉ. सुरज मालपाणी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार मानले.

## मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू आणि खेळ पैठणीचा कार्यक्रम



### विविध महिलांनी घेतला सहभाग....

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३ फेब्रुवारी -**

चाकूर येथील ज्ञानदीप स्कॉलर स्कूलमध्ये मकर संक्रांतीनिमित्त हळदी कुंकू व खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माझी आई स्मार्ट मम्मी या मनोरंजक आणि बौद्धिक खेळाचे शाळेतील चिमुकल्यांनी सादरीकरण केले.

यावेळी नगर पंचायतच्या नगरसेविका शुभांगी कसबे यांच्या अध्यक्षतेखाली मंडळ अधिकारी सुषमा सुर्यवंशी, जयश्री मिरकले, आशा मिरकले आणि संचालिका एकता ढगे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी बाई पण भारी देवा या गाण्यावर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. खेळ पैठणी कार्यक्रमास चाकूर व परिसरातील अनेक महिलांनी सहभाग नोंदवला होता. यात प्रथम क्रमांक आश्विनी नरहरे, द्वितीय अनिता स्वामी आणि तृतीय पैठणीच्या मानकरी सुषमा शिंगडे या भाग्यवान ठरल्या आहेत. माझी आई स्मार्ट मम्मी या बौद्धिक खेळात अलका आबेंराव आणि सरोजा शिंदे या दोघी पैठणीच्या मानकरी ठरल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संचालक परमेश्वर ढगे, विश्ववंदन सोनकांबळे, सोनाली जाधव, हिरा वर्मा, इशराक सय्यद, पूजा मुंगे, आश्विनी जाधव, रेखा कदम आदिनी परिश्रम घेतले.